




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ अमरावती, मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०







# 10 जि.प.त महायुतीला बहुमत

## सांगली, कोल्हापुरात त्रिशंकू, लातूरमध्ये काँग्रेस सर्वांत मोठा पक्ष

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरपालिका व महापालिका निवडणुकी पाठोपाठ १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांसाठी झालेल्या निवडणुकीतही भाजपा व मित्रपक्षांनी बाजी मारली असून, १२ पैकी जिल्हा परिषदांवर स्वबळावर किंवा एकमेकांच्या मदतीने महायुतीचा झेंडा फडकणार आहे. उर्वरित दोन जिल्हा परिषदांमध्ये त्रिशंकू स्थिती असली तरीही बहुमताचा जुगाड करून सत्ता मिळवण्याची तयारी महायुतीने केली आहे. लातूर जिल्हा परिषदेत कांग्रेसने जबरदस्त मुसंडी मारली असून, सर्वाधिक २३ जागा जिंकत कांग्रेस सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे.



जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक

भाजपने राष्ट्रवादीसोबत युती केल्याने कांग्रेसला थोडक्यात सत्तेपासून दूर राहावे लागणार आहे. नगरपालिका व महापालिका निवडणुकीत यश मिळवून शहरी भागावर वर्चस्व मिळवल्यानंतर भाजपाने १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत मोठे यश मिळवत ग्रामीण भागातही विशेष प्राविण्यासह पहिला क्रमांक पटकावला. महायुतीतील शिंदेंची शिवसेना व स्व.अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही आपली ताकद दाखवून देत दुसरा आणि तिसरा क्रमांक कायम ठेवला. काँग्रेस लातूरमध्ये सर्वांत मोठा पक्ष ठरला तर कोल्हापूर, सांगली येथे त्रिशंकू स्थिती आहे.

**कोल्हापूर आणि सांगली जिल्हा परिषदेत त्रिशंकू स्थिती** आहे. परंतु या दोन्हीही ठिकाणी सत्तेच्या चाव्या काँग्रेसकडे आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची सगळीकडे पिछेहाट झाली असून ५० जागा मिळताना त्यांची दमछाक झाली तर अजित पवारांच्या पक्षाशी आघाडी करू नही शरद पवारांच्या राष्ट्रवादीला फारसे काही हाती लागलेले नाही. मात्र, सांगली जिल्हा परिषदेत शरद पवार यांचा पक्ष सर्वांत मोठा ठरला आहे. त्यामुळे येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. ते कांग्रेससह इतरांना सोबत घेउन सत्ता स्थापन करू शकतात.

**७ जिल्हा परिषदांमध्ये भाजप सर्वांत मोठा पक्ष** - १२ जिल्हा परिषदांपैकी छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सोलापूर, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा या ७ ठिकाणी भाजपा १ नंबरवर आहे तर शिवसेना रत्नागिरी ➪(पान २ वर)

### जनतेचा महायुतीवरच विश्वास



महाराष्ट्राच्या जनतेने पुन्हा एकदा महायुतीवरच आपला विश्वास दाखविलेला आहे. १२ जिल्हापरिषदांमध्ये भाजपा पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थापित झाला आहे. बाराही जिल्हापरिषदांमध्ये महायुतीचीच सत्ता येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्तकेला आहे. भाजपाप्रमाणेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या मित्रपक्षांनाही चांगले यश मिळाले आहे. ग्रामीण भागाची मानसिकता यातून समोर आली आहे. नगरपालिका, महापालिका आता जिल्हापरिषदा या सगळ्यांमधून राज्य सरकारच्या कामावर जनतेने शिक्कामोर्तब केले असल्याचे फडणवीस म्हणाले.

### अजिदादांचा दुर्दैवी मृत्यू झाला



त्याचे दुःख आम्हा सर्वांना आहे. त्यामुळे मी प्रचारही नाही केला. पण ग्रामीण भागाची मानसिकता यातून समोर आली. आताचे निकाल हा जनतेचा विश्वास आहे. या देशात पंतप्रधान मोदी यांनी ग्रामविकासाचे कार्य हातात घेतले. महाराष्ट्र सरकारनेही कार्य केले. त्यामुळे भाजपा व मित्र पक्षांना समर्थन मिळते. त्यावरून ही भरारी आम्ही मारली आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. महाविकास आघाडी फारशी कुठे दिसत नाही. त्यामुळे आम्हाला फारसे काही करण्याची गरज नाही. रोज सकाळी ९ वाजता त्यांचे जे प्रवक्ते वक्तव्य करतात, त्यामुळे त्यांची मते कमी करण्याचे काम ते योग्य प्रकारे करत आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला. विरोधकांमध्ये जी लढण्याची इच्छाशक्ती असली पाहिजे त्याचा अभाव दिसतो आहे. विरोधी पक्षात काम करताना जनतेत जाउन काम करावे लागते. विरोधी पक्ष फक्तमिडियामध्येच दिसतो असेही ते म्हणाले. काँग्रेसने आघाडीचा काय निर्णय घ्यायचा हा सर्वस्वी त्यांचा प्रश्न आहे. पण आघाडीने नुकसान झाले हे कदाचित काँग्रेसला आता समजले असेल असेही ते म्हणाले.

## जिल्हा परिषदेतही देवेंद्र-रविंद्र जोडी ठरली हिट

### राज्यात सर्वाधिक जागा घेत भाजपाची हॅटट्रिक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, परभणी, लातूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या जिल्हा परिषदांचे निकाल जाहीर झाले. राज्यातील सत्तेत प्रमुख पक्ष असलेल्या भाजपाने सर्वाधिक जिल्हा परिषदांमध्ये सत्ता मिळवली आहे. महायुतीतील शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षालाही काही ठिकाणी यश मिळाले आहे. महाविकास आघाडीला जिल्हा परिषदा निवडणुकीतही फार चांगला कामगिरी करता आली नाही.

राज्यातील तिस-या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्यालाच आहे हे परत सिद्ध केले. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हीच राजकारणातील आजची जोडी नं. १ असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचे म्हटले जात आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या



नेतृत्वात आणि रविंद्र चव्हाण यांच्या नियोजनाच्या बळावर भाजपाने राज्यात सर्वाधिक जागा मिळविण्याची अनोखी हॅटट्रिक प्राप्त केली आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या नगर परिषद निवडणूका, त्यानंतर जानेवारीत झालेल्या महानगरपालिका निवडणुका आणि या फेब्रुवारी महिन्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत देवेंद्र आणि रविंद्र या राजकीय पावरफुल जोडीने अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचार यंत्रणा पद्धती, स्थानिक पातळीवरील पक्षासोबत राज्य पातळीवरील पक्षाचा थेट संवाद आणि समन्वय अशा विविध माध्यमातून भाजपाला उच्च दर्जाची सक्षम पक्ष यंत्रणा उभारली. त्यामुळे स्थानिक नेतृत्वाला शीर्षस्थ नेतृत्वाचा वरदहस्त लाभला आणि धाकही जाणवला. याचा सकारात्मक परिणाम होउन पक्षाने अनेक ठिकाणी अत्यंत आश्चर्यकारक आणि धक्कादायक विजय नोंदवले. या यशाचे मुख्य शिल्पकार देवेंद्र फडणवीस तर सूत्रधार रविंद्र चव्हाण हे आहेत हे निर्विवादपणे म्हणावे लागेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दरम्यान, रविंद्र चव्हाण यांना निवडणूक सिद्ध नेता म्हणून ओळखले जाते. ते जमिनीवर वावरणारे आणि कार्यकर्त्यात रमणारे प्रदेशाध्यक्ष आहेत. निवडणुकीत अत्यावश्यक असणारे आडाखे वापरताना विचारधारेच्या धाग्याने कार्यकर्त्यांना आणि मतदारांना जोडणारे असे त्यांचे नेतृत्त्व आहे म्हणूनच दिल्ली आणि नागपूर दोन्ही सत्ताकेंद्रांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्याच बरोबर त्यांना देवेंद्र फडणवीस यांचा पाठिंबा आणि सहकार्य कायम मिळतच असते, असे सांगितले जात आहे.

## महाराष्ट्रात महायुतीचा मोठा विजय लोकभावना दर्शवतो

### सर्व कार्यकर्त्यांचे आभार : पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजप आणि महायुतीला मोठा पाठिंबा मिळाला आहे. राज्यातील जनतेला सुशासन आणि राज्याच्या गौरवशाली संस्कृतीचा आदर करणारे युतीचे सरकार हवे आहे, हे यावरून स्पष्ट होते. अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूक निकालावर आनंद व्यक्त केला. त्यांनी महाराष्ट्रातील तमाम मतदारांचे आभार मानले तसेच पक्षाच्या आणि महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांचेही आभार मानले.



सोमवारी (दि. ९) रात्री सोशल मीडियावर व्यक्त होत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, राज्यात महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांमधील भाजप आणि महायुतीच्या घवघवीत यशानंतर, महाराष्ट्रातील जनतेने जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही आम्हांला भक्कम जनादेश दिला आहे. ➪(पान २ वर)

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत महायुतीचा झेंडा

### 50 पैकी 41 जागा जिंकत राणे यांनी बालेकिल्ला राखला

**सावंतवाडी:** सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. जिल्हा परिषदेच्या एकूण ५० जागांपैकी तब्बल ४१ जागांवर महायुतीने विजय मिळवून जिल्ह्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या निकालाने खासदार नारायण राणे यांनी आपला सिंधुदुर्गातील बालेकिल्ला पुन्हा एकदा अभेद्य असल्याचे सिद्ध केले आहे.

**भाजपला स्वबळावर बहुमतः** या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने २७ जागा जिंकून स्वबळावर बहुमताचा आकडा पार केला आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने १४ जागांवर यश मिळवले. दुसरीकडे, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला या निवडणुकीत मोठा धक्का बसला असून त्यांना केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले. उर्वरित ६ जागांवर अपक्ष उमेदवारांनी बाजी मारली आहे.



**राणे कुटुंबाचा करिश्मा कायम:** खासदार नारायण राणे, पालकमंत्री नितेश राणे, आमदार निलेश राणे आणि , माजी मंत्री आमदार दीपक केसरकर➪(पान २ वर)

## शरद पवार यांची प्रकृती स्थीर

**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत निर्माण झालेली चिंता आता दूर झाली आहे. त्यांना पुण्यातील रुबी हाल क्लिनिकमध्ये दाखल केल्यानंतर तज्ज्ञ डाक्टरांनी आणि आमदार रोहित पवार यांनी त्यांची प्रकृती स्थिर असल्याची अधिकृत माहिती दिली आहे. पवार सध्या कोणाशीही संवाद साधू शकत असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. पवारांवर उपचार करणारे डॉ. अभिजीत लोढा यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्पष्ट केले की, शरद पवार यांना गेल्या दोन-तीन दिवसांपासून कफचा (खोकल्याचा) त्रास जाणवत होता. त्यांच्या सर्व आवश्यक वैद्यकीय तपासण्या पूर्ण झाल्या असून सध्या त्यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे. त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्याची गरज भासलेली नाही. ते सध्या रुग्णालयातील एका खाजगी रूममध्ये विश्रांती घेत आहेत.



ते सध्या सर्वांशी नॉर्मल बोलत आहेत, काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही.

**रोहित पवारांचे कार्यकर्त्यांना कळकळीचे आवाहन**

आमदार रोहित पवार यांनी कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, 'शरद पवार यांची प्रकृती स्थिर आहे, त्यांना फक्त कफचा त्रास आहे. ते आयसीयूमध्ये नाहीत, तर खाजगी रूममध्ये आहेत. मात्र, उपचारांसाठी त्यांना काही दिवस रुग्णालयातच ठेवले जाईल. माझी सर्व कार्यकर्त्यांना विनंती आहे की, कृपया रुग्णालयात गर्दी करू नका.'

## राज्यभरात आजपासून बारावीची परीक्षा

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे उद्यापासून (१० फेब्रुवारी) राज्यभरात बारावीची परीक्षा सुरू होत आहे. या परीक्षेसाठी १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा बारावीच्या विद्यार्थिसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राज्य मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नउ विभागीय मंडळांमार्फत परीक्षा घेतली जाणार आहे.



गेल्या वर्षी १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा नोदणी केलेल्या १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख २० हजार २२९ मुले, ७ लाख १२ हजार २४० मुली, तर १८ तृतीयपंथी विद्यार्थी आहेत. माहिती-तंत्रज्ञान, सामान्य ज्ञान या विषयांची परीक्षा ऑनलाइन घेतली जाणार आहे. माहिती-तंत्रज्ञानसाठी २ लाख ३६ हजार ३२०, सामान्य ज्ञानसाठी १ हजार ७०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ➪(पान २ वर)

## राज्यात 70 हजार पदांसाठी नोकरभरती होणार-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात लवकरच सुमारे ७० हजार पदांची मोठी नोकरभरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही भरती नव्या, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यात येणार असून तरुणांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या भरतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या सुमारे २० हजार पदांचा समावेश असेल, तर उर्वरित पदे आयोगाबाहेरील विविध विभागांमध्ये भरली जाणार आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणा संदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते. भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये पात्रता निकष आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेतले जातील, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. सेवा प्रवेश नियमावलीतील बदलांचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत मांडला जाणार आहे.

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाइन व डिजिटल व्हेरिफिकेशन माडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. ब्लाकचेन तंत्रज्ञान आणि डिजिलाकर प्रणालीचा वापर करून प्रमाणपत्र पडताळणी सुलभ करण्यात येईल. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाइन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे माडेल वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या.➪(पान २ वर)

## कारचा भीषण अपघात : राष्ट्रीय नेमबाजाचा जागीच मृत्यू!

**पालघर:** राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय कनिष्ठ नेमबाजी स्पर्धामध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले २७ वर्षीय संभाजी पाटील यांचा कार अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दुर्वेस गाव हद्दीत हेरिटेज डेअरी समोर फार्चूनर आणि हायवा ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात पाटील याचा मृत्यू झाला आहे. हा अपघात आज सकाळी १० ते अकरा वाजेदरम्यान घडल्याची➪(पान २ वर)



## महिलांना मंगळसूत्र उतरवायला लावल्याने वाद पेटला

### मुख्यमंत्र्यांचा कडक इशारा, चौकशी सुरू!

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेतील महिला उमेदवारांना, परीक्षा हालकडे जाताना, त्यांच्याकडील मंगळसूत्र काढायला लावण्याच्या प्रकारावर, राज्यात संतापाची लाट पसरली आहे. परीक्षा की अपमान? असा प्रश्न केला जात आहे.परीक्षा पर्यवेक्षकांच्या या कार्यपद्धतीवर संतापाची लाट उसळली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अॅक्शन मोडवर आले आहे. झालेल्या प्रकारावर योग्य सूचना दिल्या जातील तसेच चौकशी केली जाईल, असे संकेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अहिल्यानगर इथं दौ-यावर होते. सुपा एमआयडीसी इथं तौरल इंडिया प्रकल्पाचं उद्घाटन झालं. यानंतर मुख्यमंर्त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. छत्रपती संभाजीनगरमध्ये उळएळ परीक्षेदरम्यान महिला परीक्षार्थ्यांना मंगळसूत्र काढण्याच्या प्रकारावर, मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाल् अशा प्रकारच्या तक्रारी मागच्याही काळात आल्या होत्या. नेमकं काय झालं, या संदर्भात मी नेमकी माहिती घेईल. मागच्या वेळेस चौकशी केली असता, परीक्षा घेणा-या यंत्रणेकडून सांगण्यात आलं की, परीक्षेत गैरप्रकार करण्यासाठी वेगवेगळे प्रकार केले जातात, इक्विपमेंट लपवले जातात. असं करणं पण देखील योग्य नाही. या संदर्भात अधिक काळजी घेतली जाईल. योग्य सूचना दिल्या जातील आणि चौकशी केली जाईल. ६ फेब्रुवारीला सीटीईटी परीक्षेच्या वेळी, छत्रपती संभाजीनगरमधील परीक्षा केंद्रांवर ➪(पान २ वर)

## तान्या नाथन होणार पहिल्या दृष्टिहीन महिला न्यायाधीश


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केरळच्या न्यायव्यवस्थेत एक ऐतिहासिक अध्याय



जोडला जाणार आहे. दृष्टिहीन वकील तान्या नाथन सी. लवकरच राज्यातील पहिल्या दृष्टिहीन महिला न्यायाधीश होणार आहेत. केरळच्या 'सिव्हिल जज' (ज्युनियर डिव्हिजन) पदांसाठी नुकत्याच पार पडलेल्या परीक्षेत त्यांनी दिव्यांग श्रेणीतील गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. २४ वर्षीय तान्या या कन्नूर विद्यापीठाच्या ➪(पान २ वर)

## प्रकाशनापूर्वीच नरवणे यांच्या पुस्तक वितरणामुळे FIR दाखल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली पोलिसांनी माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकाच्या वितरणासंदर्भात एफआयआर नोंदवला आहे. ही कारवाई वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफ?र्मवर आणि ऑनलाइन न्यूज फोरमवर समोर आलेल्या माहितीच्या आधारे करण्यात आली, ज्यात पुस्तकाची प्री-प्रिंट प्रत प्रसारित होत असल्याचा दावा करण्यात आला होता.




पोलिसांनुसार, फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी या शीर्षकाच्या या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी अद्याप संबंधित अधिका-यांकडून आवश्यक मंजुरी मिळालेली नाही. पोलिसांच्या तपासात समोर आले की, याच शीर्षकाची एक टाइप-सेट पुस्तकाची पीडीएफ प्रत काही वेबसाइट्सवर उपलब्ध होती.पेंग्विन रँडम हाउस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने तयार केलेली तीच प्रत असावी अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, काही ऑनलाइन मार्केटिंग प्लॅटफार्मवर पुस्तकाचे मुखपृष्ठ अशा प्रकारे दाखवण्यात आले होते जणू ते खरेदीसाठी उपलब्ध आहे.

या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने गुन्हा दाखल केला आहे. अप्रकाशित आणि मंजूर नसलेल्या पुस्तकातील मजकूर सार्वजनिक कसा झाला आणि यामागे कोण लोक सामील आहेत, याचा शोध घेण्याचा पोलिस प्रयत्न करत आहेत. ही एफआयआर अशा वेळी दाखल करण्यात आली आहे, जेव्हा ४ फेब्रुवारी रोजी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना संसद परिसरात पुस्तकाची एक प्रत दाखवताना पाहिले गेले होते. राहुल म्हणाले होते- जर पंतप्रधान मोदी संसदेत आले तर मी त्यांना हे पुस्तक देईन. राहुल म्हणाले होते की त्यांना या पुस्तकातील काही भाग लोकसभेत वाचायचा आहे, परंतु स्पीकर ➪(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दिवंगत लोकनेते अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली







**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी भव्य सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर, माजी मंत्री, आमदार आणि राजकीय क्षेत्रातील दिग्गज नेत्यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या. राजकीय मतभेद विसरून शिवसेना, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि मनसे यांसह सर्वच पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या श्रद्धांजली सभेला अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत मोहनदास कारंजेकर बाबा, समाधा आश्रमचे डॉ. संतोष महाराज नवलानी, माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील, डॉ. सुनील देशमुख, महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके, डॉ. कमलताई गवई, आमदार सुलभा खोडके, प्रताप अडसड, रवी राणा, राजेश वानखडे, प्रवीण तायडे , गजानन लवटे , महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, तसेच शिवसेना उबाठाचे माजी खासदार अनंत गुढे, पराग गुडधे, शिंदेसेनेचे माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, नानकभाई नेभनानी, प्रीती बंड , भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, किरण पातूरकर , तुषार भारतीय, शिवराय कुलकर्णी , चेतन गावंडे, निवेदिता दिघडे, दिनेश सूर्यवंशी, काँग्रेस पार्टीचे किशोर बोरकर, रामेश्वर अभ्यंकर, हरिभाऊ मोहोड, कांचनमाला गावंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सुरेखा ठाकरे, संतोष महात्मे, अविनाश मार्डीकर, प्रशांत डवरे, रिना नंदा, यश खोडके, सुनील वऱ्हाडे, संगीता ठाकरे, महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे ॲड. प्रशांत देशपांडे, शिवाजी शिक्षण संस्थेचे हेमंत काळमेघ, दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष कीर्ती अर्जुन, रिपाई आठवले गट प्रकाश बनसोड, पिरीपाचे चरणदास इंगोले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष धिरज तायडे, अमरावती जिल्हा ऑटो युनियनचे अध्यक्ष नितीन मोहोड , जिजाऊ बँक अध्यक्ष अविनाश काठोळे, दिगंबर जैन महासमितीचे अभिनंदन पेंढारी, महेश्वरी समाजाचे सुरेश साबू,भारतीय विद्या मंदिराचे सरचिटणीस अनंत सोमवंशी, जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोशीएशनचे सौरभ मालाणी, आदींसह सर्वपक्षीय नेते मंडळी , पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध समाज संघटनेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या पवित्र स्मृतीचे स्मरण करून सामुहिक श्रद्धांजली अर्पण केली.

पान १ व १० वरून

## १० जि.प.त महायुतीला

आणि रायगड या दोन ठिकाणी तर राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यात नंबर एकवर आहे. कोल्हापूर आणि लातूरमध्ये त्रिशंकू स्थिती असली तरी भाजपने जुगाड करून सत्ता मिळवण्याची रणनीती आखली आहे.

**भाजप पहिल्या क्रमांकावर-**२०१७ मध्ये भाजपाला या १२ जिल्हा परिषदेत १४१ जागा मिळाल्या होत्या. आता घोषित निकालांमध्ये २३६ जागा मिळवत भाजपाने पहिला क्रमांक मिळवला आहे.

**१२५ पैकी १०० पंचायत समित्या महायुतीकडे-**पंचायत समितीत २०१७ मध्ये भाजपाला २८४ जागा होत्या. आतापर्यंत घोषित निकालांमध्ये भाजपाला ४१० जागा मिळाल्या आहेत. १२५ पंचायत समित्यांचा कल पाहिला तर त्यापैकी ५० समिती भाजपाकडे असतील. २६ शिवसेनेकडे तर २३ राष्ट्रवादीकडे असतील. ७ ते ८ काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडेही ७ ते ८ तर उबाठाकडे ५ पंचायत समित्या अशी स्थिती आहे. महायुतीला १२५ पैकी १०० पंचायत समित्या महायुतीकडे जातील अशी स्थिती आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेसने कोल्हापूर तसेच लातूरमध्ये चांगली कामगिरी केली. लातूर जिल्हा परिषदेत काँग्रेस मोठा पक्ष ठरला. मात्र कुठेच बहुमत मिळवता आलेले नाही.

## महाराष्ट्रात महायुतीचा मोठा

महाराष्ट्र सरकारच्या ठोस कामगिरीबद्दल तसेच एनडीएच्या सुशासनाच्या दृष्टिकोनाबद्दल जनतेपर्यंत माहिती पोहोचवत, स्थानिक स्तरावर अथक परिश्रम करणा-या महायुतीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो, असेही ते म्हणाले.नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांमधील घवघवीत यशानंतर, आता ग्रामीण महाराष्ट्रानेही भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला कौल दिला आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून, त्यात महायुतीने दणदणीत विजय मिळवत आपला वरचष्मा कायम राखला आहे. या विजयामुळे राज्याच्या कानाकोप-यात महायुतीची लाट असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

ग्रामीण आणि शहरी महाराष्ट्राचा 'गुड गव्हर्नन्स'ला कौल

महानगरपालिकांच्या निवडणुकीत मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती जिल्हा परिषदांमध्येही झाली आहे. राज्याच्या वैभवशाली संस्कृतीचे रक्षण करणारे आणि सर्वांगीण विकास साधणारे सरकारच जनतेला हवे आहे, यावर या निकालाने शिक्कामोर्तब केले आहे. शहरी भागासोबतच आता ग्रामीण जनतेनेही 'सुशासना'च्या मुद्द्यावर महायुतीवर विश्वास दाखवला आहे.

**कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फळ-**या विजयाचे श्रेय महायुतीच्या मैदानावर राबणा-या प्रत्येक कार्यकर्त्याला देण्यात आले आहे. राज्य सरकारच्या कामगिरीचा लेखाजोखा आणि एनडीएचा सुशासनाचा दृष्टिकोन तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. त्यांच्या याच परिश्रमामुळे महायुतीला ग्रामीण बालेकिल्ल्यांमध्येही भगवा फडकवता आला आहे, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत

यांनी महायुतीचा फार्म्युला जिल्ह्यात प्रभावीपणे राबवला. कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी या तिन्ही प्रमुख तालुक्यांत महायुतीने विरोधकांचा सुपडा साफ केला.

## राज्यभरात आजपासून बारावीची

डॉ. बेडसे म्हणाले, एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले. विद्यार्थ्यांनी राज्य मंडळामार्फत प्रसिद्ध आणि छपाई केलेलेच वेळापत्रक ग्राह्य धरावे. गेल्या वर्षीप्रमाणेच परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या ९ जानेवारीच्या शासननिर्णयानुसार परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरातील छायांकित प्रतीची दुकाने (झेरॉक्स केंद्र) बंद ठेवणे, संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करणे, कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास संबंधितांवर दखलपात्र, अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची जिल्हा दक्षता समितीची जबाबदारी आहे.

विभागीय मंडळनिहाय विद्यार्थिसंख्या

पुणे - २ लाख ६० हजार १४
नागपूर – १ लाख ६० हजार ५३०
छत्रपती संभाजीनगर - १ लाख ९१ हजार ४९३
मुंबई - ३ लाख ५२ हजार ७१८
कोल्हापूर - १ लाख १६ हजार ६११
अमरावती - १ लाख ५६ हजार ९१५
नाशिक -१ लाख ७३ हजार ६५१
लातूर - ९६ हजार ५४२
कोकण - २४ हजार १३

शाखानिहाय विद्यार्थी

कला - ३ लाख ८० हजार ६९२
वाणिज्य - ३ लाख २० हजार १५२
विज्ञान - ७ लाख ९९ हजार ७७३
व्यावसायिक अभ्यासक्रम -२७ हजार ३७८
आयटीआय - ४ हजार ४९२

## राज्यात 70 हजार पदांसाठी

राज्य प्रशासनात कार्यक्षमतेला गती-राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये ७० हजार पदे भरल्यानंतर प्रशासनाच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ होईल. भरती प्रक्रियेत कोणताही पक्षपात किंवा अन्याय होउ नये, यासाठी संपूर्ण प्रणाली पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले. तरुणांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी स्वच्छ, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित भरती प्रणाली उभारण्यावर शासनाचा भर असेल.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे मनुष्यबळ व्यवस्थापन माडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. इतर राज्यांनीही हे माडेल स्वीकारावे, असे निर्देश पंतप्रधानांनी दिल्याचे त्यांनी नमूद केले. येणा-या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफार्मचे नवे माडेल उभे राहील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## कारचा भीषण अपघात :

क्यता आहे. अपघातात पाटील याचा तेवीस वर्षीय मित्र यश चौधरी जखमी झाला आहे. संभाजी पाटील हे बालेवाडी क्रीडा संकुलात क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत होते.आंतरराष्ट्रीय कीर्तीचा नेमबाज संभाजी पाटील आणि त्याचा मित्र प्रणय प्रशांत चौधरी हे दोघे फार्च्यूनर कारने (क्र.एङ ०५ PB ५०५५ ) गुजरातच्या दिशेने जात होते. याच वेळी दुर्वेश गाव हद्दीत प्रणय याने भरधाव कार दुस-या वाहिनीतून पहिल्या वाहिनीत नेताना समोरच्या हायवा ट्रकचा अंदाज न आल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात नेमबाज पाटील यांचा जागीच मृत्यू झाला तर प्रणय जखमी झाला. ही घटना घडल्यानंतर महामार्ग पोलीस आणि मनोर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाटील याला रुग्णालयात नेले. मात्र त्याला मृत घोषित करण्यात आले. पाटील याच्या मृतदेहाचे शव विच्छेदन करण्यात आले असून त्याचा मृतदेह त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे. तेथून ते छत्रपती संभाजी नगर या त्यांच्या मूळ गावी नेले जाणार आहे. या प्रकरणात मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून पुढील तपास पोलीस उप निरीक्षक बालाजी मुंढे करत आहेत. संभाजी पाटील हे भारतीय नेमबाज आहेत १० आणि ५० मीटर पिस्तूल नेमबाजी प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतात १३ जानेवारी १९९९ रोजी संभाजी यांचा जन्म झाला असून त्यांनी राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय कनिष्ठ स्पर्धा मध्ये भाग घेतला आहे २०१६ मध्ये गबाना येथे झालेल्या पंचवीस मीटर पिस्तूलनेंबजीच्या पुरुष कनिष्ठ स्पर्धेत सुवर्णपदक देखील पटकावले होते

२०१७ च्या कनिष्ठ नेमबाजी विष्वचषक स्पर्धेत सांघिक रौप्य पदक मिळवले होते २०२५ मध्ये ६८ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत विविध आयएसएस कनिष्ठ विश्वाचषकांमध्ये संभाजी यांनी सक्रियपणे भाग घेतला आहे अलीकडेच त्यांची राष्ट्रीय नेमबाज म्हणून निवड झाली होती प्रशिक्षक अक्षवे अष्टपुत्रे आणि जसपाल राणा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ही मजल मारली होती.

## महिलांना मंगळसूत्र उतरवायला

सुरक्षारक्षकांनी धातूचे साहित्य आत नेता येणार नाही, असे सांगत महिलांना मंगळसूत्रे, अंगठ्या आणि इतर दागिने काढण्याची सक्ती केली. यामुळे परीक्षा केंद्रावर गोंधळ उडाला. परीक्षार्थी महिला आणि त्यांच्याबरोबर आलेल्या नातेवाईकांची या मुळे धावपळ उडाली. हा कोणता नियम आहे? अशी विचारणा केली. असा लेखी नियम आहे का? अशी मागणी महिला उमेदवारांबरोबर आलेल्या नातेवाईकांनी केली.

याचवेळी दागिने काढून ठेवण्यासाठी नातेवाईक सोबत नसलेल्या महिलांना उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागला. यातून परीक्षा केंद्रावर अधिकच वाद उफळला. अनेक महिला उमेदवारांना चांगलाच मनस्ताप झाला. परीक्षा केंद्रावर या सक्तीमुळे महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला आणि सुरक्षिततेच्या नावाखाली ही अडवणूक चुकीची असल्याची भावना व्यक्त केली.

## तान्या नाथन होणार पहिल्या

ला ग्रॅज्युएट असून त्यांनी एलएलबी परीक्षेतही विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला होता. जन्मजात अंधत्व असूनही तान्या यांनी ब्रेल लिपी, स्क्रीन रीडिंग तंत्रज्ञान आणि अढळ संकल्पाच्या जोरावर आपलं शिक्षण पूर्ण केलं. त्यांचं हे यश केवळ वैयक्तिक मेहनतीचे उदाहरण नसून न्यायक्षेत्रातील सर्वसमावेशकतेचं प्रतीक ठरणार आहे. याच गुणवत्ता यादीत सेरेब्रल पाल्सीग्रस्त उमेदवार जोयसन साजन यांनी दुसरा क्रमांक मिळवला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने मार्ग सुकर

तान्या यांचं न्यायाधीश बनण्याचे स्वप्न २०२५ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या एका ऐतिहासिक निर्णयामुळे शक्य झाले. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केलं होतं की, 'दृष्टिहीन उमेदवारांना न्यायिक सेवेसाठी 'अपात्र' मानलं जाउ शकत नाही आणि ते या पदांच्या निवडीत सहभागी होण्यास पूर्णपणे पात्र आहेत.' न्यायालयाने असेही निर्देश दिले होते की, दिव्यांग व्यक्तींशी कोणताही भेदभाव केला जाउ नये. उलट राज्याने सकारात्मक पावलं उचलून त्यांना सर्वसमावेशक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. केवळ अपंगत्वाच्या कारणास्तव कोणत्याही उमेदवाराला संधी नाकारता येणार नाही. या निर्णयामुळे तान्या यांच्यासारख्या प्रतिभावान व्यक्तींसाठी न्यायपालिकेची दारं उघडली गेली.

तज्ज्ञांच्या मते, केरळमध्ये दृष्टिहीन उमेदवार न्यायिक सेवा परीक्षा उत्तीर्ण होउन न्यायाधीश होण्याची ही पहिलीच वेळ आहे. तान्या यांची ही कामगिरी कायदेशीर क्षेत्रात विविध अडथळ्यांचा सामना करणा-या सर्व दृष्टिहीन वकील आणि दिव्यांग व्यक्तींसाठी प्रेरणेचा सोर्स ठरेल.

**'कायद्याचा भाग असल्याचा मला अभिमान'**-कायद्याची पदवी घेतल्यानंतर तान्या यांनी कन्नूरमधील तलिपरम्बा येथे के.जी. सुनीलकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वकिलीचा सराव सुरू केला. एका दृष्टिहीन वकिलाचा अनुभव पाच महिन्यांपूर्वी 'लिंक्डइन'वर शेअर करताना तान्या यांनी लिहिलं होतं, 'कायद्याचा भाग असल्याचा मला अभिमान वाटतो. हा प्रवास जिद्द, दृढनिश्चय आणि समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण योगदान देण्याच्या इच्छेने भरलेला आहे. आव्हानं असूनही या क्षेत्रात काम करताना मला आपलेपणाची आणि ध्येयाची जाणीव होते.'

**'आमच्या क्षमतेवर मर्यादा येतात'**-त्या पुढे म्हणतात, 'मात्र, हा रस्ता सोपा नाही. सर्वात मोठा अडथळा म्हणजे 'एक्सेसिबिलिटी' विशेषत? कागदी कागदपत्रांच्या बाबतीत. जेव्हा तुम्ही डोळ्यांवर विश्वास ठेवू शकत नाही, तेव्हा फाईल्स, केस रिपोर्ट आणि पुराव्यांचे ढीग वाचणं ही एक मोठी मर्यादा ठरते. न्यायालयात ही स्थिती अधिक कठीण असते सुनावणी दरम्यान किंवा युक्तिवाद तयार करताना ही कागदपत्रं वाचण्यासाठी अनेकदा कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध नसते. यामुळे आमच्या क्षमतेवर मर्यादा येतात आणि इतरांवरील अवलंबित्व वाढतं.'

**'डिजिटलायझेशनच्या दिशेने पाउल उचलण्याची गरज'**

'न्यायक्षेत्र ख-या अर्थाने सर्वसमावेशक बनवण्यासाठी आपल्याला डिजिटलायझेशनच्या दिशेने पाउल उचलण्याची गरज आहे. डिजिटल ड?क्युमेंट्स आणि न्यायालयांमध्ये स्क्रीन रीडर, ब्रेल डिस्प्ले किंवा ऑडिओ उपकरणांसारख्या सहाय्यक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास मोठा बदल होईल. हे वकिली व्यवसायाला केवळ सोयीचं बनवण्यासाठी नाही, तर प्रत्येक वकिलाला समान संधी आणि सन्मान मिळवून देण्यासाठी आवश्यक आहे.'

## प्रकाशनापूर्वीच नरवणे यांच्या

ओम बिर्ला यांनी त्यांना परवानगी दिली नाही.

२-३ फेब्रु वारी-राहुल यांनी कारवाँ मासिकाचा लेख वाचण्याचा प्रयत्न केला.लोकसभेत २-३ फेब्रु वारी रोजी राहुल गांधींनी एका मासिकात छापलेला लेख वाचण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी दावा केला होता की, यात नरवणे यांच्या पुस्तकातील काही अंश आहेत. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना परवानगी दिली नाही. त्यानंतर लोकसभेत गदारोळ झाला, ज्यामुळे कामकाज तहकूब करण्यात आले होते. तर, गदारोळ करणा-या आठ खासदारांना निलंबित करण्यात आले होते.

४ फेब्रु वारी- राहुल नरवणे यांच्या पुस्तकाची प्रत घेउन संसदेत पोहोचले. दुस-या दिवशी ४ फेब्रु वारी रोजी राहुल पुस्तकाची प्रत घेउन संसदेत पोहोचले. ते म्हणाले की, जर आज पंतप्रधान आले तर मी त्यांना हे पुस्तक देईन. राहुल यांनी पुस्तकाचे ते पान उघडून दाखवले, ज्यात लिहिले होते की, पंतप्रधानांनी लष्करप्रमुखांना सांगितले होते- 'जे योग्य वाटेल ते करा!'. राहुल म्हणाले की, सरकार आणि संरक्षण मंत्री म्हणत आहेत की, या पुस्तकाचे अस्तित्व नाही. हे बघा, हे आहे पुस्तक.

नरवणे यांचे आत्मचरित्र 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी', प्रकाशित झालेले नाही. राहुल गांधी संसदेत ज्या पुस्तकाच्या आधारावर डोकलाममध्ये चिनी रणगाडे घुसल्याचा दावा करत आहेत, ते पुस्तक माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांनी लिहिले आहे. 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' नावाचे हे पुस्तक अजून प्रकाशित झालेले नाही. त्याचे हार्डकव्हर एप्रिल २०२४ पासून ऑनलाइन श?पिंग साइट्सवर उपलब्ध आहे. या पुस्तकात चीनसोबत भारतीय लष्कराच्या २०२० च्या चकमकी तसेच अग्निवीर योजनेचे पुनरावलोकन करण्यात आले आहे.

नरवणे २०१९ ते २०२२ पर्यंत लष्करप्रमुख होते. त्यांनी गेल्या वर्षी कसौली येथे आयोजित खुशवंत सिंह साहित्य महोत्सवात सांगितले होते की, त्यांनी आपले पुस्तक पेंग्विन पब्लिशर गुरु पला छपाईसाठी दिले आहे. आता हा प्रकाशक आणि सरकार यांच्यातील मामला आहे. पुस्तक संरक्षण मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे. एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे, परंतु ते प्रकाशित करण्याची मंजुरी मिळालेली नाही.

## अमरावती ग्रामीण पोलीस दलात

विभाग, अमरावती (दूरध्वनी : ०७२१-२५५३०५५) किंवा पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. भरतीसंदर्भात अडचणी असल्यास हेल्पलाईन क्रमांक ७०३०००६८१९ वर संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## दहावी–बारावी परीक्षेसाठी

कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, परीक्षा काळात विद्यार्थी, पालक व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अचलपूर बाजार समितीचे

नांव आघाडीवर असले तरी अमोल चिमोटे पुन्हा उपसभापती पदावर आसीन होतील का ? ही चर्चा प्रामुख्याने सुरू आहे.

## बलाढ्य संघातील लढतीने

अमरावती विद्यापीठ विरुद्ध शहीद महेंद्र कर्मा विश्वविद्यालय बस्तर यांच्यात पुन्हा सामना झाला आणि त्या सामन्यांमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ४ - १ ने बस्तरवर मात केली. पंजाब विद्यापीठ चंदिगड विरुद्ध एमडीयु रोहतक यांच्यातील सामना अटीतटीचा झाला आणि अखेर पंजाब विद्यापीठाणे ७ - ६ ने जिंकला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विरुद्ध कालिकत विद्यापीठ यांच्यातील सामना कालिकतने २ - १ ने जिंकला. एल पी युनिव्हर्सिटी विरुद्ध अमृतसर विद्यापीठ यांच्यात एकतर्फी झालेला सामना ६ - ० ने एल पी विद्यापीठाने जिंकला . उद्या अंतिम सामने होणार असून त्यामधून प्रथम द्वितीय व तृतीय स्थान निश्चित होईल

## मनोरुग्ण युवतीवर अत्याचार

गांभीर्य लक्षात घेता अमरावती ग्रामीण पोलिसांचे फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले असून, पुरावे संकलनाची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक दळवी, संजय वाघमारे व नितेश वाघ करीत आहेत.

## मोबाईल हिसकावणारे

मोबाईलवर बोलत असतानाच दुचाकीवरील मागे बसलेल्या युवकाने अचानक मोबाईल हिसकावून घेतला आणि दोघे पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. क्षणातच परिस्थिती ओळखून निजलने जोरात आरडाओरड केली. मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांनी तात्काळ पाठलाग करत दुचाकीसह दोघांना अडवले आणि पकडून ठेवले. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले व दोघांनाही ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत मोबाईल हिसकावणारे दोघेही अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत. दरम्यान, नागरिकांच्या तत्परतेमुळे मोठी घटना टळली असून, पहाटेच्या वेळी एकटे फिरताना सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## अपघातात पती ठार; पत्नी गंभीर

आहे. पुढील तपास आसेगाव पूर्णा पोलीस करीत आहेत. दरम्यान या अपघातामुळे गवई कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## उड्डाणपुलाच्या पिलरला ट्रकची धडक

वळवण्यात आली. परिणामी, चारचाकी व दुचाकी वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.उल्लेखनीय म्हणजे, या उड्डाणपुलाच्या कामाबाबतचे प्रकरण सध्या मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. उड्डाणपुल पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने दिलेली ३१ डिसेंबरची मुदत केव्हाच संपुष्टात आली असताना, अद्याप काम पूर्ण न झाल्याने नागरिकांमध्ये असंतोष आहे.दरम्यान, आजच्या या घटनेमुळे चित्रा–पठाण चौकातील उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामावर आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस व प्रभावी सुरक्षा उपाय राबवावेत, अशी जोरदार मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.

## फुल उत्पादकांची जिल्हाधिकारी

,लिली अशा विविध प्रकारची फुले विक्रीसाठी आणतात. परंतु गेल्या काही महिन्यापासून एपीएमसी चे गाडे भाडेतत्त्वावर किंवा लीज दिलेल्या गाडेधारक तसेच महानगरपालिका अतिक्रमण कर्मचारी शेतकऱ्यांच्या मालाला अक्षरशा पायदळी तुडवत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. फुल उत्पादक शेतकरी हे व्यापारी नसून स्वतः कष्टाने ,मेहनतीने उत्पण करणारे शेतकरी आहे. त्यांच्याशी असे अशोभनीय व्यवहार करणे निंदनीय आह. या त्रासापासून मुक्ती देण्याची विनंती करण्यात आली. यावेळी प्रकाश साबळे, अमोल भेंडे, रावसाहेब, अतुल किटुकले, पंकज ठाकरे, योगेश पांडे, विनोद धर्माले, दिनेश मोढे, आदेश भेंडे, सुनील पगारे, हनुमंत सैरीसे, सुरेश भगत, राजू माहोरे, सागर धर्माले, भूषण पाटोदे लाला पाटोदे, भोला नाईक, दिलीप धर्माले, सतीश धर्माले, सागर मारोडकर, अमित धर्माळे, उद्धव माहोरे आदि उपस्थित होते.

## भिलटेकच्या नागोबा देवस्थानात

कुलूप फोडून त्यातील रोकड लंपास केली. सकाळी भाविक व ग्रामस्थ मंदिरात दर्शनासाठी आल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात आला, त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी शेतकरी अंकुश नरेंद्र तायडे (वय २५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## राष्ट्रसंताना 'भारतरत्न' मिळण्यासाठी

प्रस्तापित केली आहे. जातीभेद, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धा याविरोधात आयुष्यभर लढा दिला.

१९४२ च्या छोडो भारत आंदोलनात त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. त्यांनी खंजिरी भजनांनी स्वातंत्र्यसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले होते. जपानमधील जागतिक धर्म परिषद आणि विश्वशांती परिषद यामध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय, साहित्य, कला यासह सर्वच क्षेत्रात नवक्रांतीची मशाल घेऊन जनजागृती करून ग्राम नवनिर्माण करण्याचे कार्य केले. भजन, भाषण, किर्तन, रामधून, पोवाडा, भारूड, मंगलाष्टके, सुविचार, राष्ट्रसंताची पत्रे, ग्रामगीता, अभंग, लहर की बरखा या राष्ट्रसंताच्या साहित्याचा आणि सामुदायिक ध्यान व सामुदायिक प्रार्थनेचा, समाज मनावर खुप प्रभाव झाला आहे. त्यासोबतच महाराष्ट्रातील थोर महापुरूषांचा सुद्धा देशाच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. त्यामुळे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमुर्ती गाडगेबाबा, क्रांतीसुर्य महात्मा फुले, विद्येची आराध्य देवता माता सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, भारताचे पहिले कृषिमंत्री पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना भारत सरकारने यावेळीतरी भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांच्या अतुलनीय अशा कार्याचा गौरव करावा अशी मागणी तालुक्यातील गुरुदेव भक्तांनी केली आहे. यावेळी प्रशांत कांबळे, प्रदीप वाघ, मनोहर साबळे, रावसाहेब देवघरे, प्रशांत तायवाडे, स्वप्नील तूरकाने, अभय मुंद्रे, विनोद मालधुरे, हरिभाऊ घाटोळ, विजय कुरळकर, सदानंद भालेराव, अरुण पुरी, संजय दवाळे, नरेश साबळे, हेमंत पोजगे, जयंत तायवाडे, चंद्रशेखर साबळे, नंदकिशोर चरपे, साहेबराव होले, सरपंच सुरज धुमनखेडे, गणेश भुरे, निलेश पाचघरे, हरगोविंद देवघरे, विलास अजमिरे, सुखदेव राऊत, महादेव अंबुलकर, अविनाश पाचघरे, विनोद गाडगे, अंकुश डफड, प्रमोद ठवरे, विनोद बालपांडे, गौरव घोडे, अमोल बेलसरे, राजू चर्जन, प्रफुल देवघरे, सुरेश मेतकर, अनंत इंगोले, रमेश डेहनकर, संजय खेडकर यांच्यासह शेकडो गुरुदेव भक्त उपस्थित होते.

## सिंधी चौकातील खंडेलवाल

रस्त्यावरच मद्यपान करतात. यामुळे विशेषतः महिला, जेष्ठ नागरिक व लहान मुलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. सकाळ संध्याकाळ फिरायला जाणाऱ्या नागरिकांसाठी ही परिस्थिती अत्यंत बिकळ झालेली आहे. अनेक वेळा आरडाओरडा, शिवीगाळ व अनुसूचित वर्तनाच्या घटना घडताना दिसून येतात. त्यामुळे परिसरातील सामाजिक वातावरण बिघडत आहे. दुकानाच्या बाजूलाच मंदिर असल्यामुळे धार्मिक वातावरण दूषित होत आहे. या प्रकाराकडे लक्ष देऊन हे दुकान स्थानांतरित करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना नगरसेवक मनीष बजाज, मुकेश लालवानी, विकी खत्री, दिनेश आहुजा, हरीश सुंदरानी, विजय मोटवानी, हितेश पिंजाणी, सुरज पमनानी, अभिषेक पंजाबी, पवन आहूजा, मोहित भोजवानी, दिनेश मीराणी, चिराग लुल्ला, शुभम खत्री, विजय थावानी, सनी मोटवानी, अनिल गंगवानी, मोहित पोपटांनी आदि उपस्थित होते.

MAHAVITARAN

**E-Tender Notice**

Separate sealed Bids in prescribed forms are invited for execution of Empanelment of Regular Agencies for Repairing of various capacities upto100 KVA failed Distribution Transformers in Amravati Circle Amravati Zone of tender no.T-30, Empanelment of Regular Agencies for Repairing of various capacities above 100 KVA failed Distribution Transformers in Amravati Circle Amravati Zone of tender no.T-31, Empanelment of New Agencies for Repairing of various capacities up to100 KVA failed Distribution Transformers in Amravati Circle Amravati Zone of tender no. T-32 and Empanelment of New Agencies for Repairing of various capacities above 100 KVA failed Distribution Transformers in Amravati Circle Amravati Zone of tender no. T-33. •Tender Fee - **Rs. 1000 +18% GST** (Non-refundable). • Date of availability of Bid Documents on MSDCL e-tendring websites **http://works.mahadiscom.in/eTender/etender: 09.02.2026** •Last Date & Time for Submission of Bid: **01.03.2026 upto 23:55 Hrs.** For further details of Invitation for Bids & Bid Documents, please visit MSEDCL website **http://works.mahadiscom.in/eTender/etender. Superintending Engineer MSEDCL, O & M Circle Amravati Email ID. seamravati2011@gmail.com**

Superintending Engineer
PRO No. 43 M.S.E.D.C. Ltd. O&M Circle Office, Amravati

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# दहावी-बारावीला ४२ हजार विद्यार्थी प्रशासन सज्ज

## दहावीचे २० हजार तर बारावीचे २२ हजार परीक्षार्थी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. मंडळाच्या निर्देशानुसार बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान घेण्यात येणार आहे.**



यंदा वाशिम जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेसाठी २० हजार ५६, तर बारावीच्या परीक्षेसाठी २२ हजार ३६९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले असून, एकूण ४२ हजार ४२५ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षा कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परीक्षेदरम्यान सतत देखरेख ठेवली जाणार असून, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने व्यापक तयारी केली आहे.दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यात ८८ परीक्षा केंद्रांवरील ८३५ वर्गखोल्यांमध्ये, तर बारावीच्या परीक्षेसाठी ७४ परीक्षा केंद्रांवरील ८३० वर्गखोल्यांमध्ये मंडळाच्या निर्देशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरू आहे.

### उपद्रवी केंद्रांवर विशेष लक्ष

दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळाने विशेष उपाययोजना आखल्या आहेत. त्याअंतर्गत उपद्रवी परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. वाशिम जिल्ह्यात दहावीची १९ व बारावीची २८ अशी एकूण ४७ उपद्रवी परीक्षा केंद्रे असून, या ठिकाणी कोणतेही गैरप्रकार घडू नयेत यासाठी अतिरिक्त दक्षता व कडक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

तसेच सर्व परीक्षा केंद्रांवर विद्युत जोडणी, पंखे, दिवे तसेच इतर आवश्यक भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली आहे. परीक्षा कालावधीत अखंडित वीजपुरवठा राहावा यासाठी जनरेटर किंवा इन्व्हर्टरची पर्यायी व्यवस्था ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निर्देशानुसार यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून, त्यासोबतच आवश्यक सोयीसुविधांचीही पाहणी करण्यात येत आहे, अशी माहिती उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) आकाश आहाळे यांनी दिली. एकूणच यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने पूर्ण तयारी केली असल्याचे दिसून येत आहे.

# दहावी-बारावीच्या परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त राबवा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दहावी व बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, या परीक्षा पूर्णतः पारदर्शक, शांत व कॉपीमुक्त वातावरणात पार पाडणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. यासाठी सर्व केंद्र संचालक, पर्यवेक्षक व भरारी पथकांनी शिक्षण मंडळाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना अजिबात थारा दिला जाणार नाही. उपद्रवी केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, आवश्यक त्या ठिकाणी तत्काळ कारवाई केली जाईल. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था व समन्वय यंत्रणा सक्षमपणे कार्यरत ठेवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निर्देशानुसार बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान घेण्यात येणार आहे. या अनुषंगाने कॉपीमुक्त परीक्षा राबविण्यासाठी केंद्र संचालक व भरारी पथकांची आढावा सभा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## केंद्र संचालक व भरारी पथकांची आढावा सभा

### ४२ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट

यंदा वाशिम जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेसाठी २० हजार ५६, तर बारावीच्या परीक्षेसाठी २२ हजार ३६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून, एकूण ४२ हजार ४२५ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

### सीसीटीव्हीद्वारे कडक देखरेख

परीक्षा कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून, त्याद्वारे परीक्षेदरम्यान सतत देखरेख ठेवली जाणार आहे. यासाठी शिक्षण विभागामार्फत व्यापक तयारी करण्यात आली आहे.दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातील ८८ परीक्षा केंद्रांवरील ८३५ वर्गखोल्यांमध्ये, तर बारावीच्या परीक्षेसाठी ७४ परीक्षा केंद्रांवरील ८३० वर्गखोल्यांमध्ये मंडळाच्या निर्देशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरू आहे.

### उपद्रवी केंद्रांवर विशेष उपाययोजना

दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळाने विशेष उपाययोजना आखल्या आहेत. त्याअंतर्गत उपद्रवी परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. वाशिम जिल्ह्यात दहावीची १९ व बारावीची २८ अशी एकूण ४७ उपद्रवी परीक्षा केंद्रे असून, या ठिकाणी कोणतेही गैरप्रकार घडू नयेत यासाठी अतिरिक्त दक्षता व कडक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

### भौतिक सुविधांची पूर्वतयारी पूर्ण

सर्व परीक्षा केंद्रांवर विद्युत जोडणी, पंखे, दिवे तसेच इतर आवश्यक भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली आहे. परीक्षा कालावधीत अखंडित वीजपुरवठा राहावा, यासाठी जनरेटर किंवा इन्व्हर्टरची पर्यायी व्यवस्था ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निर्देशानुसार दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना राबविण्यात येत असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे व प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांनी दिली. एकूणच यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# शांतीवन अमृततीर्थ सजल विहिरीवर प्रगटदिनानिमित्त भाविकांची अलोट गर्दी

## श्री गजानन महाराजांचा १४८ वा प्रगटदिन भक्तिमय वातावरणात उत्साहात



■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या शांतीवन अमृततीर्थ सजल विहिरीवर श्री गजानन महाराजांचा १४८ वा प्रगटदिन मंगळवारी भक्तिमय वातावरणात, मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच हजारो भाविकांनी अनवाणी पायाने सजल विहिरीकडे पायी दर्शनासाठी वाटचाल केली होती.

टाळ–मृदंग, दिंड्या–पताका, हरिनामाचा गजर आणि 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सजल विहिरीवर दर्शनासाठी दिवसभर भाविकांची रीघ लागली होती. रात्री उशिरापर्यंत दर्शन सुरू होते. मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. प्रगटदिनानिमित्त श्री गजानन महाराजांची भव्य रांगोळी भाविकांचे विशेष आकर्षण ठरली. संस्थानच्या वतीने दर्शन सुलभ व्हावे यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच सुमारे ५० क्विंटल पोळी–भाजीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत संस्थानने प्रसादासाठी स्टीलच्या ताटांचा वापर केला. प्लास्टिकचा वापर टाळत प्रदूषण होऊ नये याची विशेष काळजी घेण्यात आली.

### चोख पोलिस बंदोबस्त

प्रगटदिनाच्या पार्श्वभूमीवर अकोट उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील आणि ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दर्शन व्यवस्था सुरळीत पार पडावी यासाठी पोलिस प्रशासन सज्ज होते.

### भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्त्याची व्यवस्था

अकोट शहरात तसेच शांतीवन अमृततीर्थकडे जाणाऱ्या मार्गावर विविध संघटना व मंडळांच्या वतीने भाविकांसाठी चहा, पाणी, फराळ व नाश्त्याचे स्टॉल लावण्यात आले होते. हजारो भाविकांनी या सेवांचा लाभ घेतला. शहरातही विविध ठिकाणी भंडारे व जेवणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

### विनामूल्य बस व ऑटो सेवा

अकोट ते शांतीवन अमृततीर्थ सजल विहीर हे अंतर सुमारे १० ते १२ किलोमीटर असून दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी विविध संघटना व नागरिकांच्या पुढाकारातून विनामूल्य बस व ऑटो सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

### खराब रस्त्यामुळे भाविकांची तीव्र नाराजी

दरम्यान, अकोट–पोपटखेड ते शांतीवन अमृततीर्थ या मार्गावरील अत्यंत खराब रस्त्यामुळे भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. रस्त्यावर बारीक दगड व गिट्टी असल्याने अनेक भाविकांच्या पायाला जखमा झाल्याचे दिसून आले. प्रगटदिनाच्या दिवशी हजारो भाविक या मार्गाने पायी जाणार, याची माहिती असूनही प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आदिवासी विकास विभागातर्फे परदेशातील शैक्षणिक संस्थांत २०२६-२७ या वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएडी अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

परदेशातील संबंधित शैक्षणिक संस्था जागतिक क्रमवारीत २०० च्या आत असावी. उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. उमेदवाराच्या पालकांचे, कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नसावे.

विहीत निकषांनुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास उत्पन्न मर्यादा १० लाखापर्यंत, तसेच विद्यापीठाची जागतिक क्रमवारी ३०० पर्यंत शिथील केली जाईल.

# कुख्यात गोवंश चोर शेख रेहान एमपीडीए अंतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध

## अकोला जिल्ह्यातील २०२६ मधील पाचवा धोकादायक इसम; पोलिसांचा कडक संदेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेला सतत आव्हान देणाऱ्या कुख्यात गुंड व सराईत गोवंश चोर शेख रेहान शेख रशीद (वय २२) यास एमपीडीए (महाराष्ट्र प्रतिबंधक नजरकैद) कायद्यान्वये एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. सन २०२६ मधील अकोला जिल्ह्यातील हा पाचवा धोकादायक इसम ठरला आहे.

अकोला शहरातील पिंजारी गल्ली, कच्छी मस्जीद मागे, मच्छी मार्केट परिसरातील रहिवासी असलेल्या शेख रेहानवर यापूर्वी गोवंश चोरी, जनावरांची निर्घृण हत्या अथवा विकलांग करणे, गुन्ह्याचा पुरावा नष्ट करणे, खोटी माहिती देणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे तसेच हद्दपार आदेशाचे उल्लंघन असे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर विविध कलमान्वये प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या होत्या. इतकेच नव्हे तर त्यास अकोला जिल्ह्यातून हद्दपारही करण्यात आले होते, मात्र त्याचा त्याच्यावर कोणताही परिणाम झाला नाही.

सराईत गुन्हेगारी वृत्ती कायम राहिल्याने आणि तो कायदेशीर कारवाईस जुमानत नसल्याने पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी त्यास स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी अकोला यांच्याकडे सादर केला होता. सर्व कायदेशीर बाबींची तपासणी व स्वतंत्र



स्रोतांद्वारे माहितीची खातरजमा केल्यानंतर जिल्हादंडाधिकारी श्रीमती दर्षा नीना यांनी शेख रेहान हा धोकादायक व्यक्ती असल्याचे स्पष्ट होताच दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी एक वर्षासाठी स्थानबद्धतेचा आदेश पारित केला.

या आदेशानुसार तात्काळ कारवाई करत शेख रेहानचा शोध घेऊन त्यास आदेश तामील करण्यात आला व दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा व अकोट फाईल पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्तरित्या ही कारवाई यशस्वी केली. दरम्यान, 'अकोला जिल्ह्यात शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कारवाईस न जुमानणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए व इतर कठोर कायद्यांतर्गत कठोर पावले उचलण्यात येतील,' असा कडक इशारा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला आहे.

# अल्पवयीन बालिकेचा बालविवाह रोखण्यात चाईल्ड हेल्प लाईनला यश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मंगरूळपीर तालुक्यातील ग्राम पिंपळखुटा येथे होऊ घातलेला सोळा वर्षीय बालिकेचा बालविवाह वेळेत रोखण्यात आला. सदर बालविवाहबाबत चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर बालिकेच्या वयाची तात्काळ खातरजमा करण्यात आली. यानंतर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे यांच्या आदेशानुसार सयुक्तपथक गठीत करण्यात आले.त्यानंतर जिल्हा बाल सरक्षण अधिकारी भगवान ढोले, प्रकल्प समन्वयक अविनाश सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली रमेश वाघ, प्रतिभा घनसावंत व नीलिमा भोंगाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन बालिका व तिच्या पालकाचे समुपदेशन केले.

बालविवाहाचे कायदेविषयक परिणाम, आरोग्यविषयक धोके व मुलीच्या भवितव्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. समुपदेशनानंतर मुलीचे वय पूर्ण १८ वर्ष होईपर्यंत विवाह करणार नाही असे पालकाकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले. त्यामुळे होऊ घातलेला बालविवाह यशस्वीपणे रोखण्यात आला. या कारवाई साठी तालुका सरक्षण अधिकारी रुपेश सुरजुशे, ग्रामसेवक, सरपंच, अंगणवाडी सेविका यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

> बालविवाह ही गंभीर सामाजिक समस्या असून त्याचे परिणाम मुलींच्या आरोग्य, शिक्षण व सर्वांगीण विकासावर दीर्घकाळ परिणाम करणारे असतात. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ च्या माध्यमातून मिळालेल्या गोपनीय माहितीवर तात्काळ कारवाई करून संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यामुळे हा बालविवाह वेळेत रोखता आला. जनजागृती, समुपदेशन आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यामुळेच अशा घटनांना आळा घालणे शक्य आहे. नागरिकांनी अशा प्रकारची माहिती निर्भयपणे प्रशासनाला कळवावी, जेणेकरून प्रत्येक बालिकेचे बालपण व भविष्य सुरक्षित करता येईल.
>
> **उत्तम शिंदे,** जिल्हा महिला व बालविकास अधिकारी

# अमोल पाटणकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी अमोल भाऊ पाटणकर यांच्या वाढदिवसानिमित्त दी . ९ जानेवारी रोजी कारंजा-मानोरा तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतून समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यात आला.

कारंजा येथील श्री संत गजानन महाराज मूकबधिर विद्यालय तसेच भायजी महाराज वृद्धाश्रम येथे फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. यासोबतच रोहणा ग्रामपंचायत, ता. मानोरा येथे शालेय विद्यार्थ्यांना वह्या, पेन आदी शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच पोहा येथील अंगणवाडीत शिक्षण घेत असलेल्या चिमुकल्या बालकांना शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. हा सामाजिक उपक्रम अमोल पाटणकर मित्र मंडळाच्या वतीने राबविण्यात आला. यावेळी राम देशमुख, मंगेश कडेल, अक्षय जगताप, गणेश जानकर, सुनील मसने, आशिष काजे, गौरव उसरटे, दीपक घोगलिया तसेच अमोल पाटणकर मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चान्नी पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात सोपीनाथ महाराज यात्रा शांततेत संपन्न

## ६० पोलीस व होमगार्डचा तगडा बंदोबस्त; हजारो भाविकांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या दिग्रस बु. येथील श्री सोपीनाथ महाराज यात्रा महोत्सवाचा ७ फेब्रुवारी रोजी शांततेत समारोप झाला. चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल ६० पोलीस कर्मचारी व होमगार्डच्या कडेकोट बंदोबस्तात ही यात्रा यशस्वीरीत्या पार पडली.

सोपीनाथ महाराज देवाच्या विवाह सोहळ्याचा मुख्य दिवस २ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यात्रेचे मुख्य दिवस शुक्रवार (६ फेब्रुवारी) व शनिवार (७ फेब्रुवारी) असून या दोन दिवसांत संपूर्ण जिल्ह्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. अनेक भाविकांनी राहुट्या उभारून आठ दिवस मुक्कामी राहून भक्तीभावाने सेवा



केली. यात्रा कालावधीत दररोज रात्री ८.३० वाजता कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ह.भ.प. संतोष पाटील महाराज (चांगलवाडी), ह.भ.प. गोपाळ महाराज उरळ, ह.भ.प. शुभम महाराज आखरे (खिरपुरी), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज केकन, ह.भ.प. गजानन महाराज गायकवाड, ह.भ.प. नंदू महाराज इंगळे (चांदूर) तसेच ह.भ.प. रामकृष्ण महाराज कचाले यांनी कीर्तन सेवा दिली. पंचक्रोशीतील सर्व टाळकरी मंडळांनीही सहभाग नोंदवला.

यात्रेच्या मुख्य दिवशी हलवाई दुकाने, हॉटेल, खानावळी, पालपडवे, आकाश पाळणे, भजन, दिंड्या, मनोरंजनाचे कार्यक्रम यामुळे परिसर गजबजून गेला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चान्नी पोलीस स्टेशनकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

यात्रा यशस्वी होण्यासाठी राम ताले, अनंता गावंडे, दत्तात्रय ग. ताले, विठ्ठल म. ताले, बाजीराव ताले, रविंद्र गवई, अनिल ताले, साहेबराव शेगावकर यांच्यासह ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केले. भाविकांनी शिस्त पाळून प्रशासनाला सहकार्य केल्याबद्दल श्री सोपीनाथ महाराज संस्थान दिग्रस बु. चे अध्यक्ष विजय ताले, पंच कमिटी व गावकरी मंडळी यांनी समाधान व्यक्त केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७६ ■ मंगळवार १० फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# रेल्वे राजपत्रावर हिंगणघाटाच्या नागरिकांनी केला अधिग्रहणाला विरोध

## आमदार समीर कुणावार आक्रमक : 'जनसुनावणीशिवाय एक इंचही जमीन देणार नाही

**हिंगणघाट जनमाध्यम:** रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गाच्या विस्तारीकरणासाठी हिंगणघाट शहरातील रहिवासी भागातील जमीन अधिग्रहित करण्याबाबत केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाकडून राजपत्र प्रसिद्ध होताच शहरात तीव्र असंतोष पसरला आहे. कोणतीही जनसुनावणी न घेता आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता ही प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोप होत असून, याविरोधात आमदार समीर कुणावार यांनी रोखठोक भूमिका घेतली आहे. या संभाव्य अधिग्रहणामुळे अब्दुल्ला नगर, मारोती वार्ड, संत गोमाजी वार्ड, पुखराज कॉलनीसह रेल्वे मार्गालगतच्या शेकडो घरांवर संकटाचे सावट निर्माण झाले आहे.



या पार्श्वभूमीवर आमदार कुणावार यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय कार्यालयात रेल्वे व महसूल प्रशासनाची महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीस उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे, किशोर दिघे तसेच रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आमदार कुणावार यांनी अधिकाऱ्यांना थेट जाब विचारत सांगितले की, हे पाकिस्तान नाही. लोकांच्या भावनांशी खेळू नका. जनसुनावणीशिवाय जमीन अधिग्रहण मान्य नाही. सर्व्हे क्रमांक २०२, २०६, २०८ व इतर भागांतील नागरिकांची सुनावणी का झाली नाही, याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रत्यक्ष प्रकल्प मार्किंग होऊन

> आम्ही विकासाच्या विरोधात नाही. पण घराघरांवर बुलडोझर चालवून होणारा विकास मान्य नाही. कोणत्याही नागरिकाचे नुकसान होऊ देणार नाही.
>
> **आमदार समीर कुणावार**

किती घरे बाधित होणार आहेत हे स्पष्ट झाल्याशिवाय पुढील कोणतीही कार्यवाही करू नये, तसेच शहरी भागासाठी मोबदल्याचा फॅक्टर १ नुसार नियम लागू होतो की नाही, याची तपासणी करण्याचे निर्देश आमदारांनी दिले. चौथ्या रेल्वे लाईनसाठी पुरेशी जागा उपलब्ध असताना रहिवासी वस्तीत अधिग्रहण कशासाठी, असा प्रश्न करत त्यांनी थेट नागपूर येथील डीआरएम यांच्याशी संपर्क साधला. मालधक्क्यासाठी जागा आवश्यक असल्यास तो शहराबाहेर किमान दोन किलोमीटर अंतरावर हलवावा, अन्यथा नगर परिषद व नागरिक कधीही परवानगी देणार नाहीत, असा स्पष्ट इशाराही आमदार कुणावार यांनी दिला. आमदारांच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासनाने तूर्तास ही प्रक्रिया स्थगित करत बाधित नागरिकांशी स्वतंत्र बैठक घेऊनच पुढील निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

# सिलेंडरचा भीषण स्फोट; घराची राखरांगोळी

## दैव बलवत्तर म्हणून जीवितहानी टळली, वडाळा येथील थरारक घटना

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील अप्पर वर्धा धरणाच्या काठावर वसलेल्या वडाळा गावात मंगळवारी (दि. ९) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास घरगुती गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन एक घर पूर्णतः उद्ध्वस्त झाले. या दुर्घटनेत घरमालक शांताबाई भाऊराव भिवापूरे थोडक्यात बचावल्या असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



वडाळा गावातील अंगणवाडी परिसरात असलेल्या शांताबाई भिवापूरे यांच्या घरात स्वयंपाकासाठी लावलेला गॅस सिलेंडर अचानक फुटला. स्फोट इतका तीव्र होता की घरावरील छत हवेत उडाले, भिंती कोसळल्या आणि काही क्षणांतच घराची अक्षरशः राखरांगोळी झाली. सुदैवाने स्फोटाच्या वेळी शांताबाई शेजारी बसायला गेल्या होत्या. त्या घरात असत्या तर अनर्थ ओढवला असता, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

सायंकाळच्या शांततेत अचानक झालेल्या प्रचंड स्फोटाने संपूर्ण गाव हादरले. आगीचे लोळ आणि आकाशात पसरलेला काळा धूर पाहून शेतात काम करणारे शेतकरी धावत घटनास्थळी पोहोचले. गावकऱ्यांनी एकत्र येत आग आटोक्यात आणली. घटनेची माहिती तातडीने आष्टी पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

विशेष म्हणजे स्फोट झालेल्या घराच्या शेजारीच अंगणवाडी आहे. स्फोटाची वेळ थोडी पुढे किंवा अंगणवाडी सुरू असती, तर मोठी दुर्घटना घडली असती. त्यामुळे दैव बलवत्तर ठरल्याची भावना गावभर पसरली असून सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मात्र या दुर्घटनेत शांताबाई भिवापूरे यांचे घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे. दोन वेळच्या जेवणाचा आणि निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# सावंगी रुग्णालयात नवजात शिशूचा मृत्यू; जखमेच्या खुणांनी संशय गडद

## शरीरावर १.५ ते २ सेमी जखम आढळल्याचा दावा; चौकशीची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात दोन दिवसांच्या नवजात शिशूचा मृत्यू झाल्याची घटना समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. शिशूच्या शरीरावर १.५ ते २ सेमी आकाराची जखम आढळल्याचा दावा नातेवाईकांकडून करण्यात आला असून, त्यामुळे मृत्यूच्या कारणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

नवजाताच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांनी डॉक्टरांच्या निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. शिशूचे वडील आकाश पचारे यांनी गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत तसेच शिशूच्या उपचारांदरम्यान आवश्यक ती काळजी घेतली गेली नसल्याचा आरोप करत, संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, उपचार प्रक्रियेत झालेल्या त्रुटींमुळेच हा दुर्दैवी प्रसंग ओढवला.

या प्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी तपास सुरू केला असून, शनिवारी (७ फेब्रुवारी) दोन डॉक्टरांच्या उपस्थितीत शिशूचे शवविच्छेदन करण्यात आले आहे. मात्र, अद्याप शवविच्छेदन अहवाल प्राप्त झालेला नाही. हा अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याने सर्वांचे लक्ष त्याकडे लागले आहे.

दरम्यान, आकाश पचारे यांनी रुग्णालय प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करून त्यांच्या पत्नी व नवजात शिशूच्या उपचारांबाबतची संपूर्ण माहिती मागितली आहे. गर्भधारणेपासून प्रसूती, तसेच शिशूच्या मृत्यूपर्यंत करण्यात आलेल्या उपचारांचा सविस्तर तपशील, संबंधित डॉक्टरांच्या नोंदी आणि सर्व वैद्यकीय अहवाल उपलब्ध करून देण्याची त्यांनी मागणी केली आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही त्यांनी विनंती केली आहे.

या घटनेमुळे पचारे कुटुंबाला मोठा धक्का बसला असून, कुटुंबीय सध्या तीव्र दुःखात आहेत. शवविच्छेदन अहवालातून काय निष्पन्न होते, यावरच या प्रकरणाची पुढील दिशा ठरणार आहे.

# नियमित वीज नाही; उभ्या पिकांवर संकटाचे सावट

## महाबळा येथील शेतकऱ्यांचे अभियंत्यांना निवेदन

### किसान अधिकार अभियानचा इशारा : १२ तास अखंड वीज द्या, नाहीतर आंदोलन

**सेलू जनमाध्यम :** नियमित आणि पुरेशा विद्युत पुरवठ्याअभावी शेतीचे सिंचन ठप्प झाले असून उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाबळा येथील शेतकऱ्यांनी किसान अधिकार अभियानच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि. ९ फेब्रुवारी) वीज वितरण कंपनीच्या अभियंत्यांना निवेदन सादर केले.



सध्या रब्बी हंगामातील पिके जोमात असताना वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देता येत नसून सिंचनाअभावी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. एकीकडे अवकाळी हवामान आणि दुसरीकडे महावितरणचा लहरी कारभार यामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी दिवसा किमान १२ तास अखंड वीज पुरवठा देण्याची ठाम मागणी केली. आधीच शेतीमालाला योग्य भाव मिळत नसताना, उत्पादनात घट झाल्यास शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. वाढता कर्जबाजारीपणा आणि घटते उत्पन्न यामुळे ग्रामीण भागात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याबद्दलही तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. वीज पुरवठ्यात तातडीने सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा किसान अधिकार अभियानने यावेळी दिला आहे.

> शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. त्यात तांत्रिक बिघाड आणि लोडशेडिंगमुळे सिंचन पूर्णपणे ठप्प झाले आहे. प्रशासनाने वेळीच दखल घेऊन १२ तास अखंड वीज पुरवठा न दिल्यास शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक अटळ आहे.
>
> **सुदाम पवार,** जिल्हाध्यक्ष, किसान अधिकार अभियान

यावेळी सरपंच प्रमोद ढुमणे, संजय कोल्हे, राजू पोहाणे, विठ्ठल गुजरकर, संजय पुंड, मिलिंद पाटील, रामचंद्र भावरकर, वामन तळवेकर, नारायण तळवेकर, परीमल कोठेकर, नागो तडस, संजय बजाईत, अमित उमाटे यांच्यासह महाबळा परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी व किसान अधिकार अभियानचे पदाधिकारी उपस्थित होते.

# तळेगाव टी-पॉईंटवर मृत्यूचा सापळा

## ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे तरुणाचा जागीच बळी

**तळेगाव (शा.पं.) । जनमाध्यम-** तळेगाव शा. पंत येथील टी-पॉईंटवर सुरू असलेले उड्डाणपुलाचे काम म्हणजे नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला थेट खेळ असल्याचे पुन्हा एकदा रक्तरंजित वास्तव समोर आले आहे. अर्धवट, संथ आणि कोणतेही नियोजन न करता सुरू असलेल्या या कामामुळे अखेर आणखी एका निष्पाप तरुणाचा जीव गेला.

उड्डाणपुलाचे काम अपूर्ण अवस्थेत असतानाही बाजूने वाहतूक सुरू ठेवण्यात आली आहे. रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे, गिट्टीचे ढीग, सिमेंटचे कच्चे साहित्य विखुरलेले आहे. विशेष म्हणजे, कोणतेही सूचना फलक, बॅरिकेड्स, रिफ्लेक्टर किंवा प्रकाशाची व्यवस्था नाही. अंधारात हा रस्ता म्हणजे सरळ मृत्यूचा



सापळा बनला आहे. याच निष्काळजीपणाचा बळी कुऱ्हा येथील राहुल जाधव (वय ३०) या कर्त्या तरुणाला द्यावा लागला. राहुल हा दुचाकी क्रमांक एम.एच. ४० बी.झेड. ८५०७ ने दुधाळा (कोंढाळी) येथील कंपनीत कामासाठी जात असताना सायंकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास तळेगाव टी-पॉईंटवर पोहोचला. अंधारात रस्त्यावर पडलेले गिट्टीचे ढीग आणि सिमेंटचे साहित्य त्याच्या लक्षात न आल्याने दुचाकी घसरली व जोरदार धडकेत राहुलचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर राहुलच्या मागून येणाऱ्या आर्वी येथील तीन जणांची दुचाकीही अपघातग्रस्त झाली. त्यातील एकाची प्रकृती गंभीर असून त्याला प्रथम आर्वी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र स्थिती चिंताजनक झाल्याने पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर करण्यात आले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. संतप्त नागरिकांनी ठेकेदार, संबंधित मॅनेजर आणि कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला. कोणतेही नियोजन नाही, सुरक्षा नाही, तरीही वाहतूक सुरू. मग जबाबदारी कोणाची असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. विशेष म्हणजे, याच ठिकाणी अवघ्या पंधरा ते वीस दिवसांपूर्वी एका २२ वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हाच प्रशासनाने जागे होऊन योग्य उपाययोजना केल्या असत्या, तर आजचा हा बळी टाळता आला असता. ही बेपर्वाई केवळ चूक नसून, थेट गुन्हा असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. पुढील तपास ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय किशोर खंडार, पोलीस शिपाई सचिन ढाले करीत आहेत.

प्रशासनाने तात्काळ पावले उचलून उड्डाणपुलाच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि पुन्हा कोणाचाही जीव जाऊ देऊ नये, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

# आज पासून बारावीची परीक्षा

## केंद्र परिसरात कलम १६३ लागू

**वर्धा जनमाध्यम :** उच्च माध्यमिक व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जिल्ह्यातील विविध केंद्रावर आयोजित करण्यात आल्या आहे. सदर परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी परीक्षा कालावधीत केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

इयत्ता १२ वीची दि.१० फेब्रुवारी ते १८ मार्च तसेच इयत्ता १० वीची दि. २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान घेण्यात येत आहे. परीक्षेचे संचालन सुयोग्य प्रकारे व्हावे यासाठी परीक्षा कालावधीत सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळात जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे.



परिक्षेकरीता जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात २ अथवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या जमावावर आणि सदर परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परीसरात सर्व झेरॉक्स, मोबाईल, एसटीडी, आयएसडी, फॅक्स, संगणक, ई-मेल, इंटरनेट इत्यादी ईलेक्ट्रॉनिक उपकरणे व ईलेक्ट्रॉनिक सुविधांच्या वापरावर व परीक्षा केंद्राजवळील १०० मीटर परीसरातील केंद्र सुरु राहण्यावर निर्बंध, प्रतिबंध लावण्यात आले आहे. या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी काढलेल्या आदेशात नमुद करण्यात आले.

# शेगाव कुंडात जंगली डुकराचा हल्ला; दोन महिला शेतमजूर गंभीर जखमी

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील शेगाव कुंड येथे जंगली डुकराच्या हल्ल्याची धक्कादायक घटना घडली. दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी शेतातून कापूस वेचणी करून परत येत असताना रस्त्यात अचानक एका जंगली डुकराने दोन महिला शेतमजुरांवर हल्ला केला. या घटनेत दोघीही महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या हल्ल्यात शबाना पापा शेख यांच्या खांद्याला डुकराच्या दाताने गंभीर जखम झाली असून दोन्ही गुडघ्याच्या वरच्या भागाला मोठ्या जखमा झाल्या आहेत. तसेच आरती प्रकाश वंजारी यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले



आहे. हल्ल्यानंतर परिसरात घबराट पसरली.

मोलमजुरीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या महिलांवर या घटनेमुळे मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. उपचाराचा खर्च आणि काम बंद पडल्याने त्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे. घटनेची माहिती मिळताच शेगाव कुंड ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी तात्काळ वन विभागाशी संपर्क साधला. वन विभागाच्या हिंगणघाट बीटचे अधिकारी योगेश पाटील व त्यांच्या पथकाने उपजिल्हा रुग्णालयात जाऊन जखमींची पाहणी केली तसेच घटनास्थळी भेट देऊन तपासणी केली. जखमी महिलांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याचे आश्वासन वन विभागाकडून देण्यात आले आहे.

या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून जंगली श्वापदांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# गजानन महाराजांच्या प्रगटदिनाला जामणीत विकासाचे लोकार्पण

### आईच पहिली गुरु; संस्कारांची मूळ शिदोरी आईकडूनच : खासदार अमर काळे

**जामणी जनमाध्यम :** गजानन महाराजांच्या पावन प्रगटदिनाचे औचित्य साधत जामणी येथे खासदार स्थानिक विकास निधी २०२५-२६ अंतर्गत गजानन महाराज मंदिरासमोरील १० लाख रुपयांच्या काँक्रिटीकरण कामाचे लोकार्पण खासदार अमर काळे यांच्या अध्यक्षतेखाली व शेखर शेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्त मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. खासदार अमर काळे यांच्या जामणीतील आगमनावेळी ढोल-ताशांच्या गजरात घोड्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मंदिर प्रवेश केल्यानंतर त्यांनी संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले व गावकऱ्यांसोबत बसून कीर्तनाचा आस्वाद



घेतला. त्यानंतर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात सौ. रोशनी झाडे, शेखर शेंडे व अभ्युदय मेघे यांनी उपस्थित मनोगत व्यक्त केले. आपल्या भाषणात खासदार अमर काळे यांनी राजेश झाडे व रोशनी झाडे यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव केला. समाजातील दिनदुबळ्यांसाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न व परिसराच्या विकासासाठी असलेली त्यांची तळमळ उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

माझे पक्षकार .सौ आश्लेषा वामनराव फुलझेले हे मौजा - वर्धा तह. - जिल्हा वर्धा. मौजा क्रमांक. ८५,शीट क्रमांक ४८, भूखंड न्द. २७/२ वॉर्ड क्रमांक ७ क्षेत्रफळ १२३.८० स्के.मीटर .त्यावर बांधलेले घर

चतु:सीमा - पूर्वेस :- पांडे ह्यांचे घर , पश्चिमेस :- श्री. राठी ह्यांचे घर , उत्तरेस :- पोकळे ह्यांचे घर, दक्षिणेस: - रस्ता

सदर मालमत्ता हि त्रिवेणीबाई वामनराव फुलझेले यांनी माझ्या पक्षकाराला आणि श्री . समीर वामनराव फुलझेले ह्यांना दिनांक १७/०१/२०२० रोजी दस्त क्रमांक १४५/२०२० अन्वय बक्षीस पत्राद्वारे दिलेले आहे. समीर वामनराव फुलझेले हे दिनांक २७/१२/२०२० रोजी मरण पावले व त्या नंतर माझ्या पक्षकाराने स्वतःचे नाव वरील मालमत्तेवर समीर वामनराव फुलझेले ह्यांच्या वारस हक्काने चढवून घेतले व त्याचा फेरफार क्रमांक १६८११असा आहे. माझ्या पक्षकाराने सदर मालमत्ता गहाण ठेवण्याकरिता ऊप ऊँ रिंर्ंग्र् प्देल्हृ इर्हिम ६ येथे कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सदर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल ते त्यांनी सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

संपर्क:-
ॲड .आर.आर.तिवारी,
रामनगर, वर्धा. मो. ९९२२४२६१६८

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# परीक्षेचे दडपण घेऊ नका!

## शिक्षण मंत्र्यांकडून बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**मुंबई /प्रतिनिधी-** उद्यापासून १२ वीची परीक्षा सुरु होत असून शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना परीक्षा म्हणजे आयुष्याच्या एका सुंदर प्रवासाची सुरु वात आहे. त्यामुळे कोणतेही दडपण न घेता परीक्षेला सामोरे जावे आणि परिक्षा केंद्रावर वेळेत पोहोचा असे आवाहन केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणारी इयत्ता बारावीची परीक्षा १० फेब्रु वारीपासून, तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रु वारीपासून सुरू होत आहेत. परीक्षेच्या पार्श्वभूमिवर विद्यार्थ्यांना आवाहन करताना शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले, सर्व विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून, प्रामाणिकपणा हीच त्यांची खरी ओळख आहे. परीक्षा हा



विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा आणि आठवणीत राहणारा टप्पा असून गेल्या अनेक महिन्यांपासून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी परिश्रमपूर्वक तयारी केली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नपूर्तीसाठी अहोरात्र मेहनत घेतली असून त्या कष्टांना निश्चितच यश मिळेल असा विश्वास मंत्री भुसे यांनी व्यक्त केला. परीक्षा देताना विद्यार्थ्यांच्या हातात केवळ उत्तरपत्रिका नसून त्यात आई-वडिलांची स्वप्नेही असतात असे सांगून मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांना स्वत:वर विश्वास ठेवण्याचे, सकारात्मक विचार करण्याचे आणि कोणतेही दडपण न घेता परीक्षा देण्याबरोबच परीक्षेच्या काळात आरोग्य जपा, पुरेशी झोप, सकस आहार घ्या, मन शांत ठेवा आणि परीक्षा केंद्रावर वेळेत पोहचा असे आवाहनही भुसे यांनी केले.

# आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक

## अजित पवार यांना श्रद्धांजली वाहणार !

**मुंबई/ प्रतिनिधी-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आकस्मिक निधन व जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकीची धामधूम यामुळे लांबणीवर पडलेली राज्य मंत्रिमंडळाची साप्ताहिक बैठक, मंगळवारी होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर होत असेलली मंत्रिमंडळाची आजची पहिलीच बैठक आहे. त्यामुळे या बैठकीत अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. याआधी राज्य मंत्रिमंडळाची बैठक २७ जानेवारीला झाली होती. मंत्रिमंडळ बैठकीच्या दुस-या दिवशी २८ जानेवारीला अजित पवार यांचा बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. अजितदादांच्या आकस्मिक निधनाने राज्यावर शोककळा पसरली होती. राज्य सरकारने अजितदादांना श्रद्धांजली म्हणून



तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला होता. त्यानंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी मतदान असल्याने गेल्या आठवड्यात मंत्रिमंडळ बैठक होउ शकली नाही. आता जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक संपून आचारसंहिता संपुष्टात आल्याने आज, मंत्रिमंडळ बैठक होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज, दुपारी १२ वाजता मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील सभागृहात मंत्रिमंडळ बैठक होईल. या बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सहभागी होणार आहेत.

**कामकाज सल्लागार समितीची बैठक-** दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला येत्या २३ फेब्रु वारीपासून मुंबईत सुरु वात होत आहे. या पार्शभूमीवर आज विधानभवन येथे संसदीय कामकाज सल्लागार समितीची बैठक होत आहे. या बैठकीत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील कामकाज आणि कामकाजाचा कालावधी निश्चित केला जाईल. तसेच राज्याचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प ६ मार्च २०२६ रोजी सादर करण्याच्या निर्णयावर शिक्कमोर्तब करण्यात येणार असल्याचे समजते.

# भरधाव कारने 7 तरुणींना चिरडले, चौघींचा मृत्यू

## गंगा एक्सप्रेस-वेवरील भीषण अपघात

**रायबरेली/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उत्तरप्रदेशच्या रायबरेली येथील गंगा एक्सप्रेस-वेवर भीषण अपघात झाला. सुलतानपूर जनौलीजवळ रविवारी रात्री मागून आलेल्या भरधाव व अनियंत्रित कारने पायी चालत असलेल्या ७ जणांना चिरडले. या अपघातात ४ तरुणींचा मृत्यू झाला असून ३ जण गंभीर जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच मोठ्या प्रमाणावर नागरिक घटनास्थळी जमा झाले. अपर पोलीस अधीक्षकांनीही घटनास्थळी भेट दिली. नागरिकांच्या गर्दीमुळे जगतपूर-डलमउ मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. यासंदर्भातील माहितीनुसार जगतपूर कोडर येथील रहिवासी रिया पटेल,




प्रिया पटेल, हिमांशी, शालिनी, रश्मी, साधना आणि आसमा हे सर्व चूली गावात आयोजित भंडा-यात सहभागी होण्यासाठी गेले होते. कार्यक्रमानंतर सर्वजण पायी परतत असताना सुलतानपूर जनौलीजवळ गंगा एक्सप्रेस-वेवर मागून आलेल्या भरधाव कारने त्यांना धडक दिली. या अपघातात हिमांशी व शालिनी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. इतर जखमींना तातडीने जगतपूर सीएचसी व जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान आसमा व रश्मी यांचा मृत्यू झाला. उर्वरित तिघींवर उपचार सुरू आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, घटनेनंतर सुमारे अर्ध्या तासाने रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली, मात्र तिचा दरवाजा बराच वेळ उघडला गेला नाही. यामुळे नागरिकांचा संताप झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. जखमींच्या नातेवाइकांनी आपत्कालीन सेवांमधील हलगर्जीपणाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

# राजधानी दिल्लीतील 9 शाळांसह संसदेत स्फोट करण्याची धमकी, यंत्रणा सतर्क

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राजधानी दिल्लीतील ९ शाळांना सोमवारी सकाळी बॉम्बने उडवण्याच्या धमकीचे ई-मेल मिळाले. ई-मेलमध्ये दावा करण्यात आला होता की, १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १.११ वाजता संसदेत स्फोट होईल आणि दिल्लीला 'खालिस्तान' बनवले जाईल. ई-मेलमध्ये दहशतवादी अफजल गुरु आणि पंजाबला 'खालिस्तान' संबोधण्याचाही उल्लेख आहे. धमकी मिळाल्यानंतर शाळा आणि परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दिल्ली फायर सर्व्हिसनुसार, सकाळी वेगवेगळ्या भागांतील शाळांमधून आपत्कालीन कॉल आले. त्यानंतर



अग्निशमन दलाचे बंब, बाम्बशोधक पथक आणि श्वान पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. यामध्ये दिल्ली कॅन्टोन्मेंटमधील लोरेटो कान्व्हेंट स्कूल, श्रीनिवासपुरी आणि न्यू फ्रेंड्स कॉलनीमधील केंब्रिज स्कूल, सादिक नगरमधील द इंडियन स्कूल, आयएनएमधील डीटीईए स्कूल, रोहिणीमधील वेंकटेश्वर ग्लोबल स्कूल, रोहिणीमधील सीएम श्री स्कूल आणि रोहिणीमधील बाल भारती स्कूल यांचा समावेश आहे. धमकीच्या ई-मेलमध्ये लिहिले आहे की, अफजल गुरु च्या स्मरणार्थ दिल्ली 'खालिस्तान' बनेल. १:११ वाजता स्फोट होईल, १३ फेब्रुवारी रोजी १:११ वाजता संसदेत स्फोट होईल. पंजाब 'खालिस्तान' आहे. खालिस्तान नॅशनल आर्मी. दिल्ली फायर सर्व्हिसच्या एका अधिका-याने सांगितले की, आतापर्यंत ९ शाळांना बॉम्बची धमकी मिळाल्याची माहिती मिळाली आहे. सर्व परिसरांची तपासणी केली जात आहे. वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी सांगितले की, ईमेलचे स्थान आणि स्त्रोत शोधण्यासाठी सायबर पथके सक्रिय करण्यात आली आहेत. तसेच, राजधानीतील संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. आतापर्यंत कोणत्याही शाळेतून कोणतीही संशयास्पद वस्तू जप्त करण्यात आलेली नाही. दिल्ली पोलिसांच्या म्हणण्यानुसार, सर्व कॉल सकाळी ८:३० ते सकाळी ९:०० वाजताच्या दरम्यान आले होते. माहिती मिळताच, पोलिस, अग्निशमन दल आणि बॉम्ब निकामी पथकाने तातडीने संबंधित शाळांमध्ये पोहोचून शोध मोहीम सुरू केली.

# शेवटच्या घटकापर्यंत विकासासाठी सेवाभाववृत्ती महत्त्वाची - पद्मश्री डॉ. आमटे

**सोलापूर/प्रतिनिधी :** -समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्यासाठी सेवाभाव, सातत्य आणि नि:स्वार्थ वृत्ती महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले.भारत सरकार व विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात येणा-या २००० मेट्रिक टन क्षमतेच्या अत्याधुनिक कोल्ड स्टोरेज प्रकल्पाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले.या कार्यक्रमास पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे संचालक डॉ. राजीव मराठे होते.

# एपस्टीन फाइल्समुळे जगभरात खळबळ

## अमेरिका, युके, नॉर्वे ते फ्रान्समध्ये उच्चपदस्थांचे राजीनामे

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिकेतील कुख्यात लैंगिक गुन्हेगार जेफरी एपस्टीनशी संबंधित दस्तऐवज जसजसे समोर येत आहेत, तसतशी जगभरात खळबळ उडत आहे. या खुलास्यांमध्ये आर्थिक व्यवहार, सामाजिक संपर्क आणि खासगी भेटीगाठी यांची सविस्तर माहिती समोर येत आहे. हजारो ई-मेल्स, छायाचित्रे आणि व्हिडीओंमधून एपस्टीन आणि त्याच्याशी संबंधित व्यक्तींचे काळे कारनामे उघड होत आहेत. या प्रकरणामुळे जगभरातील अनेक उच्चपदस्थ व्यक्तींवर प्रचंड दबाव निर्माण झाला असून, अनेकांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. अलीकडेच ब्रिटन आणि नार्वेमध्येही अनेक नामवंत व्यक्तींनी पदत्याग केला आहे.या खुलास्यानंतर ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांचे चीफ ऑफ स्टाफ मार्गन




मॅकस्वीनी यांना राजीनामा द्यावा लागला. पीटर मँडेलसन यांची अमेरिकेत ब्रिटनचे राजदूत म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस मॅकस्वीनी यांनी केली होती. ही शिफारस चुकीची होती, असे त्यांनी आता मान्य केले असून त्याची जबाबदारी स्वीकारत त्यांनी पदाचा राजीनामा दिला.याच पार्श्वभूमीवर नार्वेमध्येही अनेक वरिष्ठ नेत्यांनी राजीनामे दिले आहेत. नार्वेच्या परराष्ट्र मंत्रालयानुसार, वरिष्ठ राजनयिक मोना जूल यांनीही एपस्टीनशी संबंधित संबंधांमुळे लवकरच पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ६६ वर्षीय मोना जूल या यापूर्वी नार्वे सरकारमध्ये मंत्री राहिल्या असून, इस्रायल, ब्रिटन आणि अमेरिकेत नार्वेच्या राजदूत म्हणूनही त्यांनी काम केले आहे.एपस्टीन फाइल्सचा सर्वात मोठा आणि तीव्र परिणाम अमेरिकेत दिसून आला. फेब्रुवारी २०२६ मध्ये ब्रॅड कार्प यांनी एका नामांकित कायदा फर्मच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, कारण एपस्टीनसोबतच्या त्यांच्या ई-मेल संवादांचे पुरावे समोर आले होते. त्याआधी, नोव्हेंबर २०२५ मध्ये लॅरी समर्स यांनी एका संचालक मंडळाच्या पदाचा राजीनामा दिला आणि एपस्टीनशी संबंध ठेवणे ही आपली चूक होती, असे त्यांनी मान्य केले.डिसेंबर २०२५ मध्ये एफबीआयचे उपसंचालक डॅन बोंजिनो यांनीही वादाच्या पार्श्वभूमीवर पदत्याग केला. त्यांच्या प्रकरणात थेट संबंध सिद्ध झाले नसले, तरी संबंधित फाइल्समुळे त्यांच्यावर दबाव वाढला होता.युरोपमध्येही एपस्टीन फाइल्सचा स्पष्ट परिणाम दिसून आला. फ्रान्सचे माजी मंत्री जॅक लँग यांनी एका सांस्कृतिक संस्थेच्या प्रमुखपदाचा राजीनामा दिला. स्लोव्हाकियामध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मिरोस्लाव लायचाक यांनी ई-मेल वादानंतर पद सोडले. स्वीडनमध्ये एपस्टीनच्या खासगी बेटाशी संबंधित आरोप समोर आल्यानंतर एका अधिका-याने राजीनामा दिला. विशेष बाब म्हणजे, हे सर्व राजीनामे गुन्हे सिद्ध झाल्यामुळे नव्हे, तर केवळ संपर्क उघडकीस आल्याने निर्माण झालेल्या वाद आणि जनतेच्या दबावामुळे देण्यात आले आहेत. संस्थांची प्रतिष्ठा जपण्यासाठी अनेकांनी पदत्याग करणे योग्य समजले.

# 'परीक्षा पे चर्चा'मध्ये पंतप्रधानांकडून विद्यार्थ्यांचे अनंत शक्यतांचा स्त्रोत म्हणून वर्णन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, देशातील विद्यार्थ्यांकडे असाधारण प्रतिभेने भरलेले आहे आणि त्यांच्याकडे त्यांची स्वप्ने साकार करण्याची पूर्ण क्षमता आहे. केंद्र सरकारचा उपक्रम, 'परीक्षा पे चर्चा', हा विद्यार्थ्यांना वैयक्तिक विकास आणि यशासाठी त्यांच्या प्रतिभेचा आणि कौशल्यांचा अर्थपूर्ण वापर कसा करायचा याचे मार्गदर्शन करण्याचा आहे.



दहावीच्या 'परीक्षा पे चर्चा' प्रसंगी, पंतप्रधानांनी एक संस्कृत सुभाषित आपल्या सोशल मीडियावर पोस्ट केले, जे विद्यार्थ्यांच्या अमर्याद क्षमता आणि अंतर्निहित गुणांवर प्रकाश टाकते. 'विद्या वितर्कको विज्ञानम् स्मृतिस्तत्परता क्रिया। यस्यते षड्गुणस्तस्य नासाध्यमतिवर्तते' या संस्कृत सुभाषिताचा अर्थ असा आहे की, ज्या व्यक्तीकडे ज्ञान, तर्कशास्त्र, विज्ञान, स्मृती, तयारी आणि परिश्रम हे सहा गुण आहेत, त्यांच्यासाठी काहीही अशक्य नाही आणि ते प्रत्येक आव्हानावर मात करू शकतात. पंतप्रधान म्हणाले की विद्यार्थ्यांमध्ये त्यांची स्वप्ने साकार करण्याची पूर्ण क्षमता आहे आणि 'परीक्षा पे चर्चा' या उद्देशासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ प्रदान करते, जेणेकरून विद्यार्थी त्यांच्या प्रतिभा आणि कौशल्यांचा सकारात्मक आणि सर्जनशील वापर करू शकतील.

# बोर्डाच्या परीक्षेवेळी केंद्रांवर भरारी पथकांचे लक्ष




**नागपूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात बारावीच्या विद्यार्थ्यांची ११९ परीक्षा केंद्रे आहेत. दहावीचे विद्यार्थी १८८ केंद्रांवर परीक्षा देतील. बारावीचे ५४ हजार ८७५ आणि दहावीचे ६४ हजार ४५४ विद्यार्थी बोर्डाची परीक्षा देणार आहेत. कापीमुक्तपरीक्षेसाठी जिल्ह्यात ४० भरारी पथके नेमली जाणार आहेत. त्यात महसूल, शिक्षण व जिल्हा परिषदेतील आरोग्य, बांधकाम अशा सर्वच विभागाचे अधिकारी असणार आहेत.दहावी-बारावीच्या प्रत्येक परीक्षा केंद्रावर व प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत. ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, त्या केंद्रांवरील हालचाली टिपण्यासाठी ड्रोन कॅमेरे देखील लावले जाणार आहेत. लेखी परीक्षा कापीमुक्तहोण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी ठोस नियोजन केले आहे.दरम्यान, आता ज्या केंद्रावर कापी किंवा गैरप्रकार आढळतील, त्या केंद्राची मान्यता कायमची रद्द केली जाणार आहे. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना किमान अर्धा तास आधी पोचणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची अंगझडती घेउनच त्यांना आत सोडले जाणार आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथक असेल. भरारी पथके देखील बहुतेक केंद्रांना भेटी देईल, असे नियोजन करण्यात आले आहे.

# 45 हजार कोटींच्या गुंतवणुकीमुळे विदर्भाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख:गडकरी

**नागपूर/प्रतिनिधी :-** ॲडव्हान्टेज विदर्भच्या तिस-या आवृत्तीद्वारे विविध प्रकल्पांमधून विदर्भात ४५,००० कोटी रूपयांपेक्षा जास्त अधिक गुंतवणूक झाली आहे. त्यामुळे या प्रदेशाला महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावरील ओळख मिळाली आहे, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. खासदार (एमपी) औद्योगिक महोत्सव ॲडव्हान्टेज विदर्भ २०२६ चा समारोप कार्यक्रम रविवारी नागपुरात केंद्रीय राज्यमंत्री शोभा करंदलाजे आणि इतर मान्यवर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडला.

सभेला संबोधित करताना गडकरी पुढे म्हणाले की, विदर्भातील ११ जिल्ह्यांनी या भव्य औद्योगिक प्रदर्शनामध्ये सहभाग घेतला होता. या प्रदर्शनात ३५० प्रदर्शक दालने होती, त्यापैकी १०० दालने एमएसएमई क्षेत्रातील होती, तसेच विदर्भातील विविध जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करणारी सुमारे ४० दालने होती.




तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात २५ तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रांमध्ये २२५ तज्ज्ञ आणि वक्त्यांनी औद्योगिक आणि विकासाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. या सत्रांना सुमारे ५,५०० प्रतिनिधींनी उपस्थिती लावली.

केंद्रीय मंत्री गडकरी यांनी २३ देशांतील राजदूत आणि व्यापार प्रतिनिधींच्या सहभागालाही अधोरेखित केले. ही गोष्ट या वर्षीच्या महोत्सवाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरल्याचे सांगितले. केंद्रीय मंत्री यांनी नमूद केले की, या महोत्सवामुळे नवकल्पना आणि गुंतवणुकीसाठी पोषक परिसंस्था उभारण्यास मोठे योगदान मिळणार आहे. विदर्भात रोजगारनिर्मिती करणे, प्रदेशाचा विकासदर वाढवणे आणि उद्योग, उत्पादन आणि कृषी क्षेत्रात संतुलित विकास सुनिश्चित करणे याविषयी सरकारची कटिबद्धता त्यांनी पुन्हा अधोरेखित केली.

ॲडव्हान्टेज विदर्भ उपक्रम या उद्दिष्टांना प्रत्यक्षात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही गडकरी यांनी व्यक्त केला. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा महोत्सव ६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. विदर्भाची औद्योगिक क्षमता अधोरेखित करणे आणि भारताच्या एकूण औद्योगिक विकासात विदर्भाची भूमिका अधिक बळकट करणे, हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश होता.

# पंतप्रधान मोदी- सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष यांच्यात द्विपक्षीय बैठक

नवी दिल्ली, ०९ फेब्रुवारी (हिं.स.) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्यात आज दिल्लीतील हैदराबाद हाउसमध्ये महत्त्वपूर्ण द्विपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीत रणनीतिक भागीदारी, समुद्री सहयोग तसेच परस्पर संबंध अधिक दृढ करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत अनेक महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्ष-या करण्यात आल्या, ज्यामुळे भारत-सेशेल्स संबंधांना नवा आयाम मिळणार आहे.बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करत संबंधांना नव्या ऊंचीवर नेण्याची वचनबद्धता व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष हर्मिनी यांचे सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल अभिनंदन करत सांगितले, १.४ अब्ज भारतीयांच्या वतीने मी राष्ट्राध्यक्ष हर्मिनी यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो.पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्राध्यक्षपद स्वीकारल्यानंतर ही हर्मिनी यांची भारतातील पहिली भेट असून भारत-सेशेल्स संबंध भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यातही तितकेच दृढ राहतील. समुद्री शेजारी आणि विश्वासू भागीदार म्हणून सेशेल्स भारताच्या हिंद महासागरविषयक दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहे. जमीन, समुद्र आणि आकाश या तिन्ही क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमधील सहयोग सातत्याने मजबूत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.ही भेट विशेष महत्त्वाची असल्याचे सांगताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, यंदा सेशेल्सच्या स्वातंर्त्याला आणि भारत-सेशेल्स राजनयिक संबंधांना ५० वर्षे पूर्ण होत आहेत. हा ऐतिहासिक योगायोग दोन्ही देशांच्या संबंधांना आणखी उंचीवर नेण्यास प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.भारत आणि सेशेल्सचे संबंध केवळ कूटनीतीपुरते मर्यादित नसून हिंद महासागराच्या लाटांनी दोन्ही देशांच्या लोकांना शतकानुशतके जोडले असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. व्यापार, संस्कृती आणि परस्पर विश्वासाची परंपरा या संबंधांचा पाया असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.येत्या काळात नवीकरणीय उर्जा, हवामान बदलाशी सामना, आपत्ती व्यवस्थापन आणि ब्लू इक?न?मी या क्षेत्रांमध्ये सहयोग वाढवण्यावर दोन्ही देशांचा भर राहील, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. तसेच, पर्यटन, शिक्षण, क्रीडा आणि युवक देवाणघेवाणीद्वारे लोकांमधील संबंध अधिक मजबूत करण्यावर चर्चा झाल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी भारत-सेशेल्स संयुक्त व्हिजन दस्तऐवज जाहीर करण्यात आला असून तो भविष्यातील सहकार्यासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.दरम्यान, सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांनी संबोधनात हैदराबाद हाउसला भेट देताना सन्मान वाटल्याची भावना व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, जून महिन्यात भारत-सेशेल्स राजनयिक संबंधांची ५०वी वर्षगांठ साजरी करण्यात येणार असून या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे.राष्ट्राध्यक्ष हर्मिनी यांनी पुढील पाच वर्षांसाठी सामायिक व्हिजनवर चर्चा झाल्याचे सांगत हिंद महासागर क्षेत्रातील समुद्री सुरक्षा, प्रादेशिक स्थिरता आणि पर्यटन क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करण्यावर भर दिला. भारत हा सेशेल्ससाठी एक महत्त्वाचा उद्योन्मुख पर्यटन बाजार असल्याचेही त्यांनी नमूद केले.



# संसदेत विरोधकांना गंभीर मुद्दे उपस्थित करू दिले जात नाहीत- मनीष तिवारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज विस्कळीत झाल्यानंतर, काँग्रेस खासदार मनीष तिवारी म्हणाले की, देशासमोर अत्यंत महत्त्वाचे मुद्दे आहेत ज्यांवर चर्चा करणे आवश्यक आहे. त्यांनी आरोप केला की, विरोधकांना त्यांचे विचार मांडण्याची संधी दिली जात नाही. संसद भवन संकुलात पत्रकारांशी बोलताना तिवारी म्हणाले की, भारत-अमेरिका व्यापार चौकटीवरील संयुक्त निवेदन आणि भारत रशियाकडून तेल खरेदी करणार नाही असा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा कार्यकारी आदेश यांचे आपल्या परराष्ट्र आणि आर्थिक धोरणाच्या स्वायत्ततेवर धोरणात्मक परिणाम आहेत. शिवाय, खासदारांच्या निलंबनाचा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे, परंतु विरोधकांना या मुद्द्यांवर चर्चा करण्यापासून रोखण्यात आले. काँग्रेस



खासदार तिवारी पुढे म्हणाले की, सभागृह चालवणे ही सरकारची जबाबदारी आहे, परंतु सरकारच्या हट्टीपणामुळे सर्वोच्च कायदेमंडळ विसंगत झाले आहे. संसदेला तिची भूमिका बजावण्यास असमर्थ ठरवण्यासाठी सरकारने खूप प्रयत्न केले आहेत.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पाकिस्तानातील दशहतवाद

पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली.इस्लामाबादमधील एका शिया पंथाच्या दर्ग्यानजीक एका आत्मघातकी मानवी बाँबने स्वतःला उडवले. या स्फोटात ३१ लोक ठार तर १६९ जण जखमी झाले. तरलाई इमामबर्गा येथे हा शक्तीशाली बाँबस्फोट झाला.आता पाकिस्तानने अफगाणिस्तानवर आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. पाकिस्तानचे म्हणणे आहे, की अफगाणिस्तानच्या दहशतवाद्यांनी स्फोट घडवला पण भारताने त्यांना आर्थिक मदत केली. पाकचा हा कुटील कांगावा आहे हे सहज लक्षात येते. कारण भारत कुणाच्याही देशात ढवळाढवळ करत नाही आणि पाकच्या उलट्या काळजाच्या देशात तो असे उद्योग करण्याची शक्यता जवळपास नाही. अद्याप कोणत्याही गटाने स्फोटाची जबाबदारी स्वीकारली नाही. तरीही पाकने अफगाणिस्तान आणि भारतावर या स्फोटाचे खापर फोडले. मुळात पाकने आतापर्यंत दहशतवाद्यांना पोसण्याचे काम केले. तो दहशतवाद्यांचा सरपरस्त आहे. त्यामुळे पाकचे औषध त्यालाच पाजण्यात आले. कारण पाकने आतापर्यंत हेच केले. त्याने निरपराध भारतीय नागरिकांना ठार केले. तेही शेकड्यांनी. २००८ चा बॉम्बहल्ला आणि दहशतवाद्यांचा धूडगूस आणि भारतातील ट्रेनमध्ये घडवलेले स्फोट मालिका अशी कितीतरी उदाहरणे आहे. त्यामुळे पाकवर असा दशहतवादी हल्ला झाला तर त्याबद्दल फारसे वाईट वाटण्याचे काही कारण नाही.पाकला सुसाईड बाँबहल्ले नवे नाही. तीन महिन्यांपूर्वी इस्लामाबाद येथे अशाच एका सुसाईड बाँबरने हल्ला केला होता. या हल्ल्याचा पाकचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांनी निषेध केला. पण त्यात काही अर्थ नाही. कारण आतापर्यंत पाकने जे पेरले तेच उगवले. त्यातही पाकचा खोटारडेपणा असा, की भारतावर आरोप करताना पाक हे विसरला, की भारत दुसऱ्या देशात असे उद्योग करत नसतो. हे पाकचे काम आहे. पाकिस्तानचा मित्र म्हणून चीनने या हल्ल्याचा निषेध केला. कोणताही हल्ला होणे आणि त्यात निरपराध नागरिकांचे बळी जाणे हे नेहमीच वाईट असते. पण पाकने भारतावर पूर्वी असेच हल्ले केलेत. पेहलगाम येथे निरपराध हिंदू कुटुंबियांना पाकच्या दहशतवाद्यांनी वेचून ठार केले. त्यामुळे पाकने आता कितीही व्याख्यान झोडले तरीही पाकचे कृत्य नापाक आहे हे जगापासून लपून राहिलेले नाही. पाकचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले, की भारताने अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांना पैशाची मदत केली आणि त्यामुळेच हा हल्ला झाला. पण त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाही. मागेही भारतातील हल्ले पाक पुरस्कृत होते. पाकने चीनच्या मदतीने मसूद अझर याला अनेक वर्षे दहशतवादी घोषित करण्यास अडथळे आणले. त्यात चीनने आपला व्हेटो अधिकार वापरून मसूदला दहशतवादी घोषित करू दिले नाही. भारताने कित्येक वेळा पाककडे अझरला आपल्या हवाली करण्याची मागणी केली होती. पण तसे झाले नाही. तोच पाकिस्तान आता भारतावर आरोप करत आहे. खरी वस्तुस्थिती अशी आहे, की आपल्या सामाजिक रचनेला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्याऐवजी पाकिस्तान भारत किंवा अन्य एखाद्या देशाविरोधात असे कट रचल्याचा आरोप करतात पण त्यात तथ्य नसते. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शाब्दिक युद्ध सुरु झाले. कारण पाकचा आरोप निराधार आहे. हे भारताच्य संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले असून पाकने स्वतःची सुरक्षा यंत्रणा तपासावी आणि त्यातील कमतरता दूर कराव्यात असा सल्ला दिला. पाकिस्तानी सरकार आणि मीडिया नेहमीच असे बेजबाबदार आणि हास्यास्पद आरोप कुठल्याही पुराव्याशिवाय करतात आणि हा प्रकार त्यातलाच आहे. पाक हा नेहमीच भारत तर कधी अफगाणिस्तानवर आरोप करतो. पाकवर मृतांच्या कुटुंबियाना उत्तरे देण्याची जबाबदारी वाढत आहे आणि त्यापासून आपली सुटका करून घेण्यासाठी पाक असे डाव आखतो. इस्लामाबादमधील घटनेने केवळ देशातील प्राणघातक सुरक्षा त्रुटी उघड केल्या नाहीत तर प्रादेशिक तणावही वाढवला आहे. पाकिस्तानने दहशतवाद्यांशी लढण्यात आपण शून्य प्रगती केल्याचे दाखवून दिले. पण इस्लामाबादमधील हल्ल्याने त्यांची ही प्रगती किती नाजूक अवस्थेत आहे हे लक्षात आणून दिले. आता इस्लामिक स्टेटने या भीषण हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि २००८ मध्ये झालेल्या मॅरियट हॉटेलच्या बाँबस्फोटानंतर हा हल्ला इस्लामाबादेतील सर्वात भीषण हल्ला असल्याचे म्हटले आहे. पाकने चार संशयितांना अटक केली आहे. पाकिस्तानातील मशिदीतील स्फोटाची जबाबदारी घेणारा आयसिस म्हणजे इराक आणि सीरीयातील सुन्नी मुस्लिम गट आहे. त्यांचा उद्देश्य असतो की शियांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करायचे आणि त्यांना ठार मारायचे. काही वर्षापूर्वी त्यानी लाखो लोकांवर राज्य केले आणि त्याद्वारे आपली दहशत पसरवली. हाय प्रोफाईल हल्ले करण्याची त्यांची क्षमता कायम आहे. त्यांची पाळेमुळे सीरियाच नव्हे तर अगदी ऑस्ट्रेलियापर्यंत पसरली आहेत आणि नुकताच त्यांनी त्या देशात भीषण हल्ला घडवून १५ लोकांना ठार केले होते. गेल्या काही वर्षात पाक अफगाणिस्तान सीमेवर वाढत्या दहशतवादाचा सामना करावा लागला असला तरीही राजधानी इस्लामाबादमध्ये असा हल्ला होणे ही क्वचितच घडणारी बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या हल्ल्याचा निषेध केला असून त्यांनी म्हटले आहे, की युद्ध गुन्ह्यांत याचा समावेश होऊ शकतो. भारताने म्हटले आहे, की पाक स्वतःच्या देशांतील सामाजिक चौकटीतील समस्या सोडवण्याऐवजी इतरांवर म्हणजे भारतावर त्याचा दोष ढकलत आहे हे अत्यंत वाईट आणि अशोभनीय आहे. शिया आणि सुन्नी मुस्लिम यांच्यात पंथीय हिंसाचार आणि वैर सर्वश्रुत आहे. त्यामुळे या शिया दर्ग्यावर हल्ला करण्यात आला आणि आयसिसच्या तत्वानुसार हे योग्य आहे. याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे शिया जमात ही आयसिसविरोधात लढण्यासाठी मनुष्यबळ पुरवते आणि हा हल्ला म्हणजे प्रत्युत्तर म्हणून हल्ला होता. राजधानीत आपण दहशतवाद पेरू शकतो आणि आयसिसची क्षमता राजधानीतही हल्ले करण्याची आहे हे दाखवून देण्यासाठी हा हल्ला होता असेही मानण्यात येते.

# अजित पवारांनंतरचा खेळ सोंगट्यांचा?

**राज्याचे धडाडीचे अनुभवी नेते आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री म्हणून प्रदीर्घ काळ राज्याच्या विकासाची दिशा ठरवणारे नेते अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. ही गोष्ट मात्र अजूनही दादांचे चाहते आणि विरोधकांच्याही पचनी पडणे कठीण जात असल्याचे दिसत आहे. या प्रकरणाची सी आयडी चौकशी जाहीर झाली आणि सामान्यांच्या मनात एकच वाक्य आहे 'दया कुछ तो गडबड है!'**



### 'दया कुछ तो गडबड है!'

या अपघाताबाबत पवार कुटुंबियांचे प्रमुख शरद पवार यांनी जरी हा अपघात असल्याचे आणि यावर राजकारण न करण्याचे आवाहन त्याच दिवशी केले असले तरी आता राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या काही महत्वाच्या नेत्यांसह दादांच्या कट्टर विरोधक अंजली दमानिया देखील या अपघाताबाबत संशय व्यक्त करताना दिसत आहेत.या अपघातासोबत काही जणांनी मर्डर मिस्ट्री,तर काही जणांनी राजकीय हिस्ट्री पर्यंत संशय व्यक्त केला आहे. कपट कारस्थान असल्याचा तर काही जणांकडून पध्दतशीर राजकीय डावपेचाचा भाग म्हणून दादांना अपघाताचा बनाव करून परदेशी पाठवून दिल्याचा संशय देखील व्यक्त केला आहे. या सा-या प्रकरणात आता केंद्र सरकारच्या नागरीउड्डयन मंत्रालयासोबतच केंद्र आणि राज्य सरकारच्या पोलीसांचा गुन्हे अन्वेषण विभाग तपास करत असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र इतक्या मोठ्या पदसिध्द व्यक्तीचा अपघाती संशयास्पद मृत्यू होवूनही राज्यसरकारकडून कोणत्याही उच्चस्तरीय/दंडाधिकारी किंवा न्यायालयीन चौकशीची घोषणा करण्यात आली नाही.राज्य गुन्हे अन्वेषण विभाग म्हणजे सीआयडी याचा तपास करत आहे. सीआयडी म्हटले म्हणजे याच नावाच्या गाजलेल्या दूरदर्शन मालिकेतील एसीपी प्रद्युम्न असलेल्या कलाकार शिवाजी साटम यांचा प्रसिध्द संवाद मनात डोकावतो 'दया कुछ तो गडबड है!'

### जबाबदारी राज्य सरकारच्या गृहविभागाची नव्हती काय?

राज्याचे उपमुख्यमंत्री असणारे अजित पवार खाजगी राजकीय दौ-यावर असल्याने शासकीय विमानाने न जाता खाजगी विमान कंपनीच्या विमानाने जात असल्याचे सांगण्यात येते. असे असले तरी महत्वाचे मंत्री म्हणून त्यांच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारच्या गृहविभागाची नव्हती काय? असा प्रश्न कोणत्याही माध्यमातून का विचारला जात नाही अशी विचारणा दादांच्या काही चाहत्या नेत्यांनी आम्हा पत्रकारांकडे वारंवार केली. सध्या अजित पवार यांच्या निधनाचा शोक आणि धक्क्यातून त्यांचे कुटूंबिय आणि पक्षाचे नेते कार्यकर्ते सावरले नाहीत. पण दहा तारखेनंतर याबाबत आपण पत्रकार परिषद घेत असल्याचे अजित पवार यांचे पुतणे आणि सरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीच जाहीर केले आहे.

त्यापूर्वी अकोला येथील विधानपरिषद सदस्य अमोल मिटकरी, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, शरद पवार यांच्या गटाचे प्रवक्ते विकास लवंडे. बीड चे खासदार बजरंग बाप्पा सोनावणे, दादांच्या विरोधक अंजली दमानिया यांच्यासारख्या अनेकांनी जाहीरपणे दादांचा घात होता की अपघात याबाबत शंका उपस्थित केल्या आहेत. मिटकरी यांनी तर अजीत पवार यांचे विमान बदलण्यात आले किंवा पायलट अचानक कसे बदलण्यात आले इथपर्यंत संशय व्यक्त करताना ज्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्याच्य ओळख पटविण्याच्या प्रक्रियेपासून ते दादांचे पार्थिव होते की अन्य कुणाचे याबाबत शंका असल्याचा दावा केला आहे. या अपघाताबाबत आता विमानाच्या तांत्रिक फ्लाईट डेटाबाबत तज्ज्ञांचा अहवाल येण्याची वाट पहा असे पुण्याचे खासदार आणि केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडून सांगण्यात येत आहे. पण या मोहोळ यांनी हे सांगायला हवे की, या अपघाताच्या आठ महिनेपूर्वी गुजरातच्या अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या ड्रिमलायनर विमानात दोनशे प्रवाशांसह गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा संशयास्पद मृत्यू झाला. त्या अपघाताबाबत शंकाचे 'मोहोळ' अद्याप सरकारच्या कोणत्याही अहवालामुळे शमल्याचे दिसत नसताना या आपघाताबाबत नेमेके कधीपर्यंत तथ्य समोर येणार आहे? त्यामुळे आता नेमके अजीत पवार यांच्यासारखे व्हिसल ब्लोअर नेतृत्व अचानक काळाच्या पडद्यामागे जाण्यामागे केवळ 'नियतीचा डाव होता की कुणाची राजकीय नियत' खराब झाल्यामुळे हे घडवून आणलेले कारस्थान आहे याची चर्चा समाधानकारक तपास आणि तथ्य समोर येईपर्यत होत राहणार आहे.

### शरद पवारांसोबत दोन्ही राष्ट्रवादी म्हणजे नक्की काय?

अजित पवार यांच्या मृत्यूनंतर तीनच दिवसांनी त्यांच्या धर्मपत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली मात्र त्यांनी दहा तारखेपर्यत पदभार स्विकारला नाही. पण पवार यांच्याकडे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा कार्यभार सोपविण्यात आला नाही. त्याबाबत भाजपच्या केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्याकडून वक्तव्ये येणे आणि प्रफुल्ल पटेल यांना परस्पर या पदावर विराजमान झाल्याची घोषणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र स्वत: पटेल यांनी मानभावीपणे आपली निवड न झाल्याचा खुलासा करण्यामुळे अजीत पवार यांचा पक्ष शरद पवार यांच्या ताब्यात जावू नये अशी महाशक्तीची इच्छा लपून राहू शकली नाही. तीच गोष्ट दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चेची झाली. अजीत पवार काय किंवा एकनाथ शिंदे काय या दोन्ही गटांच्या राजकीय अस्तित्वाला दिल्लीतून निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयातून मिळालेले अभय भाजपच्या सत्तेवर असलेल्या वरिष्ठ नेत्यांच्या वरदहस्तामुळेच शक्य झाले आहे, हे काही आता गुपीत राहिलेले नाही. त्यामुळे या पक्षांच्या राजकीय निर्णयात भाजपच्या फायद्याच्या विरोधात काही घडामोडी होत असतील तर त्या भाजपच्या सहमतीने व्हाव्या अशी अपेक्षा आहे. आणि त्याच पध्दतीने दोन्ही पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीत एकत्रपणे लढण्यासाठी जवळ आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र दोन्ही पक्षांनी 'एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठीच' या उध्दव ठाकरेंच्या धोरणानुसार चालायचे आता सांगितल्यानंतर आणि ते देखील अजित पवार हयात नसताना म्हणजे शरद पवार अप्रत्यक्षपणे भाजपसोबत येण्यास तयार आहेत का? की यामध्ये देखील पहाटेच्या शपथविधी सारखे काही राजकीय डावपेच आहेत याचा संशय भाजपला येणे स्वाभाविक आहे. कारण यापूर्वी भाजप पवारांच्या राजकीय स्टंटला बळी पडून तोंडघशी पडल्याची दोन तीन उदाहरणे आहेतच. शिवाय अजीत पवार यांना पुढे करून भाजपमध्ये जाण्यास तयार झालेल्या राष्ट्रवादीच्या भजुबळ, मुंडे, मुश्रीफ, वळसे पाटील इत्यादी नामदेव घोटाळे मंत्र्याना आता पुन्हा शरद पवार यांच्या नियंत्रणाखाली देण्यास भाजप सहजासहजी तयार होणार नाही हे देखील अध्यात्त्र्त समजले पाहिजे. छगन भुजबळ, मुश्रिफ, मुंडे यांच्यावरील डाग अजून पुरते धुतले गेले नाहीत. तर शरद पवारांसोबत दोन्ही राष्ट्रवादी जाणार म्हणजे नक्की काय? याबाबत अजीत पवार यांच्याकडून जरी संकेत देण्यात आले असले तरी थोरल्या पवारांना त्यांच्या पक्षासह सांभाळणे आणि अजित पवार आणि त्यांच्या भ्रष्ट सहका-यांना सोबत ठेवून खेळवणे यात महदंतर आहे याची जाणिव भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना आहे. कालपर्यंत सोबत येण्यास विरोध असणारे शरद पवार नेमके काय खेळी करणार आहेत? याचा अंदाज कुणालाही लावता येणे कठीण आहे.

याबाबत एक कारण राज्यसभेची एप्रिल महिन्यात मुदत पूर्ण होत असल्याने पवार यांना आता पुन्हा राष्ट्रवादीच्या मदतीने राज्यसभा पक्की तर करुन घ्यायची नाही ना? अशी या शंके मागे राजकीय समिकरणे आहेतच. पवार यांना महाविकास आघाडी देखील सहमतीने एकमताने राज्यसभेत पाठवू शकते. मात्र तेथे शरद पवार यांना उध्दव ठाकरे आणि कॉंग्रेसच्या राजकीय मेहरबानीवर जाणे प्रशस्त वाटले नसावे. त्याऐवजी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र झाल्या तर स्वबळावर पवार यांना राज्यसभा गाठणे शक्य होणार आहे. असा राजकीय कयास लावला जात आहे.

### अजित पवारांनंतर हा खेळ सोंगट्यांचा?

मात्र अजित पवारांच्या हयातीत असे ठरल्याचेही सांगण्यात येत आहे की, फौजीया खान यांना पुन्हा राज्यसभेवर पाठवायचे आणि पवार यांनी संसदीय राजकारणातून निवृत्ती घ्यावी मात्र पक्षाची सूत्र संस्थापक अध्यक्ष म्हणून सांभाळावी आणि सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल या दोघांना लोकसभा तसेच राज्यसभेची जबाबदारी देवून कार्याध्यक्ष पदाचा भार द्यावा. तर अजित पवारांकडे महाराष्ट्राची पूर्ण जबाबदारी द्यावी असे ठरविण्यात आले होते. एकंदर राष्ट्रवादीचा ताबा पुन्हा येनकेन प्रकारेण मोठ्या साहेबांकडेच राहिला असता ही गोष्ट भाजपच्या वरिष्ठांना कदापी मान्य होणारी नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाला खोडा घालण्याचा महाशक्तीचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात येत आहे.

पण..अजित दादा आता नाहीत त्यांच्या पश्चात पवार कुटूंबाचा पाया शरद पवारच आहेत. नातवंडासाठी आधारवड तेच आहेत. गेल्या दहा दिवसांत जे चित्र दिसत आहे, त्यात पराकोटीच्या दुःखात देखील ते एक दादा गेला तर चार दादा घडविण्याच्या कामात लागले आहेत असेच दिसत आहे. कुटूंब या दु:खात एकत्र आले आहे, अजित पवार गेले तरी त्यांच्या जाण्यातूनही त्यांनी सगळयाना शेवटी एकत्रच आणले आहे, याला कुणाचा आक्षेप असायचे कारण काय?

मात्र राजकारण काही असो त्याच्या आडून ज्या काही भयावह घडामोडी सुरू आहेत त्या 'सरणार कधी रण प्रभो कूठवर पाहू बाट'; या बाजी प्रभूंसाठी कुसूमाग्रजांनी लिहून ठेवलेल्या ओळी सामान्य माणसासाठी वापरूनही 'भय इथले संपत नाही' अशी स्थिती झाली आहे. केवळ धक्कातंत्राचे सत्ताकारण आणि धनाठ्यांसाठी राजकारण यात सामान्य माणसाचे त्याच्या प्रश्नाचे काय? अजित पवार या पहाडासारख्या राजकीय नेत्याची अगदी अनपेक्षित एक्झीट ब-याच नव्या राजकीय प्रश्नाना जन्माला घालून गेली आहे. ज्या पध्दतीने त्यांचा एकाएकी राजकीय अस्त झाला ते कुणाच्याही मनाला पटणारे नाही. त्यामुळे सत्तेच्या राजकारणाच्या पटावरील तटकरे, पटेल भुजबळ, फडणवीस, आणि अगदी अरोरा सुध्दा केवळ प्यादी आहेत की काय? वेळ आली तर खेळ करणारे या सोंगट्या हव्या तश्या वापरतील किंवा काढून घेतील काय? हा खेळ जीवघेणा आहे. पण खेळ कुणाला दैवाचा कळला? सारेच अनाकलनीय, अनपेक्षीत! निशब्द! सुज्ञास जाग आली तर बरे! तूर्तास इतकेच!!

**किशोर आपटे**

## संवाद

### कोपरगाव स्थानकावर गरीब रथसाठी दोन मिनिटांचा थांबा घ्यावा

कोपरगाव रेल्वे स्थानकावरील प्रवाशांच्या सोयीसाठी, १२११३ पुणे-नागपूर गरीब रथला दोन मिनिटांचा थांबा देण्याची मागणी आहे. सध्या या स्थानकावर या गाडीचा थांबा नाही, त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. कोपरगाव हे एक महत्त्वाचे शहर आहे आणि येथील प्रवाशांना पुणे आणि नागपूरला जाण्यासाठी इतर पर्यायांचा अवलंब करावा लागतो. गरीब रथासाठी दोन मिनिटांचा थांबा देणे प्रवाशांसाठी सोयीस्कर आणि वेळेची बचत करेल. प्रवाशांच्या सोयीसाठी १२११३ पुणे-नागपूर गरीब रथला कोपरगाव रेल्वे स्थानकावर दोन मिनिटांचा थांबा देण्याची रेल्वे प्रशासनाकडे मागणी आहे. कोपरगाव रेल्वे स्थानकावर गरीब रथासाठी दोन मिनिटांचा थांबा देणे प्रवाशांसाठी सोयीस्कर आणि वेळेची बचत करेल. आम्हाला आशा आहे की, रेल्वे प्रशासन आमच्या मागणीचा विचार करेल आणि प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक पावले उचलेल.

**राजेश पी.कारिया**
राधे नगर,अकोला

### संस्कृती नव्हे विकृती.

१४ फेब्रुवारी हा दिवस व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा करण्याचे खूळ भारतात चांगलेच पसरले आहे. या दिवशी तरुण मुले - मुली एकत्र येऊन एखाद्या सण-उत्सवासारखा हा दिवस साजरा करतात. एकमेकांना काहीतरी महागडी भेटवस्तू देतात. व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी गुलाबाच्या फुलांना विशेष मागणी असल्यामुळे दामदुपटीने अधिक मूल्य देऊन गुलाबाच्या फुलांची खरेदी होत असते. तरुण मुले आणि मुली हा दिवस एकमेकांवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी आहे असे मानतात. तरुण मुले - मुली एकत्र आल्यामुळे काहीही विपरीत घटना घडण्याची शक्यता असते. व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यावर पाश्चात्य देशात देखील बंदी असताना भारतात मात्र हा दिवस उत्साहाने साजरा करण्याचे काहीच कारण नाही. भारतीय संस्कृती कोणतेही डेज साजरे करायची शिकवण देत नाही. व्हॅलेंटाईन डे साजरा करून आपण आपली मूळ संस्कृती सोडून विकृतीच्या दिशेने चाललो आहोत याचे भान तरुणांनी ठेवणे अपेक्षित आहे.

**मनीषा बोराटे**

### अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण 'राजमाता जिजाऊ' बस

भगव्या आणि पांढ्या शुभ्र आकर्षक रंगसंगतीत सजलेल्या आणि ३ बाय २ आसन रचनेच्या ५५ आसनी अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण एसटी बसेस येत्या मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभरात प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या संपूर्ण स्वराज्याच्या संकल्पनेमागे उभी राहिलेली दुर्दम्य आणि अखंड जिद्धीची प्रेरणाशक्ती म्हणजे मातोश्री राजमाता जिजाऊ! छत्रपतींना घडवणाऱ्या त्या थोर माऊलीच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा उचित गौरव म्हणून राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणाऱ्या या आकर्षक एसटी बसेसना स्वराज्य जननी 'राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले आहे. त्याबद्धल एसटी महामंडळाचे आभार आणि अभिनंदन! एसटी महामंडळाने यापूर्वी महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा आणि संस्कृती जोपासणारी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, विठाई, यशवंती, हिरकणी अशी विविध आशयपूर्ण नावे बसेसना दिली आहेत. आता राजमाता जिजाऊंचे नाम धारण करणाऱ्या या नव्या कोऱ्या करकरीत बसगाड्यांमुळे गौरवात तसेच अत्याधुनिक सेवा सुविधांमध्ये यामुळे मोठी भर पडली आहे. मात्र सुरुवातीला या बसेस दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू करण्याचा एसटीचा मानस असला तरी भविष्यात राज्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांनाही या बसच्या सेवेच्या लाभ मिळावा अशी अपेक्षा आहे.

**-प्रदीप मोरे**

### अमेरिकेच्या दबाव तंत्रामुळे जगभरातील देश हवालदिल

अलीकडेच अमेरिकेकडून व्हेनेझुएला देशावर झालेला हल्ला आणि तेथील राष्ट्रपतींची बळजबरीने झालेली अटक म्हणजे संबंध जगालाच एक मोठा इशारा ठरला आहे. अमेरिकेकडून हा सर्व प्रकार तेल विहिरी हडप करण्यासाठी सुरु आहे. जगातील सर्वच तेलसमृद्ध राष्ट्रांनी अमेरिकन डॉलरच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार आणि व्यापार करावा, अशी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची इच्छा आहे. त्यामुळेच त्याविरोधात वागणाऱ्या देशांवर कारवाईच्या नावाखाली लष्करी हल्ले सुरु आहेत. भारताच्या संदर्भात विचार करताना भारत रशियाचा प्रमुख तेल खरेदीदार आहे. त्यावरही अमेरिकेची पूर्वीपासूनच वक्रदृष्टी दिसून येते. या झालेल्या हल्ल्यानंतर भारत-रशियातील तेल खरेदी-विक्री अडचणीत सापडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. भारतातील रिलायन्स उद्योगसमूह रशियन तेलाचा ग्राहक आहे. मात्र, मागील महिन्यापासून रशिया तेलाचे एकही बॅरल रिलायन्स कंपनीला मिळाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अमेरिकेकडून सातत्याने दबाव निर्माण केला जात असल्यामुळे जगभरातील तेल खरेदी-विक्री करणारे प्रमुख देश हवालदिल झाले आहेत. त्यामुळेच भारत-रशियातील इंधनाचा व्यापार कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. केवळ आपल्या हितासाठी अमेरिका सर्वच नियम धाब्यावर बसवताना दिसत आहे. जगामध्ये कायम कुठे ना कुठे संघर्ष आणि युद्धग्रस्त स्थिती निर्माण करण्यासाठी अमेरिकेची मोठी धडपड सुरु असते. एखाद्या सार्वभौम देशाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप करणाऱ्या अमेरिकेला कोणीही विचारत नसल्यामुळेच डोनाल्ड ट्रम्प यांची दादागिरी वाढत आहे. व्हेनेझुएलाने आता चीन, रशिया आणि इतर देशांशी असलेले व्यापारी संबंध तोडून टाकण्याचाही दबाव आणला जात आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

### राजकीय अपरिपक्वता की रणनीतीचा अभाव?

विरोधी पक्षाचा धर्म हा सरकारला आरसा दाखवणे असतो. परंतु, राहुल गांधींच्या या आक्रमकतेमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींना एक सुवर्णसंधी मिळाली. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाच्या आभार प्रदर्शनात, त्यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्याची आणि 'विकसित भारत ˘ २०४७' च्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी महिला, शेतकरी, तरुण व गरीब वर्गाच्या कल्याणासाठी सरकारने घेतलेल्या निर्णयांचा पाढा वाचला.परंतु, पंतप्रधान एवढ्यावरच थांबले नाहीत; त्यांनी कॉंग्रेसच्या 'जन्मकुंडलीचा' पिटारा उघडला. पंडित जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्या काळातील अशा काही ऐतिहासिक चुका आणि निर्णय त्यांनी समोर आणले, ज्याबद्दल आजची तरुण पिढी अनभिज्ञ होती.पंतप्रधानाांनी केवळ राजकारण न करता ऐतिहासिक संदर्भासह कॉंग्रेसची ध्यधोरणे कशी 'देशहितापेक्षा पक्षहिताची' होती, हे साध्या भाषेत जनतेला पटवून दिले. राहुल गांधींच्या एका चुकीच्या निर्णयामुळे (अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ), कॉंग्रेसला आपल्या पूर्वजांच्या त्या चुकांचे समर्थन करणे कठीण झाले आहे, ज्या आतापर्यंत इतिहासाच्या पडद्याआड लुप्त होत्या.अर्थसंकल्पीय अधिवेशनात जनतेच्या पैशाचा हिशोब होणे गरजेचे असते. पण जेव्हा विरोधक तासनतास कामकाज रोखून धरतात, तेव्हा अनेक महत्त्वपूर्ण विधेयके विना चर्चा मंजूर होतात.राहुल गांधींनी आपल्या 'असंसदीय' वागण्याने आणि अपुऱ्या तयारीने केलेल्या आरोपांमुळे स्वतःच्याच पक्षाच्या प्रतिष्ठेला धक्का लावला आहे.थोडक्यात सांगायचे तर...राजकारणात आक्रमकता असावी, पण ती अभ्यासावर. राहुल गांधींच्या सध्याच्या रणनीतीमुळे सरकारला घेरण्याऐवजी, स्वतःच्याच पूर्वजांच्या 'पोलचिठ्ठया' उघडण्यासाठी पंतप्रधानांना आयते व्यासपीठ मिळवून दिले. हा प्रकार म्हणजे निव्वळ 'आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखा' आहे.

**अविनाश देशपांडे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# जिल्ह्यातील नवीन उद्योगांना चालना

## सेंट्रल बँक ऑफ इंडिया व एमआयडीसी ; यवतमाळ यांच्यात सामंजस्य करार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : जिल्ह्यातील जुन्या व नवीन उद्योगांना चालना देण्यासाठी व त्यांच्या कर्ज प्रकरणे गतीने निकाली काढण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया व एमआयडीसी यवतमाळ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर टापरे यांनी दिली.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय अमरावती व एमआयडीसी यवतमाळ असोसिएशन यांच्या संयुक्त पुढाकाराने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच उद्योगांसाठी आवश्यक कर्ज पुरवठा सुलभ करण्याच्या उद्देशाने इंडियन मेडिकल असोसिएशन सभागृह, दारव्हा रोड, यवतमाळ येथे क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी हा कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यवतमाळ एमआयडीसी असोसिएशनचे उपाध्यक्ष महेश अग्रवाल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सचिव आनंद भुसारी, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक सुशील गरुड यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी स्थानिक उद्योजक, सूक्ष्म व लघु उद्योग व्यावसायिक, नवउद्योजक (स्टार्ट-अप्स), महिला उद्योजक तसेच बँकेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बँकेच्या अधिकाऱ्यांनी उद्योगांसाठी उपलब्ध विविध एमएसएमई कर्ज योजना, व्याजदर सवलती, क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट अंतर्गत मिळणाऱ्या सुविधा तसेच विविध शासकीय अनुदान योजनांची सविस्तर माहिती दिली. याशिवाय प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुद्रा योजना व इतर शासकीय योजना, डिजिटल पेमेंट, उद्यम नोंदणी प्रक्रिया, महिला उद्योजकांसाठी विशेष योजना तसेच उद्योगवाढीसाठी वित्तीय साक्षरता याबाबत जनजागृती करण्यात आली. याच कार्यक्रमादरम्यान सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय अमरावती व एमआयडीसी यवतमाळ असोसिएशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. तसेच नवीन उद्योगांसाठी सुमारे 5 कोटी रुपयांचे कर्ज सेंट्रल बँक ऑफ इंडियाद्वारे मंजूर करण्यात आले असून, कर्ज मंजुरी पत्रे मान्यवरांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास अमरावती येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय कार्यालयाच्या मुख्य व्यवस्थापक शीतल मेश्राम, यवतमाळ शाखेचे वरिष्ठ प्रबंधक जयंत धकिते तसेच बँकेचे इतर अधिकारी उपस्थित होते. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक ज्ञानेश्वर टापरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपस्थित सर्व उद्योजक, ग्राहक व मान्यवरांचे सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे आभार मानले.

### ‘ग्राहक मिलन’चे आयोजन

या आउटरीच कार्यक्रमादरम्यान ग्राहक मिलनाचे आयोजन करण्यात आले. व्यापारी, हितसंबंधित घटक व बँक कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रमास उल्लेखनीय प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील एमएसएमई क्षेत्राला नवे बळ मिळेल व सेंट्रल बँक ऑफ इंडिया आर्थिक समावेशन व पारदर्शक कर्ज वितरणासाठी आपले कार्य अधिक सक्षम करेल, अशी भावना एमआयडीसी असोसिएशन, यवतमाळ यांच्यातर्फे व्यक्त करण्यात आली. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना व अनुदानाबाबत माहिती देत नवउद्योजकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी केले.

# टिपेश्वर ESZ प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची कथित पायमल्ली

## संयुक्त उच्चस्तरीय चौकशीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - जिल्ह्यातील केळापूर तालुक्यात असलेल्या टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यालगतच्या इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रात कथितरित्या नियमबाह्य व्यावसायिक बांधकामे, रिसॉर्ट उभारणी, खदानी उत्खनन तसेच वृक्षतोड सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची थेट पायमल्ली होत असल्याचा दावा करत जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ही तक्रार अंकित नैताम, जिल्हा उपाध्यक्ष (यवतमाळ जिल्हा ट्रायबल फोरम) व संचालक, पर्यावरण स्वास्थ्य संस्था यांनी केली असून, वन विभाग, महसूल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) तसेच संबंधित प्राधिकरणांची संयुक्त उच्चस्तरीय समिती नेमून तात्काळ प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तक्रारीनुसार, केंद्र शासनाची दिनांक १७ जानेवारी २०१६ ची इको सेन्सिटिव्ह झोन अधिसूचना तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाचा ३ जून २०२२ चा आदेशानुसार संरक्षित क्षेत्राभोवती किमान 1 कि.मी. परिसरात नवीन कायमस्वरूपी बांधकामांवर कडक निर्बंध आहेत. मात्र, या नियमांचे उल्लंघन करून काही ठिकाणी व्यावसायिक प्रकल्प सुरू असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. संबंधित प्रकल्पांना आवश्यक पर्यावरणीय, वनविषयक व वैधानिक परवानग्या आहेत की नाहीत, याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. टिपेश्वर अभयारण्य परिसर हा आदिवासीबहुल भाग असून अनेक शेतजमिनी थेट अभयारण्यालगत आहेत. वन्यप्राण्यांच्या वाढत्या संचारामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पीक नुकसान होत असून शेती करणे दिवसेंदिवस कठीण बनत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या तार फेन्सिंगसारख्या उपाययोजनांची अपुरी अंमलबजावणी ही देखील गंभीर बाब ठरत आहे. अशा परिस्थितीत अभयारण्याच्या प्रवेशद्वारालगतच व्यावसायिक प्रकल्प उभे राहत असल्याच्या चर्चेमुळे पर्यावरणीय संतुलन व स्थानिक नागरिकांच्या हक्कांबाबत तीव्र प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### “कायद्याच्या चौकटीतच विकास व्हावा” : अंकित नैताम

या संदर्भात बोलताना अंकित नैताम म्हणाले, “टिपेश्वर अभयारण्य हे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील क्षेत्र आहे. विकास आवश्यक आहे, मात्र तो पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या चौकटीतच झाला पाहिजे. संयुक्त चौकशीद्वारे वस्तुस्थिती स्पष्ट करून अनियमितता आढळल्यास दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.”

### प्रशासन व लोकप्रतिनिधींची भूमिका ठरणार निर्णायक

या गंभीर प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घेऊन निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करावी, तसेच संबंधित लोकप्रतिनिधींनीही सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. टिपेश्वर प्रकरण हे केवळ एका अभयारण्यापुरते मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण, आदिवासी हक्क आणि शाश्वत विकास यांच्यातील संतुलनाचा राज्यव्यापी प्रश्न असल्याने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

# वेचक



### जि.प. उच्च प्राथमिक मराठी शाळा दादाजी नगर येथे सांस्कृतिक कार्यक्रम

महागाव - आज दिनांक 06/02/2026 रोज शुक्रवार ला जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक मराठी शाळा दादाजी नगर हिवरा (सं) येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष हिवरा ग्रामपंचायतचे उपसरपंच शरद पाटील कदम होते तर उदघाटक म्हणून हिवरा ग्रामपंचायतच्या सरपंचा सौ मेघाताई बोरुळकर ह्या उपस्थित होत्या. तसेच कार्यकर्माचे प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य राजुभाऊ धोतरकर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अश्विनी सुदर्शन हिरेकर उपध्यक्ष श्री.पवन बाबाराव भुसारे व शाळा व्यवस्थापन सर्व सदस्य तसेच केंद्र प्रमुख अनुप पंडित साहेब पालक वर्ग व राजयोगिनी इंग्लिश स्कूल चे डायरेक्टर भास्कर बडुरे उपस्थित होते. उदघाटक सौ मेघाताई बोरुळकर यांनी फीत कापून कार्यक्रमाचे उदघाटन केले. 'स्नेहसंमेलन' या सांस्कृतिक कार्यक्रमात गावकर्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. आणि सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक नारायण सोनुळे सर, सहाय्यक शिक्षक सुनील चव्हाण उर्दू शाळेचे शिक्षक एजाज सर फिरोज शेख सर यांनी परिश्रम घेतले.

### सरस्वती पब्लीक स्कूलमध्ये पालकांनी घेतला विविध स्पर्धामध्ये सहभाग

बाभूळगाव - येथील सरस्वती पब्लीक इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ३१ जानेवारी ते ३ फेब्रुवारी दरम्यान पालकांसाठी विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकांनी मोठ्या उत्साहात यामध्ये समावेश सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा कृपा पटेल आणि निशित पटेल होते. तर प्रमुख अतिथी म्हणून रुचि पटेल, पिनल पटेल, मुख्याध्यापिका आराधना कटनकर, निलेश अमृतकर, श्वेता चोरमले यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामध्ये ३१ जानेवारी या पहिल्या दिवशी रांगोळी स्पर्धा, लिम्बु चम्मच, १ मिनिट शो, दुसऱ्या दिवशी डिश डेकोरेशन, संगीत खूर्ची, १ मीनीट शो, ३ - फेब्रुवारी समारोपीय दिवशी फॅशन शो, गीत गायन, नृत्य हे सर्व - कार्यक्रम पालकासाठी ठेवण्यात आले होते. फॅशन शो मध्ये पालकांनी आपल्या पाल्यांसोबत सहभाग घेऊन कार्यक्रमात उत्साह भरला. फॅशन शोचे परीक्षण निशित पटेल आणि पिनल पटेल यांनी केले. तर डिश डेकोरेशन - स्पर्धेचे परीक्षण कृपा पटेल आणि - रुची पटेल यांनी केले. या कार्यक्रमात पालकांनी तिन्ही - दिवस मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक वृंद दिपाली इंगळे, लाची इंगोले, - मृणालिनी भूसारी, वैष्णवी भोयरकर, स्वाती भरडे, चंचल वर्भे, देवयानी मोने, अक्षय जाठे, - कल्पना भांगे, अनुराधा जयसिंगपूरे यांनी परिश्रम घेतले.

# घनमोड येथे अवैध दारू विक्रीविरोधात महिलांचा आवाज

## आरोपींकडून शिवीगाळ व धमकी, गुन्हा दाखल



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - केळापुर तालुक्यातील घनमोड गावात अवैध देशी दारू विक्रीला विरोध केल्यामुळे एका महिलेसह गावातील महिलांना शिवीगाळ व आत्महत्येची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पांढरकवडा पोलीस स्टेशनमध्ये आरोपी पती-पत्नीविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी सौ.विठाबाई रमेश पुसनाके (वय ४७, रा.घनमोड). चंदा राजू पेंदोर (वय ३२) चंद्रकला अनिल मेश्राम (वय ४२) वर्षा विलास कुमरे,(वय ४५)निर्मला सोमा मेश्राम (वय ५७)अहिल्या राजू पेंदोर (वय ३६) भारती विलास तोडासे (वय ३०) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार,गावातील गणेश आत्राम (वय ४०)व त्याची पत्नी सौ.संगिता गणेश आत्राम (वय ४७) हे दोघेही आपल्या घरातून अवैधरीत्या देशी दारूची विक्री करत होते. दारू विक्रीमुळे गावातील लहान मुले व युवक व्यसनाधीन होत असल्याने गावकऱ्यांनी यापूर्वी बैठक घेऊन त्यांना दारू विक्री बंद करण्याची समज दिली होती.दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास,फिर्यादी व गावातील १५ ते २० महिलांनी आरोपींच्या घरासमोर जाऊन दारू विक्री बंद करण्याची विनंती केली असता, आरोपींनी सार्वजनिक रस्त्यावर महिलांना अश्लील शिवीगाळ केली तसेच “पुन्हा विरोध केला तर आत्महत्या करू” अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून बी.एन. एस.कलम २९६, ३५१(२)(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस स्टेशन पांढरकवडा येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बुर्रेवार करीत आहेत.

# ७७ वर्षांनंतरही महिलांच्या प्रसाधनगृहांचा प्रश्न प्रलंबित डॉ. नीरज वाघमारेंनी प्रशासनाचे वेधले लक्ष

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - यवतमाळ नगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आज दिनांक ९ फेब्रुवारी (सोमवार) रोजी नगरपरिषद यवतमाळ येथे नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली सर्वसाधारण सभा होणार होती. मात्र नगरपालिकेचे मुख्याधिकारी गैरहजर असल्याने ही सभा वेळेवर रद्द करण्यात आली,त्यामुळे अधिकृत चर्चा होऊ शकली नाही. सभा रद्द झाली असली तरी वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष,गटनेते तथा नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी यावेळी शहरातील अत्यंत महत्त्वाचे नागरी व सामाजिक प्रश्न उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले.त्यांनी आपल्या पांढऱ्या सदऱ्यावर ठळक अक्षरांत प्रश्न लिहून ते परिधान करत सभागृह परिसरात उपस्थिती नोंदवली.

त्यांच्या सदऱ्यावर “माता-भगिनींना प्रसाधनगृह कधी?” “सफाई कामगारांचा प्रश्न—किमान वेतन कधी?” असे दोन ज्वलंत प्रश्न स्पष्टपणे मांडण्यात आले होते.या प्रतीकात्मक कृतीमुळे सभागृह परिसरासह उपस्थित नागरिक आणि प्रसार माध्यमांमध्येही मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली. डॉ.नीरज वाघमारे यांनी यावेळी नमूद केले की,२६ जानेवारी रोजी देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, मात्र याच ७७ वर्षांच्या कालावधीत ब्रिटिशकालीन भारतानंतर,स्वातंत्र्योत्तर काळात आणि आज २०२६ पर्यंत यवतमाळ शहरात महिलांसाठी साधे सार्वजनिक लघुशंकेचे प्रसाधनगृहही निर्माण होऊ शकले नाही, ही गंभीर बाब आहे. भारतीय जनता पार्टी,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अशा विविध पक्षांनी सत्तेचा उपभोग घेतला,तरीही हा मूलभूत प्रश्न प्रलंबितच राहिला असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच यवतमाळचा दुर्गोत्सव हा देशातील क्रमांक दोनचा दुर्गोत्सव म्हणून ओळखला जातो. मात्र अशा सांस्कृतिक परंपरा असलेल्या शहरात महिलांसाठी नगरपालिकेमार्फत आवश्यक व मुबलक सुविधा उपलब्ध नसणे हे महिलांच्या अस्तित्वाबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सफाई कामगारांना किमान वेतन, सेवा-सुरक्षा आणि मूलभूत हक्क अद्याप पूर्णपणे मिळत नसल्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला.सभा रद्द असली तरी या प्रश्नांमुळे नागरिकांमध्ये, विशेषतः प्रसार माध्यमांमध्ये एकच चर्चा सुरू झाली असून, आगामी काळात नगरपालिकेच्या कारभारात या मुद्द्यांवर ठोस निर्णय होणार का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# नेताजी नगर येथे माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शहरातील नेताजी नगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ दि. ७ फेब्रुवारी रोजी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई आंबेडकर तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नामदेवरावजी घोरपडे होते. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते भुराजी तायडे यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. बालपणापासूनच कुटुंबातील लहान भावंडांची आईप्रमाणे जबाबदारी सांभाळत रमाई यांनी त्यांचे संगोपन केले. विवाहानंतरही त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसंघर्षात सुख-दुःखाची साथ देत संपूर्ण कुटुंबाची धुरा समर्थपणे सांभाळली. म्हणूनच त्या ‘त्यागमूर्ती राष्ट्रमाता माता रमाई’ म्हणून ओळखल्या जातात, असे त्यांनी नमूद केले. बुद्ध, शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ, माता रमाई, सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजाऊ यांचे विचार घराघरात पोहोचणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनू लोखंडे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला ज्येष्ठ उपासक विठ्ठलराव वानखडे, ज्येष्ठ उपासिका द्वारकाबाई साळवे मंडपे, शशिकलाताई जोगदंडे, बीबीबाई खाडे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयोजन समिती समन्वयक मंगलाताई जाधव यांनी केले, तर पुतळा समितीचे अध्यक्ष व संपादक डी. के. हनवते यांनी आभार प्रदर्शन केले.

# संत गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिद्धकोटीला पोचलेले महान संत : गणेश धर्माळे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - अध्यात्म, भक्ती आणि निस्वार्थी सेवेचा एक उत्तम आदर्श संत गजानन महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या विदर्भाचे पंढरपूर शेगाव येथे पहायला मिळतो, संत गजानन महाराजांनी कर्म, योग व भक्तीमार्ग जीवात्म्याला आत्मज्ञान प्राप्त करून देतात सांगितले ते नेहमी तुर्यावस्था अथवा सहज समाधीत राहून उपदेश करायचे आजही लाखो भक्तांना त्यांची कृपा, प्रेम आशीर्वाद व मार्गदर्शन लाभत आहे कारण ते ब्रम्हिभुत झाल्याने जगदाकार झाले आहेत असे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार गणेश धर्माळे यांनी संत श्री. गजानन महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व प्रकट दिनानिमित्य शंकर नगर द्वारका नगरी येथे केले.

सकाळी वेदशास्त्र पुरोहित ह.भ.प.बाळू महाराज गुरु मुळावा व ह.भ.प. रमेश महाराज गुरु तसेच पुसद नगरीच्या नगराध्यक्ष ॲड.मोहिनी इंद्रनील नाईक यांच्या उपस्थितीत मूर्ती स्थापना व महाआरती झाली त्यानंतर वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नरदेहाची सुंदर वेळा साधून घे लवलाही सुखकर हरिगुण गाई ह्या भजनावरील राष्ट्रीय कीर्तनात धर्माळे पुढे म्हणाले की प्रपंचात धन संपदा आवश्यक आहे एकाही संताने ती कमवू नका असे सांगितले नाही परंतु ती ईमानदारी व मेहनत करून कमवा, पैसा साधन आहे साध्य नाही,क्षणभंगुर जीवन असल्यामुळे कुणाचा द्वेष करू नका लोभ,स्वार्थ, अहंकार विरहित राहून सर्वांशी प्रेम,आपुलकी जिव्हाळ्याने रहा, ईश्वराचे अंतःकरण पूर्वक केलेले भजन व संत सहवास युक्त जिवन भवसागर पार करू शकते संतांचा उपदेश म्हणजे दिव्यबोध व सांगितलेली साधना हे दोन चरण व आपले शुद्ध आचरण यामुळे जीवनाचा उद्धार होतो. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंदिर समिती अध्यक्ष ॲड. कैलास राठोड, उपाध्यक्ष अनिल करे, सचिव विनायक घुगे,कोषाध्यक्ष शिवाजी होडगीर,सदस्य ॲड. सुनील ढाले, वरुण पांडे,सदाशिव काळे,संतोष गायकवाड,गजानन वाळके,मारोती बोरचाटे, रामराव हिंगाडे, गणेश राठोड, संभाजी हातमोडे, आकाश पाटील, शिवलिंग अण्णा पटवे, अरुण मस्के यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी असंख्य स्त्री पुरूष,बाल गोपाल, आबाल वृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-4/कावि/ /2025
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 19/01/2026

**जाहीरनामा**

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **संतोष अमृता नरवाडे रा. उमरखेड** ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी त्यांचे स्व:ताचे नामे संतोष अमृता नरवाडे **यांचा जन्म मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** २०.१०.१९७८ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 06/02/2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# गुलाम नबी आझाद उर्दू विद्यालयात करिअर गायडन्स प्रोग्राम संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : ७ फेब्रुवारी २०२६ रोजी गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल,पुसद येथे विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य लक्षात घेऊन करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते.

शाळेतील शिक्षक व पुसद शहरातील प्रसिद्ध करिअर कौन्सिलर सय्यद सलमान सरांनी शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दहावीनंतर उपलब्ध असलेल्या विज्ञान, कला, वाणिज्य, आयटी, पॉलिटेक्निक, आयटीआय, स्पर्धा परीक्षा, कौशल्याधारित अभ्यासक्रम तसेच भविष्यातील रोजगाराच्या संधी याबाबत त्यांनी सविस्तर व सोप्या भाषेत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार योग्य करिअरची निवड करावी, तसेच वेळेचे पालन, नियमित अभ्यास, आत्मविश्वास व शिस्त यांचे महत्त्व लक्षात ठेवावे, असे मार्गदर्शन सय्यद सलमान सर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे देत प्रेरणादायी उदाहरणांद्वारे योग्य दिशा दाखवली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी जागरूकता निर्माण झाली व त्यांच्या भविष्यासाठी स्पष्ट दिशा मिळाली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सैय्यद सलमान सरांना करिअर बद्दल अनेक प्रश्न विचारातून आपल्या शंकेचे निरसरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे वरिष्ठ शिक्षक तारीक अहमद खान सरांनी सय्यद सलमान सर यांचे विद्यालयातर्फे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद सादिक सर यांनी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. अलोक गुप्ता सुश्रुत रत्न पुरस्काराने सन्मानित

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - यवतमाळचे भूमीपुत्र आणि सुप्रसिद्ध मूळव्याध आणि भगंदर तज्ञ डॉ अलोक मोहनलाल गुप्ता यांना यंदाचा सुश्रुत रत्न पुरस्कार बहाल करून सन्मानित करण्यात आले. मूळव्याध तसेच भगंदर चिकित्सा आणि शस्त्रक्रियामध्ये अतुलनीय योगदानाबद्दल राष्ट्रीय पातळी वरील "सुश्रुत रत्न पुरस्कार 2026" हा राष्ट्रीय आयुर्वेद संस्थान जयपूर येथे नॅशनल सुश्रुत असोसिएशनद्वारे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयचे सचिव पद्मश्री डॉ राजेश कोटेचा, राष्ट्रीय आयुर्वेद संस्थानचे कुलपती डॉ संजीव शर्मा, उपकुलपती डॉ. पी.हेमंत कुमार व पद्मश्री डॉ.मनोरंजन साहू यांच्या हस्ते भारतातील विविध क्षेत्रातून आयुर्वेदातील शल्यकर्म तज्ञ यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. डॉ अलोक गुप्ता यांना प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल यवतमाळ निमा, सेंट्रल निमा, सुश्रुत इंटिग्रेटेड फेलो फॉर बेनाइन अँनो रेक्टल डिसीजेस, आयुर्वेद प्रॉक्टोलॉजी असोसिएशन तसेच सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे. डॉ अलोक गुप्ता हे वैद्यकीय व्यवसायासोबत सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून सेवा समर्पण प्रतिष्ठानचे सचिव, ओलावा फाउंडेशन, प्रयास यासह बऱ्याच संस्थेत सेवारत आहेत.

# शासनातर्फे होणाऱ्या कर्जमाफीचे कामाकरीता शेतकऱ्यांनी सहकार्य करावे : मनिष पाटील

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्यातील शेतकरी बांधवांच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि त्यांना कर्जबाजारीपणातून मुक्त करण्यासाठी सरकारने एक महत्वपूर्ण पाऊल उचललेले आहे. तेव्हा शासनातर्फे होणाऱ्या कर्जमाफीचे कामाकरीता शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन मनिष उत्तमराव पाटील, अध्यक्ष, दि य.जि.म.सह.बँक मर्या., यवतमाळ यांनी केले आहे.

अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या थकीत कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला आहे. तेंव्हा दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या सर्व शेतकऱ्यांनी या कर्जमाफीचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्याला जमा करून घेण्यासाठी खालील नियमांचे पालन करावयाचे आहे. बँकेमार्फत थकीत असलेल्या कर्जदारांची माहिती पोर्टलद्वारे अपलोडिंगचे कामास सुरुवात झालेली असून ज्या शेतकरी सभासदांनी आपली माहिती ग्रा.वि.का. सचिवा जवळ किंवा बँकेत सादर केली नाही अशा थकीत कर्जदार सभासदांचे KCC खात्याशी किंवा सेव्हींग खात्याशी आधार लिंक असणे अनिवार्य आहे. शेतकरी आय.डी. क्रमांक उपलब्ध असल्यास मोबाईल क्रमांक असणे आवश्यक राहील. ज्या बँकेतून पिक कर्ज घेतले आहे त्या बँकेच्या पासबुकची पहिल्या पानाची छायांकीत प्रत ज्यांचे खातेक्रमांक नसेल अशा शेतकरी सभासदांनी तात्काळ नजिकचे शाखेत खाते उघडून घ्यावे. शासन निर्णयानुसार वेळोवेळी अटी आणि शर्ती बदलू शकतात, त्यामुळे आपल्या संबंधित विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी किंवा बँकेच्या शाखेशी संपर्क साधावा. अशी माहिती मनिष उत्तमराव पाटील, अध्यक्ष, दि य.जि.म.सह.बँक मर्या., यवतमाळ यांनी प्रसार माध्यमांना दिली आहे.

# गज़लची समीक्षा हवी तेवढी झाली नाही

## तिसऱ्या अ. भा. एल्गार मराठी गज़ल संमेलनाचा समारोप, 'सोबतीचा करार' ने केले गज़ल रसिकांना मंत्रमुग्ध



**अमरावती/ का.प्र.**

मराठी गज़ल समाजमनापर्यंत पोहोचवण्याचे काम सुरेश भट यांनी खूप परिश्रमपूर्वक केले. कवितेची विपुल प्रमाणात समीक्षा झालेली आपल्याला दिसते मात्र गज़लची समीक्षा तेवढी झालेली दिसत नाही, हा एकप्रकारे गज़लवर झालेला अन्याय आहे, अशी खंत रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केली.

तिसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गज़ल संमेलनाच्या समारोप सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. स्व. सुरेश भट स्मृती प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोन दिवसीय संमेलनाचा संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे समारोप झाला. मंचावर संमेलनाचे उद्घाटक शाहीर सुरेशकुमार वैराळकर आणि स्वागताध्यक्ष नाना लोडम उपस्थित होते. यावेळी बोलताना नाना लोडम यांनी गज़ल उपासनेच्या ध्येयातून मराठी गज़ल परिषदेची निर्मिती करण्यात आलेली असून हा मंच येत्या काळात गज़ल संबंधी विविध उपक्रम राबवले, असे सांगितले. वैभव जोशी यांनी नवीन गज़ल लिहिणाऱ्यांना सोशल मीडियावर पोस्ट होण्याची अजिबात घाई न करण्याचे आवाहन केले. समारोप सोहळ्यात स्व. व्यंकटराव देशमुख स्मृती पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते गज़लकार गजानन वाघमारे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. मंचावर संदीप व्यंकट देशमुख, मंगेश देशमुख, क्षिप्रा देशमुख आणि वल्लरी देशमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप देशमुख यांनी केले. आभार नाना लोडम यांनी मानले.

**मुशायरे, परिसंवाद, मैफिलीने गाजला दुसरा दिवसही**

गज़ल संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी भरगच्च कार्यक्रम झाले. यात दिवंगत गज़लकारांच्या स्मरणार्थ सात दमदार मुशायरे झाले. दुपारी शिवाजी जवरे यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी गज़लचे वर्तमान आणि भविष्य' या विषयावर संवादी स्वरूपाचा परिसंवाद रंगला. यात गज़ल गायकीच्या अंगाने संगीतकार मुजुमदार यांनी तर निवेदकाच्या भूमिकेतून अनंत नांदूरकर यांनी भाष्य केले. अध्यक्षीय विचार व्यक्त करताना शिवाजी जवरे यांनी 'वर्तमान मराठी गज़ल ज्या प्रगल्भतेने प्रवास करते आहे ती बघता कुणीच तिच्या भविष्याची चिंता करण्याची गरज नाही', असे रोखठोक विधान केले. 'सोबतीचा करार' या सुरेल गज़ल मैफलीने संमेलनाची सांगता झाली. सबकुछ वैभव जोशी अशी टॅगलाईन असलेल्या या सुश्राव्य मैफिलीत आशिष मुजुमदार यांनी संगीतबद्ध केलेल्याजोशी यांच्या गज़लांचा रसास्वाद गायक दत्तप्रसाद रानडे यांनी रसिकांना भरभरून दिला. देशभरातून आलेले गज़लकार, शहरातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्राती ल नामवंत विभूती, गज़लप्रेमी तसेच साहित्यिक या सोहळ्याचे साक्षीदार झाले.

## संत नरहरी महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा



**अचलपूर/ वार्ताहर**

श्री नरहरी माळवी सुवर्णकार संघ व सर्व शाखीय सोनार संघ यांचे संयुक्त विद्यमाने शहरातील अभिनव कॉलनी येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा, पुण्यतिथी व सभागृहाच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री संत नरहरी महाराज यांची मूर्तीची मिरवणूक व विधिवत प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली.

इंदिराबाई रामभाऊ काशीकर सभागृहाच्या लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजबांधव तसेच गुणवंत विद्यार्थी आणि मान्यवरांचा सत्कार समारंभ सुद्धा करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ह. भ .प रामदास महाराज चेडे, प्रमुख अतिथी म्हणून अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे, प्रमोद कोरडे, रुपाली माथने ,रमेश मडघे, विलास काशीकर उपस्थिती म्हणून नंदकिशोर गुबळे, अभय माथने, कल्लू महाराज दीक्षित, राजू माहेश्वरी, राजेश अनासाने, विलास अनासाने, अशोक हिरुळकर, शशांक माथने, युवा स्वाभिमान पक्षाचे उपेन बछले, तमिज शहा उपस्थित होते. संचालन विजय काशीकर प्रास्ताविक महेश शेरकर आणि आभार प्रदर्शन गजानन बीजागरे यांनी मांडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष, समस्त कार्यकारी व सल्लागार मंडळ नरहरी माळवी सोनार संघ, झाडे सोनार संघ वैश्य सोनार संघ, दैवश्य सोनार संघाचे सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीमध्ये ग्रामीण बचत गटांवर कर्जांचा समावेश करा-किशोर तिवारी

**नागपूर**-महाराष्ट्राच्या महायुती सरकारच्या २०२६ मध्ये जून महिन्यातील प्रस्तावित कर्जमाफीमध्ये सध्या शेती साठी पीककर्ज वाटप शेतकऱ्यांचे गट व देवाभाऊ यांच्या 'लाडक्या बहिणींच्या' नावावर बचत गटाच्या नावावर कृषी कर्ज मायक्रो फायनान्स कंपन्या ,सरकारी बँका, नागरी बँका व पत संस्था यांनी दिलेले पीककर्जाचे समावेश करण्यात यावा अशी मागणी नापिकीग्रस्त विदर्भातील शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठी लढणारे कार्यकर्ते किशोर तिवारी यांनी प्रस्तावित कर्ज माफी स्थापन केलेल्या प्रविणसिंग परदेशी समितीकडे दिला आहे.

सहकारी व सरकारी बँका यांचे पीककर्ज वाटप पश्चिम विदर्भ व मराठवाड्यात फक्त ४० टक्के असून शेतीसाठी लागणारे भांडवल मायक्रो फायनान्स कंपन्या व नागरी बँका, नागरी पत संस्था यांचे ६० टक्के कृषी कर्ज वाटप करीत आहे. या सर्व नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांना सरकारी पैसा सरासरी १८ ते २४ टक्के व्याज दराने करीत आहे. मायक्रो फायनान्स कंपन्या व नागरी बँका नागरी पत संस्था यांच्या पठाणी वसुलीमुळे बहुतेक सर्व शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. मात्र, यापुर्वी घोषीत महायुती व महाविकास आघाडीच्या कर्ज माफी मध्ये शेतकरी समूह व महिला बचत गटाचा समावेश करण्यात आला नव्हता. त्यामुळे



६० टक्के प्रचंड अडचणीमधील कर्जबाजारी शेतकरी केवळ गटा मार्फत मायक्रो फायनान्स कंपन्या व नागरी बँका नागरी पतसंस्था कर्ज घेतल्यामुळे वंचित राहीले आहेत व यांना या पठाणी कर्जांमधून मुक्ती दिल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत असा दावा किशोर तिवारी यांनी केला आहे. सहकारी व सरकारी बँका यांचे पीककर्ज वाटप पश्चिम विदर्भ व मराठवाड्यात २०१२ पासूनच फारच कमी असून त्यामुळे महायुती व महाविकास आघाडी दिलेल्या कृषी कर्जमाफीचा लाभ या भागातील दुष्काळग्रस्त व कर्जबाजारी शेतकऱ्यांना होत नसुन आतातर उत्तर महाराष्ट्रातही हीच परिस्थिती आली आहे महायुती सरकारच्या २०२६ मध्ये जून महिन्यातील प्रस्तावित कर्जमाफीमध्ये जर या अल्प भूधारक कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या सरसकट समावेश करण्यात आला नाही तर प्रस्तावित कर्जमाफी सुद्धा बँकांच्या व प्रस्तापितांचा घशात जाणार अशी भीती किशोर तिवारी यांनी व्यक्त केली आहे.

# संक्षिप्त

## 'क्रिप्टेक्स टेक्नॉलॉजी' चा कॅम्पस ड्राइव्ह



**अमरावती**-श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयात कम्प्युटर सायन्स, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व एमसीए अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथील क्रिप्टेक्स टेक्नॉलॉजी कंपनीतर्फे कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले. या कॅम्पस ड्राइव्हसाठी १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कंपनीतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) धांडे तसेच मानव संसाधन विभागाच्या प्रतिनिधी रसिका दिवाण यांनी विद्यार्थ्यांची ॲप्टिट्यूड चाचणी घेतली. ॲप्टिट्यूड चाचणीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे एचआर मुलाखत तसेच सीईओ मुलाखत घेण्यात आली. या निवड प्रक्रियेत कम्प्युटर सायन्स विभागातील तन्वी पोहनकर, अमिषा कातवणे तसेच इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील कार्तिक श्रीवास, तन्वी जीवतोंडे या चार विद्यार्थ्यांची यशस्वी निवड करण्यात आली. सदर कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. प्रणव चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## शिवमहापुराण कथेचे आयोजन



**अमरावती-** भातकुली तालुक्यातील निंभा येथील जागृत आणि स्वयंभू शिवालय असलेले श्री बालकनाथ संस्थान येथे महाशिवरात्रीच्या पर्वावर भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ प.पुरुषोत्तम महाराज मुरेकर (वडाळी देशमुख) यांच्या सुश्राव्य वाणीतून या कार्यक्रमाचा लाभ घेता येणार आहे. सोमवार ९ ते रविवार १५ फेब्रुवरीपर्यंत दुपारी ०२ ते सायंकाळी ०६ पर्यंत ही कथा असणार आहे. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ०९ ते १२ पर्यंत काल्याचे कीर्तन आणि त्यानंतर दुपारी १२ ते ०४ पर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### सायरा बानो अहमद

**धामणगाव रेल्वे**-जिल्हापरिषद शाळा, जळका जगताप येथील मुख्याध्यापक शकील अहमद यांच्या पत्नी तसेच पत्रकार सायरा बानो अहमद (५०) यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती व एक मुलगी असा परिवार आहे.

### नलिनी गीते

**भंडारज-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील भंडारज येथील प्रतिष्ठित नागरिक प्रवीण त्र्यंबकराव गीते यांच्या मातोश्री श्रीमती नलिनी त्र्यंबकराव गीते यांचे ७ फेब्रुवारीला निधन झाले. त्यांच्या पश्चात मुली, १ मुलगा, सून, नातवंडे, जावई आप्तपरिवार आहे.

# प्रशिक्षक विठ्ठल गावंडे यांचे विभागीय स्तरावर निवड




**मोर्शी/ वार्ताहर**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धेत अंबाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य निरीक्षक खो खो खेळाडू व कोच विठ्ठल गावंडे यांचे विभागीय स्तरावर निवड झाली आहे. अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या आवारात जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या होत्या. या क्रीडा स्पर्धेत मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या अंबाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य निरीक्षक तथा क्रीडापटू विठ्ठल गावंडे यांची खो-खो क्रीडा स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड करण्यात आली आहे. बुलढाणा येथे होणाऱ्या विभागीय स्तरावर खो खो स्पर्धेत अमरावती संघाचे विठ्ठल गावंडे नेतृत्व करणार आहे. त्यांचा नुकताच मोर्शी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी स्वप्नील मदगूल, तालुका समन्वयक सुरेंद्र वानखडे, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर गायकवाड, गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे, पंचायत समितीचे अधीक्षक नंदकिशोर नासरे यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला होता. या क्रीडा स्पर्धेत मोर्शी पंचायत समितीचे चेतन पाटील यांचा मोलाचा वाटा होता.

# निवडणुकीत दिलेली आश्वासन हवेत?

## जनतेचा नगरसेवकांना सवाल






**चांदुर रेल्वे/ वार्ताहर**

सत्ता कोणाचीही येवो मात्र आमच्या समोरील प्रश्न मात्र 'जैसे थे'च राहतात असा थेट संतप्त सूर शहरातील नागरिकांकडून उमटत आहे. नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी संपली नवे नगरसेवक नगरसेविका निवडून आले. आपापली सत्ता स्थाने भरली मात्र आता खऱ्या अर्थाने जनतेची परीक्षा सुरू झाली आहे.

निवडणुकीदरम्यान रस्ते, पाणी, स्वच्छता, क्रीडांगणे, उद्याने, सभागृह अशा मूलभूत प्रश्नावर भरभरून आश्वासन देण्यात आली. परंतु निवडणुकी संपताच ती आश्वासने हवेतच उडणार का? अशी शंका मतदार व्यक्त करत आहे. शहरात सध्या सर्वत्र अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. कचराकुंड्या गच्च भरलेल्या आहेत. नालीची नियमित साफसफाई होत नसल्याने सांडपाणी रस्त्यावर साचते. त्यामुळे दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असून, जी आहे त्याची स्थिती दयनीय आहे. स्वच्छतेचे अभावी नागरिक त्याचा वापर टाळ तात. शहरा तील मुख्य रस्त्यावर वाढलेले अतिक्र मण, वाहतूक आणि स्वच्छता हे प्रश्न गंभीर झाले आहेत. शहर अतिक्रमण मुक्त करणे आता काळाची गरज आहे. महिलांच्या दृष्टीने सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न. आठवड्यातून केवळ एक किंवा दोनदाच पाणी येत असल्याने नोकरदार, कामगार महिलांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शहराला किमान आठवड्यातून दोन वेळा तरी पाणीपुरवठा करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे. शहरांतर्गत रस्त्याची अवस्था अतिशय गंभीर असून खड्ड्यामुळे अपघातांचा धोका वाढलेला आहे. रेल्वे स्टेशन पासून जुना मोटर स्टॅन्ड पर्यंतचा रस्ता अति दयनीय झालेला आहे. चांदुर रेल्वे शहराच्या बाळासाहेब ठाकरे मुख्य चौकावर वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून नागरिक हैराण झालेले आहे. तसेच शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून मोकाट जनावरे रस्त्यावर फिरत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. निवडणूक संपली सत्ता स्थापना झाली आता काम करून दाखवण्याची वेळ आली आहे . मात्र मोबाईलवर स्टेटस ठेवून व सोशल मीडियावर आपली प्रसिद्धी करून स्वच्छतेचा गाजावाजा करत नवनिर्वाचित नगरसेवक दिसत आहेत परंतु गावातील समस्या जैसे थे असल्याचे दिसून येत आहे.

## माजी आ. प्रा. साहेबराव तट्टे यांचा अभिष्टचिंतन सोहळा



**लेहेगाव/ वार्ताहर**

बालपणात झालेले संस्कार व त्याच वयात सर्वजातीधर्मात मैत्रीपूर्ण वावर जिवन घडायला उपयोगी पडला असे प्रतिपादन माजी आमदार प्रा. साहेबराव तट्टे यांनी त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या प्रसंगी काढले ८० व्या वर्षामध्ये पदार्पण करीत असताना सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा उत्साहात पार पडला. स्वराज फाउंडेशन शिरखेडच्या रूपाली नितेश जाणे मित्र परिवाराचे वतीने अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यानिमित्त मोर्शी नगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा देखील सत्कार संत नानागुरु देवस्थानच्या सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे, धामणगाव रेल्वे विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रताप अडसड, आमदार उमेश यावलकर मोर्शी विधानसभा , रविराज देशमुख अध्यक्ष अमरावती जिल्हा भाजपा, विद्या तट्टे, (माजी जिल्हा परीषद सदस्य). तात्या मेश्राम , संजय तट्टे (उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती मोर्शी). संजय घुलक्षे , मुरलीधर डहाने प्रकाश कनेर, प्रल्हाद देशमुख, विजय मडके ,नितिन उमाळे, नरेन्द्र जिचकार, नितिन राऊत, मंगेश बोंडे आदींची उपस्थिती होती. यावेळी मोर्शी नगरपरिषदेचे अध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाणे, सदस्य प्रीती ब्रम्हानंद देशमुख, सुनिता कोहळे, हर्षल चौधरी, नितीन पन्नासे, रवींद्र गुल्हाणे, प्रभाताई फंदे, जयश्री आगरकर, मोनाली फंदे, सरिता उमाळे, देवकुमार बुरंगे सरपंच लीहीदा , विकास तट्टे अध्यक्ष भाजपा मोर्शी यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार उमेश यावलकर, रविराज देशमुख अध्यक्ष अमरावती जिल्हा भाजपा प्रवीण राऊत यांनी याप्रसंगी माजी आमदार साहेबराव तट्टे यांच्याप्रती गौरव उदगार काढले. कैलाश फंदे यांनी सन्मान गीत सादर केले. संचलन डॉ मुकुंद देशमुख प्रास्तविक विजय वानखडे तर आभारप्रदर्शन नीतेश जाणे यांनी केले. स्वराज फाउंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत गोमकाळे, वैभव देशमुख, मंगेश खराशे, राहुल जाणे, डॉ मुकुंद देशमुख, अंकित अडोकर, नितेश जाणे, प्रणय देशमुख, जितेंद्र बागल, मयूर इंगळे तथा सर्व गावकऱ्यांचे सहकार्य लाभले.

# विद्याभारती जेम्सद्वारा जल्लोषात 'जोश २०२६'

## 'खेल के रंग जोश के संग' संकल्पनेतून कलागुणांना नवे क्षितिज



**अमरावती/ का.प्र.**

स्थानिक विद्याभारती महाविद्यालय, कॅम्प, अमरावती येथे जेम्स अंतर्गत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन 'जोश २०२६' उत्साहपूर्ण व जल्लोषी वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या आनंदोत्सवाने, रंगीबेरंगी कलाविष्कारांनी व टाळ्यांच्या कडकडाटाने संपूर्ण महाविद्यालय परिसर दुमदुमून गेला होता. हे स्नेहसंमेलन विद्याभारती शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब शेखावत व विद्याभारती जेम्सच्या अध्यक्षा मंजरी शेखावत यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

'खेल के रंग, जोश के संग' ही उत्साहवर्धक संकल्पना घेऊन जेम्सद्वारा जोश २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात महाविद्यालयाचे नाव क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल करणाऱ्या मनिषा सहस्त्रबुद्धे, सर्वेश मेन, डॉ. अंजली ठाकरे, अंजिक्य दाभाडे, राम गोतमारे, अश्विनी पंडित, वृषाली गुल्हाने, प्रियंका नागदिवे, कोमल रंगारी, विनोद वानखडे, नितीन अंबर या माजी क्रीडापटूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यांच्या उल्लेखनीय योगदाना बद्दल महाविद्यालयाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच याच कार्यक्रमात यावर्षी आरडी परेडमध्ये सहभागी झालेल्या श्रावणी अपोतीकर, प्रवीण काळे व नयन राऊत या एनसीसी कॅडेट्सचा विशेष सत्कार करण्यात आला. या क्षणी उपस्थितांच्या मनात देशभक्ती व अभिमानाची भावना दाटून आली. अशा भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल विद्याभारती जेम्सच्या या रंगमंचावर महाविद्यालय परिसरातील विद्यार्थ्यांनी अनुभवली. यावर्षीच्या जोश २०२६ मध्ये महाविद्यालयातील कलावंत विद्यार्थ्यांनी गीतगायन, नृत्य, नाटिका, एकपात्री प्रयोग, राष्ट्रभक्तीपर कार्यक्रम, स्वरधारा व फॅशन शो अशा उत्तमोत्तम कार्यक्रमांतून आपला कलाविष्कार सादर केला. कार्यक्रमाला जपानमधील हिलटॉप मार्केटिंगचे संचालक नोबोरू यामादा, युको रुट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या युको कॅनेको तसेच वेलनेस डिझाईन कंपनी लिमिटेडच्या चाई शिमिझू, तसेच अमरावती जिल्ह्याचे पोलीस उपायुक्त श्याम घुगे, एसीपी गणेश शिंदे व शहरातील अनेक गणमान्य व्यक्तींनी उपस्थिती लावून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमांचा मनमुराद आनंद घेतला.

या स्नेहसंमेलनास बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा व इंडियन बँक यांचे मोलाचे प्रायोजकत्व लाभले. या स्नेहसंमेलनात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपला कलाविष्कार सादर केला व विविध पारितोषिके प्राप्त केली. सोलो नाट्य स्पर्धेत प्राजक्ता इंगळे हिला प्रथम, तर धनश्री भांबूरकर हिला द्वितीय पारितोषिक मिळाले. समूह नाट्य स्पर्धेत 'भूतो की महानगरी' यांना प्रथम, तर 'रक्ताचे पाऊल' यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. गायन स्पर्धेत हिमांशी शिस्ते हिला प्रथम, चिराग तिवारी याला द्वितीय व यशोवर्धन चव्हाण याला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. सोलो नृत्य स्पर्धेत मुलांमध्ये सक्षम चक्रे प्रथम, तन्मय बोरकर द्वितीय ठरला; तर मुलींमध्ये अनिशा शिरभाते प्रथम, मेघा अगनानी द्वितीय व रोशनी वानखडे हिला तृतीय पारितोषिक मिळाले. समूह नृत्यात गोंधळ ग्रुप प्रथम, तेजस व गुंजन ग्रुप द्वितीय, तर धनश्री व यशस्वी यांनी तृतीय पारितोषिक पटकावले. डान्स ग्रुपमध्ये मराठी बिट्स प्रथम, तर वाईब ट्राईब यांनी द्वितीय स्थान पटकावले. फॅशन शोमध्ये मुलींमध्ये मधुरिमा व जेसिका प्रथम, तर आदिती चौबे हिने द्वितीय स्थान मिळविले. मुलांमध्ये ओम वगारे प्रथम, तर आदित्य दौमिक व फैज यांनी द्वितीय स्थान पटकावले. दुसऱ्या राऊंडमध्ये रोहन गायकवाड, मयूर लोखंडे, अदिती चौबे, उन्नती नाथे यांनी पारितोषिके मिळविली; तर तिसऱ्या राऊंडमध्ये तहिमी नझीम व नीलम उदासी यांनी पारितोषिके पटकावली. शुभम मोटघरे, श्रवण जायले, दिव्या घरडे, वेदिका जोशी यांनी बॉलिवूड थीममध्ये पारितोषिक पटकावले. सूत्रसंचालन स्पर्धेत सुहानी हिरुळकर हिने प्रथम, काव्या इरुळकर हिने द्वितीय व अर्वा दवावाला हिने तृतीय स्थान मिळविले. फॅशनशोचे विशेष आकर्षण म्हणजे आदिशक्तीच्या विविध रूपांचे विलोभनीय सादरीकरण करण्यात आले. सर्व कलाविष्का रांचे परीक्षण मान्यवर परीक्षकांद्वारे करण्यात आले. या स्नेहसंमेल नात कॅम्पस परिसरातील सुमारे ६५०० विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. सदर कार्यक्रमाला संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. मिथिलेश राठौर, सचिव डॉ. अशोक चव्हाण, कोषाध्यक्ष मा. रघुनाथजी रोडे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर, फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. डी. पांडे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. व्ही. शिरभाते, आयटीआयचे प्राचार्य जी. बी. तंवर, तसेच डॉ. ए. डी. चव्हाण, मा. मनिंदर मोंगा, जेम्सचे समन्वयक उपप्राचार्य एच. के. सिसोदिया, प्रा. अथर इकबाल यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोअर कमिटीतील विद्यार्थी अक्षत तिवारी, अनंत पाटणकर, अदिती चौबे, हिर बुधलानी, आयुष अतकरे, अनिशा शिरभाते, पलक चव्हाण, दीप जायस्वाल, गुंजन पिंपळते, कृपा दाभाडे, कृतिका घुगे, वंशिका मारोते, धनश्री भांबुरकर, जेसिका चौरपगार, रणवीर मोंगा, प्रितम अर्मळ, प्रथमेश कुलकर्णी तसेच जेम्स स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या विविध विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या योगदानामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.

# शौरी यांचा ग्रंथ : विपर्यस्त व घातक!

**ग्रंथात शौरींनी आंबेडकर हे राष्ट्रविरोधी, राष्ट्रद्रोही, ब्रिटिशधार्जिणे, ब्रिटिशांचे हस्तक, स्वार्थी, ढोंगी आहेत असे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. ते दलितचिंतकही नाहीत, सुधारक नाहीत, घटनेचे शिल्पकार नाहीत हेही त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे...**

**अ**रुण शौरींनी नुकताच डॉ. आंबेडकरांसंबंधी ६८० पृष्ठांचा मोठा इंग्रजी ग्रंथ लिहिला आहे. ‘खोट्या देवांची पूजा: आंबेडकर व (त्यांच्यासंबंधीची) खोडून काढलेली ‘वस्तुस्थिती’ ('Worshipping False Gods (Ambedkar, and the facts which have been erased)’ अशा नावाचा तो ग्रंथ आहे. या ग्रंथातील काही भागाचे तीन लेख एका इंग्रजी दैनिकात प्रसिद्ध झाले. शिवाय, त्यातच आणखी एका रविवारी या ग्रंथाचे परीक्षणही प्रसिद्ध झाले. बाजारात अद्याप ग्रंथ आलेलाच नाही. अशा अवस्थेत मोठ्या दैनिकात क्रमाने चार आठवडे त्यावर लेख येतात हे सारे प्रचारतंत्र वापरून केलेले होते. या लेखांतून सर्वांना या ग्रंथात काय आहे त्याची जाणीव झाली. नंतर लोकसभेत काही सदस्यांनी हा ग्रंथ फाडून टाकला व त्यावर बंदी घालण्याची मागणी केली. नंतर दिल्लीत या ग्रंथाची होळी करण्यात आली. महाराष्ट्रातही या ग्रंथावर बंदी घालण्याची मागणी झाली. मराठी वृत्तपत्रांतून या ग्रंथात ‘डॉ. आंबेडकराचे विकृत चित्रण’ कसे करण्यात आले आहे, हे दाखवून देणारे लेख प्रसिद्ध झाले. सावरकरांविषयी मराठीत अशाच स्वरूपाचे लेखन करणारे संशोधकसुद्धा ‘सत्यापलाप आणि असत्यकथन’ हे दोन अपराध या ग्रंथात कसे केले आहेत, हे दाखवून देऊ लागले. (त्यांनी नंतर ‘डॉ. आंबेडकरांचे मारेकरी अरुण शौरी’ नावाचा साडेपाचशे पृष्ठांचा ग्रंथच लिहिला आहे.) या ग्रंथाच्या नावापासूनच शौरींचा ग्रंथहेतू स्पष्ट होऊ लागतो. अनेक मोठमोठे देशभक्त व धर्मपुरुष विस्मृतीत जाऊ लागले असताना ‘डॉ. आंबेडकरांचे दैवतीकरण चालू आहे,’ हे सहन न होऊन शौरींनी त्यांचे मूर्तिभंजन करण्यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे. आंबेडकरांविषयीचा संताप, चीड व वाईट भावना ग्रंथात जागोजाग दिसून येतात. अतिशय आक्रस्ताळेपणे हा ग्रंथ लिहिलेला आहे. जणू डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांवरील राग त्यांनी या ग्रंथात आंबेडकरांवर काढलेला आहे. शिष्यांच्या कथित अपराधासाठी गुरूला गुन्हेगार बनविले आहे !




### हेतुतः विकृतीकरण

हा ग्रंथ इंग्रजीत असल्यामुळे महाराष्ट्रात तो फार कमी प्रमाणात वाचला जाणार. या ग्रंथात शौरींनी आंबेडकरांच्या विचारांचे व प्रतिमेचे हेतुतः कसे विकृतीकरण केले आहे, हे सांगण्यासाठी एक ग्रंथच लिहावा लागेल. या ग्रंथात शौरींनी आंबेडकर हे राष्ट्रविरोधी, राष्ट्रद्रोही, ब्रिटिशधार्जिणे, ब्रिटिशांचे हस्तक, स्वार्थी, ढोंगी आहेत असे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. ते दलितचिंतकही नाहीत, सुधारक नाहीत, घटनेचे शिल्पकार नाहीत हेही त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शौरींनी युक्तिवाद करण्याची व पुरावा देण्याची एक विशिष्ट पद्धत वापरली आहे. त्यामुळे इतर माहिती असल्याशिवाय हे पुरावे पूर्णपणे लक्षात येत नाहीत व त्यामुळे दिशाभूल होते. या ग्रंथात स्वतः आंबेडकर काय म्हणतात हे फार कमी आहे. त्यांच्याविषयी इतर काय म्हणतात हेच फार आहे. उदा. व्हाइसरायाने भारतमंत्र्याला किंवा भारतमंत्र्याने व्हाइसरॉयना पाठविलेल्या पत्रांत आंबेडकरांचा उल्लेख येतो. अशा एकाने दुसऱ्याला लिहिलेल्या पत्रांची ग्रंथात रेलचेल आहे. ही पत्रे आंबेडकरांच्या हयातीत प्रसिद्ध झालेली नाहीत, ती नंतर प्रसिद्ध झालेली आहेत. ती पत्रे आंबेडकरांना माहिती असण्याची शक्यता नाही. त्यांतील बहुतेक पत्रे ‘खाजगी,’ ‘गुप्त’ अशी नोंद केलेली आहेत. या पत्रातील संबंधित उल्लेखांबद्दल आंबेडकरांना स्पष्टीकरण करण्याची संधी मिळालेली नाही. त्यामुळे त्यांची बाजू अंधारातच राहिली. अशा पत्रांचा व त्यांतील उल्लेखांचा आंबेडकरांचे चित्र उभे करण्यासाठी शौरींनी ग्रंथात फार मोठा उपयोग केलेला आहे. अशामुळे कशी दिशाभूल होते त्याचे एक उदाहरण पहा. दि. १९ नोव्हेंबर १९४० रोजी व्हाइसरॉयने भारतमंत्र्याला पाठविलेल्या ‘खाजगी’ पत्रात व्हाइसरॉय लिहितात ‘डॉ. आंबेडकर यांचे स्पष्ट मत आहे की, मुसलमान हे त्यांची ५० टक्केची मागणी ताणून धरणार आहेत. हळूहळू पाकिस्तानचा पाया घातला जाणार आहे... आणि ते (आंबेडकर) स्पष्टपणे ‘पाकिस्तान’ कल्पनेच्या बाजूचे आहेत. कारण त्यामुळे ब्रिटिशांना भारतात राहता येईल.’ (पृ.६०) शौरींच्या दृष्टीने यात आक्षेपाचे मुद्दे दोन. एक आंबेडकर पाकिस्तानच्या बाजूचे आहेत. आणि दोन, ब्रिटिश येथे राहावेत म्हणून त्यांना पाकिस्तान पाहिजे आहे. म्हणजे ते ब्रिटिशांच्या बाजूचे आहेत.

### दिशाभूल कशासाठी?

यासंबंधातील आंबेडकरांची भूमिका खरोखर काय होती है वरील पत्रावरून कळू शकत नाही. पाकिस्तानला पाठिंबा म्हणजे देशद्रोहीपणा अशा पद्धतीने शौरी युक्तिवाद करतात. खरोखर त्यांनी पाकिस्तानला पाठिंबा का दिला हे ते वस्तुनिष्ठपणे सांगत नाहीत. त्यांची ही भूमिका त्यांच्या त्याच वर्षी प्रसिद्ध झालेल्या ‘पाकिस्तान’ या ग्रंथात आलेली आहे. मुसलमान हे स्वतःला वेगळे राष्ट्र मानतात; ते या देशावर निष्ठा ठेवू शकत नाहीत अशा स्वरूपाच्या एकूण भारताच्या कल्याणाच्या दृष्टीतून त्यांनी ‘पाकिस्तान’ मागणीला पाठिंबा दिला. शेवटी, ७ वर्षांनंतर म. गांधींनी हाच निर्णय मानला. शौरी मात्र आंबेडकरांची ही खरी भूमिका लपवून ठेवतात व ब्रिटिशांनी येथे राहावे हा पाकिस्तानचा हेतू असल्याचे त्या पत्रांधारे सांगतात.

मुस्लिम लीग व आंबेडकर यांचा अलगतावादाचा सिद्धांत सारखाच आहे असे शौरी सांगतात. लीगच्या सिद्धांतातील ‘मुस्लिम’ शब्द काढून त्या जागी ‘शेड्यूल्ड कास्ट’ हा शब्द घातला की, आंबेडकरांचा असा सिद्धांत तयार होतो, असे ते सांगतात. (पृ.४३) ते म्हणतात : ‘(पाकिस्तानसंबंधात) आंबेडकरांचा युक्तिवाद असा होता की, मुस्लिम हे बहुधर्मीय समाजात एकत्र राहू शकत नाहीत. या युक्तिवादाची दुसरी बाजू ही होती की, हिंदूंबरोबर एकत्र कोणीही राहू शकत नाही. हिंदू म्हणजे त्यांना ‘शोषक उच्चवर्णीय’ वाटत होते. हा त्यांच्या ‘पाकिस्तान’ ग्रंथाचा थोडक्यात सिद्धांत आहे.’ (५९) शौरी, ही दिशाभूल कशासाठी? ‘मुसलमान स्वतःला राष्ट्र मानतात’ हा ‘पाकिस्तान’ ग्रंथाचा मुख्य सिद्धांत आहे, ही गोष्ट शौरीजी तुम्हाला माहीत नाही काय? मार्च १९४२ मध्ये क्रिप्स मिशनसमोर आंबेडकरांनी अनुसूचित जातींना ‘वांशिक व धार्मिक अल्पसंख्याक’ म्हणून मान्यता देण्याची मागणी केल्याचे एक आक्षेपाचा मुद्दा म्हणून शौरी दुसऱ्या एका ठिकाणी सांगतात. (४५) दलित हे स्वतंत्र राष्ट्र आहेत, असे आंबेडकर मानीत होते, असे दाखवून देण्याचा हा प्रयत्न आहे. हा सारा शौरीकृत विपर्यास आहे. थोडक्यात, ज्यांना ‘पाकिस्तान’ ग्रंथातील खरी भूमिका माहीत नाही, त्यांची दिशाभूल करण्याचा शौरींचा हेतू आहे. आंबेडकरांचा ‘पाकिस्तान’ ग्रंथ लिहिण्याचा हेतू हा होता की, पाकिस्तान देऊन टाका, दोन राष्ट्र करा व दोघेही स्वतंत्र व्हा. ब्रिटिशांचे सत्तांतर गृहीत धरूनच ‘पाकिस्तान’ ची प्रशस्ती त्यांनी केलेली आहे. ४८० पृष्ठांच्या ‘पाकिस्तान’ ग्रंथातील सर्व जगासमोर असलेले तर्कशुद्ध विवेचन बाद करून शौरी त्या पत्रातील एका ओळीच्या उल्लेखाला प्रमाण व सत्य मानून आंबेडकरांची बदनामी करीत आहेत, हे उघड आहे.

### शिस्तहीन लेखन

शौरींच्या लेखनाचा एक नमुना म्हणून वरील उदाहरण आम्ही दिलेले आहे. अशाच स्वरूपाच्या पुराव्यांनी हा ग्रंथ खचाखच भरलेला आहे. सर्वांसमोर असलेले स्पष्ट, सुसंगत व धडधडीत पुरावे रद्दबातल ठरवून शौरी स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश पत्रव्यवहाराचा व वृत्तपत्रीय बातम्यांचा उकिरडा उकरून आंबेडकरांना देशद्रोही ठरवू पाहत आहेत. त्यांच्या लेखनशैलीचे आणखी एक वैशिष्ट्ये येथे नोंदविले पाहिजे. ते असे की, शौरी आंबेडकरांचे एखादे आक्षेपार्ह मत आधी मांडून आंबेडकरांच्या भूमिकेतून व मग आपल्या भूमिकेतून त्या मताचे मंडन व खंडन ही टीकालेखनाची सामान्य शिस्त व पद्धत पाळीत नाहीत. आंबेडकरांची भूमिका ते नीटपणे समोर येऊच देत नाहीत. ते अगोदर एखाद्या प्रश्नासंबंधी त्या काळातील इतर काँग्रेसादी राष्ट्रवादी पक्ष, नेते, वृत्तपत्रे, ब्रिटिश अधिकारी अशांची अनुकूल अशी मते धडाधड उद्धृत करतात. हे सारे कशासाठी सांगितले जात आहे, याचा आंबेडकरांशी कोठे संबंध येतो, असे वाचताना वाटत राहते. परंतु त्यांच्या ओघवत्या व चटकदार भाषाशैलीमुळे व विषयाच्या आकर्षणामुळे वाचक ते सारे वाचत जातो. ते सारे वाचून त्या प्रश्नाविषयी वाचक एका विशिष्ट मनोभूमिकेपर्यंत पोचला की, मग शौरी त्या प्रश्नाविषयीची आंबेडकरांची प्रतिकूल भूमिका अशा प्रकारे मांडतात, की ते वाचताच आंबेडकर हे ब्रिटिशधार्जिणे, राष्ट्रद्रोही आहेत असे वाचकांचे मत बनावे. पुढील एक-दोन उदाहरणांनी ही पद्धत चांगली समजेल.

### भावनेला साद

१९३९ मध्ये ब्रिटिश प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळांनी ब्रिटिश सरकारच्या धोरणाच्या निषेधार्थ राजीनामे दिले. मुस्लिम लीगने त्यानंतर २२ डिसेंबरला काँग्रेस सरकारे गेल्याबद्दल ‘मुक्तिदिन’ साजरा करण्याचे ठरविले. या ‘मुक्तिदिन’ निर्णयाचा निषेध अनेकांनी केला. त्या निषेध-प्रतिक्रिया नोंदविण्यासाठी शौरींनी ग्रंथाची १० पृष्ठे (३३ ते ४२) खर्च केली आहेत. या पृष्ठांत आंबेडकरांचा उल्लेख येतच नाही. त्यात त्या दिवशीच्या शुक्रवारी मशिदीत मुसलमानांनी अल्लाच्या नावाने मुक्तिदिनाची म्हटलेली १३ ओळींची प्रार्थनाही आहे. या सर्व प्रतिक्रिया वाचल्या की, ‘मुक्तिदिना’ बद्दल वाचकांचा संताप पराकोटीला जातो. वाचकांना भावनेच्या उच्चांकाला नेऊन ठेवल्यानंतर मग शौरी सांगतात की, जिनांच्या उपस्थितीत एका सभेत आंबेडकरांनी मुक्तिदिनाच्या ठरावाला जोरदार पाठिंबा दिला होता !

आणखी एक उदाहरण. १९४३ मध्ये गांधीजींनी कारागृहात २१ दिवसांचा उपवास केला. वरील उदाहरण संतापजनक तर हे करूणाजनक. एकदा अशी पाळी आली की, गांधीजी जिवंत राहतात की नाही म्हणून सर्वजण बेचैन झाले. गांधीजींना सहानभूती दाखविणाऱ्या राष्ट्रवाद्यांच्या अनुकूल प्रतिक्रिया व ब्रिटिशांच्या प्रतिकूल प्रतिक्रिया मांडण्यासाठी शौरींनी ग्रंथाची चार पृष्ठे खर्च केली आहेत. त्यात आंबेडकरांचा कुठेही संबंध वा उल्लेख येत नाही. वाचक भावनेच्या एका विशिष्ट उंचीपर्यंत गेला की मग व्हाइसरॉयप्रमाणेच आंबेडकरांनीही ‘म्हातारा मरणार आहे तर मरू दे,’ अशी प्रतिक्रिया व्यक्त केल्याचे सांगतात. (पृ.९८) ही सत्यशोधनाची वा संशोधनाची पद्धत नव्हे, वातावरणनिर्मिती करून वाचकांच्या भावनेला हात घालणे होय ! अशा प्रकारचा दिशाभूल करणारा, गैरलागू असणारा व भावनेला साद घालणारा उपद्रवी फाफटपसाराच जास्त असल्यामुळे ग्रंथ ६८० पृष्ठांचा झालेला आहे. त्यातील एक-एक मुद्दा व त्यासाठी दिलेल्या पुराव्यांची संदर्भहीनता व दिशाभूलपणा उघडकीस आणणे कठीण नाही. आंबेडकर ब्रिटिशधार्जिणे किंवा देशद्रोही असतील तर शौरींच्या अगोदर सावरकर, नेहरू, राजेंद्रप्रसाद एवढेच नाही तर शौरी ज्यांना मानतात ते गांधीजी या सर्व समकालीनांनी तसे समजले असते. मग या ‘देशद्रोही’ माणसाला घटनेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी नेमणारे तसेच स्वतंत्र भारतात कायदामंत्री करणारे गांधी-नेहरू हेही तसेच मानावेत की काय?

या ग्रंथाचा एक अतिशय वाईट परिणाम येथे नमूद करतो. या ग्रंथातील निष्कर्षासंबंधी विविध थरांतील सवर्णांशी आम्ही महिन्यापासून अनौपचारिक चर्चा करीत आहोत. त्यांची प्रतिक्रिया अशी की, ‘शौरींचे म्हणणे बरोबर आहे. हे कुणीतरी लिहायला पाहिजे होते. ते धाडस शौरींनी केले.’ त्यांनी शौरींचाही ग्रंथ वाचलेला नाही किंवा आंबेडकरांचेही वाङ्मय वाचलेले नाही. तरीही ते अशी प्रतिक्रिया करू लागले आहेत. हे फार वाईट आहे. दलितांच्या भावनेला डिवचण्यासाठी या ग्रंथाचा तर उपयोग होणार नाही ना, अशी भीती वाटते. सामाजिकदृष्ट्या हा ग्रंथ हानिकारक होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तेव्हा, शौरी यांच्या हा ग्रंथ केवळ विपर्यस्तच नव्हे घातकही आहे!

**- प्रा. शेषराव मोरे**

# चॅनेलचा खेळ संपला आहे! परवाना परत करण्याचा काळ सुरू झाला आहे...

**भा**रतीय वृत्तवाहिन्यांचे भविष्य केवळ संकटात नाही तर या वाहिन्या अधोगतीला लागल्या आहेत. ज्या माध्यमाने एकेकाळी जनमत घडवले, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारले आणि लाखो प्रेक्षकांना गुंतवून ठेवले तेच माध्यम आता रिकामे स्टुडिओ आणि परवाने परत करत आहे.गेल्या काही वर्षांत, मोठ्या संख्येने प्रेक्षकांनी वृत्तवाहिन्या पाहणे बंद केले आहे.हे केवळ टीआरपीमध्ये घट नाही. तर विश्वासार्हता पूर्णपणे कोसळण्याची कहाणी आहे. असे होण्याची मुख्य कारणे स्पष्ट आहेत: जनहिताच्या बातम्यांपासून दूर,रात्रंदिवस जातीय, धार्मिक प्रायोजित आणि एकतर्फी वादविवाद सत्तेला शरण जाणे,एकदा एखाद्या माध्यमाची चूक वा लबाडी उघडकीस आली की, निसर्गनियमानुसार ते दुर्लक्षित होत जाते.

### परिणाम

जवळजवळ ५० टीव्ही वाहिन्यांनी त्यांचे प्रसारण परवाने परत केले आहेत. जाहिरातींच्या महसुलात लक्षणीय घट. ऑपरेशनल खर्च वाढतच आहे. कमी प्रेक्षक कमी जाहिराती चॅनेल बंद.

### अलीकडील उदाहरणे

एबीपी न्यूजची एचडी वाहिनी बंद.

एनडीटीव्ही गुजराती वाहिनीचा परवाना रद्द.

सोनी (कलव्हर मॅक्स) ने २६ डाउनलिंकिंग परवानग्यांवर पाणी सोडले.

झी,जिओस्टार, टीव्ही टुडे, एनडीटीव्ही आणि एबीपी सारख्या प्रमुख नेटवर्क्सनीही त्यांची अनेक चॅनेल्स बंद केली.

प्रादेशिक चॅनेल्स सर्वात आधी बंद होत आहेत. खरे तर हीच चॅनेल्स एकेकाळी ग्राउंड रिपोर्टिंग करत असत.

अनेक राज्यांमधील अद्याप सुरू असलेली चॅनेल्सदेखील माहिती विभाग आणि मंत्रालयांच्या जाहिरातींवर टिकून आहेत.

एका मोठ्या कंपनीचे सीईओ म्हणाले,‘आमचे वार्षिक प्रचार बजेट २० कोटी रुपये होते.कमी होत चाललेली क्रयशक्ती, निर्यात संकट आणि चीनकडून येणाऱ्या आव्हानामुळे हे आता शक्य नाही.’ही फक्त भारताची गोष्ट नाही.अमेरिका आणि युरोपमध्ये केबल न्यूजमध्ये सातत्याने घट होत आहे.तरुण प्रेक्षक टीव्ही सोडून YouTube, पॉडकास्ट आणि डिजिटल न्यूजकडे वळत आहेत. सीएनएन, बीबीसी आणि फॉक्स सारख्या नेटवर्क्सना देखील डिजिटल स्वरूपात कंटेंट देण्यास भाग पाडले जात आहे.




भारतात बदल आणखी जलद होत आहे.ज्येष्ठ पत्रकारांसाठी स्वत:ची YouTube चॅनेल्स सुरू केली आहेत. इथे सेन्सॉरशिपमुक्त आणि संदर्भसंपन्न कंटेंट असतो. मोकळेपणे केलेली टीका असते. ही युट्युब चॅनल्स घडामोडींबाबत त्वरित प्रतिक्रिया देतात. असहमती व्यक्त करतात.सायंकाळी ६ ते ८ काळातल्या चर्चेच्या नावाखाली लावल्या जणाऱ्या सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातल्या झुंजीपासून या पत्रकारांची सुटका झाली आहे.

### नवीन प्रयोग

लहान राज्यांमध्ये GPS-ट्रॅक केलेल्या LED व्हॅनमुळे कमी खर्चात थेट सार्वजनिक संवाद करता येतो. स्टुडिओतले नाटक बंद झाले आहे.

वृत्तवाहिन्यांच्या इतिहासातले टप्पे लक्षात ठेवा

१९६५: दूरदर्शनचे पहिले ५ मिनिटांचे बुलेटिन

१९९१: CNN आणि आखाती युद्ध

१९९२: झी न्यूज

२०००-२०२०: चॅनेल्सचा स्फोट

२०२५ नंतर: शरणागतीचा काळ

सत्य कटू आहे. तुम्ही चॅनेल उघडू शकता. मात्र तुम्ही प्रेक्षक खरेदी करू शकत नाही. आता या वृत्तवाहिन्या जनतेपासून तुटल्या आहेत. का? तंत्रज्ञानामुळे नाही तर अविश्वसनीयतेमुळे. हे वृत्तवाहिन्यांवर आलेले संकट म्हणजे प्रत्यक्षात पत्रकारितेचा आरसा आहे.

**- पवन सिंह**

# डॉ. जॉन गॉटमन यांचे ‘रिलेशनशिप सायन्स’

**अ**वघ्या १५ मिनिटांच्या निरिक्षणावरून एखादे जोडपे पुढील ७ ते ९ वर्षांत घटस्फोट घेणार की एकत्र राहणार, याची ९०% पेक्षा जास्त अचूक भविष्यवाणी करणारा अवलिया म्हणजे डॉ. जॉन गॉटमन होय. विज्ञानाच्या क्षेत्रात मानवी वर्तणुकीबद्दल इतकी अचूक भविष्यवाणी करणे ही अत्यंत दुर्मिळ गोष्ट आहे.

यामुळे आज जगभरात जिथे कुठे वैज्ञानिक पद्धतीने नात्यांवर संशोधन होते, तिथे गॉटमन यांच्या 'SPAFF' (Specific Affect Coding System) चा वापर केला जातो. त्यांच्या ४० वर्षांच्या दीर्घ संशोधन कार्यामुळे त्यांना जागतिक मानसशास्त्राच्या इतिहासात ‘रिलेशनशिप सायन्स’चे जनक म्हटले जाते. २००७ मध्ये ‘सायकोथेरपी नेटवर्कर’ ने गेल्या २५ वर्षांतील जगातील १० सर्वात प्रभावशाली थेरपिस्ट यादीत त्यांना स्थान दिले होते. पण ते केवळ थेरपिस्ट नसून ‘इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिकल सायकॉलॉजी’चे फेलो देखील राहिले आहेत. तसेच त्यांनी वॉशिंग्टन विद्यापीठात जगातील पहिली ‘लव्ह लॅब’ स्थापन केली. ही केवळ गप्पा मारण्याची जागा नव्हती, तर ती एक प्रकारे ‘फिजियोलॉजिकल प्रयोगशाळा’ होती. तिथे ईसीजी, रक्ताचे नमुने आणि व्हिडिओ कोडिंगचा वापर करून प्रेमाचे गणित मांडले गेले. याशिवाय डॉ. जॉन गॉटमन यांनी सर्वाधिक खपाची ४० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत आणि १९० हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांचे 'The Seven Principles for Making Marriage Work' हे पुस्तक जगभरातील अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले असून त्याच्या लाखो प्रती विकल्या गेल्या आहेत. यामुळे जगभरातील ‘मॅरेज कौन्सिलर्स’ गॉटमन मेथड चा वापर करूनच उपचार करतात.

डॉ. गॉटमन वॉशिंग्टन विद्यापीठातील प्रयोगशाळेत जोडप्यांना बोलावून त्यांना एखाद्या जुन्या वादाच्या विषयावर सलग १५ मिनिटे चर्चा करायला सांगत असे.(वादाची पहिली ३ मिनिटे ठरवतात की संवाद सुसंवाद होणार की विसंवाद. यशस्वी जोडपी ही पहिली ३ मिनिटे अत्यंत संयमाने हाताळतात.) चर्चा सुरू असताना जोडप्याच्या शरीराला सेन्सर्स लावले जात. त्याद्वारे त्यांचे हृदयाचे ठोके, घामाचे प्रमाण आणि रक्तातील हालचाल मोजली जाई. यातून त्यांनी ‘Specific Affect Coding System’ विकसित केली होती. त्यांच्या मते, घटस्फोटाकडे नेणाऱ्या संवाद पद्धतीमध्ये चार मुख्य नकारात्मक घटक असतात, ज्यांना त्यांनी बायबलमधील संकटांच्या संदर्भाने ‘फोर हॉर्समेन’ असे नाव दिले आहे -

१) टीका : जोडीदाराच्या एखाद्या विशिष्ट कृतीवर भाष्य करण्याऐवजी त्याच्या चारित्र्यावर किंवा व्यक्तिमत्वावर हल्ला करणे. (उदा. ‘तू नेहमीच बेजबाबदार असतोस’ असे म्हणणे).

२) तुच्छता/तिरस्कार : हा घटस्फोटाचा सर्वात मोठा संकेतक आहे. यात जोडीदाराला स्वतःपेक्षा कमी लेखणे, टोमणे मारणे, डोळे फिरवणे किंवा उपहास करणे यांचा समावेश होतो.

३) बचावात्मक पवित्रा : स्वतःची चूक मान्य न करता उलट जोडीदारावरच आरोप करणे किंवा पीडित असल्याचे नाटक करणे.

४) दगड होणे : वाद सुरू असताना संवादातून पूर्णपणे बाहेर पडणे, प्रतिसाद न देणे किंवा दुर्लक्ष करणे. हे सहसा पुरुष जास्त करतात.



डॉ. जॉन गॉटमन यांनी त्यांच्या संशोधनात ‘मास्टर्स ऑफ रिलेशन्स’ (यशस्वी जोडपी) आणि ‘डिझास्टर्स ऑफ रिलेशन्स’ (अपयशी जोडपी) असे दोन गट केले होते. यशस्वी वैवाहिक जीवन जगणाऱ्या जोडप्यांच्या संवादाची काही विशिष्ट वैशिष्ट्ये त्यांना आढळली, जी विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध झाली आहेत.

१. यशस्वी जोडपी वादाचा विषय काढताना कधीही जोडीदारावर तुटून पडत नाहीत. त्यांच्या संवादाची सुरुवात ‘तू’ ऐवजी ‘मी’ ने होते. उदा. ‘तू नेहमी उशिरा येतोस’ असे म्हणण्याऐवजी ते म्हणतात, ‘जेव्हा तू उशिरा येतोस, तेव्हा मला एकटे वाटते आणि काळजी वाटते. आपण यावर काही करू शकतो का?’

२. यशस्वी जोडपी आपली नाराजी व्यक्त करतात, पण ती व्यक्तीवर नसून परिस्थितीवर असते. ते जोडीदाराच्या चारित्र्यावर हल्ला करत नाहीत.त्यांच्या संवादात विशिष्ट तक्रार असते. ‘तू घर अस्वच्छ ठेवतोस’ या व्यापक टीकेपेक्षा ‘आज बेसिनमध्ये भांडी तशीच राहिली आहेत, ती घासली असतीस तर बरे झाले असते’ असा स्पष्ट संवाद असतो.

३. भांडण सुरू असतानाही यशस्वी जोडपी नकळतपणे परिस्थिती सावरण्याचे प्रयत्न करतात. म्हणजेच वादाच्या ओघात एखादा छोटा जोक करणे, जीभ बाहेर काढून गमतीशीर चेहरा करणे किंवा जोडीदाराचा हात हातात घेणे, हे संवाद सुस्थितीत आणण्याचे मार्ग आहेत. महत्त्वाचे म्हणजे, जोडीदाराने केलेला असा ‘रिपेअर अटेम्प्ट’ दुसरा जोडीदार ओळखून त्याला प्रतिसाद देतो. यामुळे वादाची तीव्रता शारीरिक पातळीवर (हृदयाचे ठोके वाढणे इ.) वाढत नाही.

४.यशस्वी जोडप्यांच्या संवादात प्रत्येक १ नकारात्मक संवादाच्या (उदा. राग, नाराजी) मागे किमान ५ सकारात्मक संवाद (उदा. कौतुक, प्रेम, हसणे, सहमती दर्शवणे) असतात. यामुळे जरी त्यांचे भांडण झाले, तरी त्यांच्याकडे प्रेमाची इतकी मोठी पुंजी साठलेली असते की, भांडणामुळे नात्याचा पाया हलत नाही.

५. यशस्वी पुरुष आपल्या पत्नीच्या मताचा आणि निर्णयाचा आदर करतात. जेव्हा पत्नी एखादी सूचना देते, तेव्हा ‘तू सांगणार का मला काय करायचे ते’ अशी प्रतिक्रिया न देता, ते ‘तुझा मुद्दा रास्त आहे, आपण विचार करूया’ असा संवाद साधतात. याला गॉटमन 'Accepting Influence' म्हणतात.

६. दिवसभरात जोडीदार अनेकदा संवादाचे छोटे प्रयत्न करत असतो. यशस्वी जोडपी ८६% वेळा या प्रयत्नांकडे सकारात्मक प्रतिसाद देतात. उदा. पत्नी म्हणाली, ‘बघ, किती छान पाऊस पडतोय.’ यावर यशस्वी पतीचा प्रतिसाद: ‘हो ना, खरंच खूप सुंदर वातावरण झालंय.’ असा असतो. अन् अपयशी पतीचा प्रतिसाद: (टीव्ही बघतच) ‘मगाशीच पाहिला मी, आता काम करू दे.’

७. जेव्हा वाद विकोपाला जातो, तेव्हा यशस्वी जोडप्यांना हे समजते की आता आपली तर्कशक्ती संपली आहे. अशा वेळी ते संवाद थांबवून स्वतःला शांत करतात. ते एकमेकांना सांगतात, ‘आता मी खूप चिडलोय, आपण २० मिनिटांनी यावर बोलूया का?’.. २० मिनिटांच्या या विश्रांतीमुळे शरीरातील ‘कोर्टिसोल’ची पातळी कमी होते आणि ते पुन्हा डोळसपणे संवाद साधू शकतात.

गॉटमन यांनी यशस्वी नात्यासाठी एक मॉडेल दिले आहे, ज्याला ते ‘The Sound Relationship House’ म्हणतात. याचे ७ मुख्य स्तर आहेत - **१. लव्ह मॅप्स तयार करणे:** जोडीदाराचे जग, त्याच्या आवडी- निवडी आणि स्वप्ने जाणून घेणे. **२. कौतुक आणि आदर जोपासणे:** जोडीदाराच्या चांगल्या गुणांकडे लक्ष देणे. **३. एकमेकांकडे वळणे :** संवादाच्या छोट्या प्रयत्नांना प्रतिसाद देणे.**४. सकारात्मक दृष्टीकोन:** जोडीदाराच्या चुकांकडे दुर्लक्ष करून सकारात्मकतेवर भर देणे. **५. संघर्ष व्यवस्थापित करणे:** वाद पूर्णपणे थांबवणे शक्य नाही, पण ते योग्य प्रकारे हाताळणे. **६. जीवन स्वप्ने साकार करणे:** एकमेकांच्या ध्येयांना पाठिंबा देणे. **७. सामायिक अर्थ निर्माण करणे:** कुटुंबाची स्वतःची अशी संस्कृती आणि मूल्ये तयार करणे.

**-रुपाली गिरमे**

# दीड वर्षांपासून वर्गखोलीचे बांधकाम रखडले

**● खेट्रीतील उर्दू शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी खेळ**
**● प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर पालकांचा संताप**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या नव्या वर्गखोलीचे बांधकाम गेल्या दीड वर्षांपासून रखडल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अपूर्ण अवस्थेतील बांधकामामुळे विद्यार्थ्यांना आजही जुन्या, जीर्ण व धोकादायक खोल्यांमध्ये शिक्षण घ्यावे लागत आहे.

दीड वर्षांपूर्वी वर्गखोलीचे काम सुरू झाल्याने विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा मिळाला होता. मात्र, त्यानंतर अचानक काम थांबल्याने विद्यार्थ्यांना मानसिक त्रासासह विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत पालकांनी संबंधित विभागाकडे वारंवार तोंडी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. शाळेतील अर्धवट



बांधकाम, पडझड होण्याच्या स्थितीतील खोल्या आणि परिसरात अस्ताव्यस्त पडलेले साहित्य यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत असून, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून बांधकाम पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

**बांधकाम साहित्य ठरत आहे डोकेदुखी**

वर्गखोलीचे बांधकाम रखडल्याने लोहा, गिट्टी, रेती आदी साहित्य शाळेच्या आवारातच पडून आहे. हे साहित्य विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत असून, कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**अभियंता फिरकला नाही; निकृष्ट कामाचा आरोप**

बांधकामाच्या दर्जावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेले अभियंते प्रत्यक्ष पाहणीस फिरकत नसल्याने निकृष्ट दर्जाचे काम करून ते अर्धवट अवस्थेत ठेवण्यात आल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

### बीजीई सोसायटी निवडणूक निकाल जाहीर

# ॲड. मोतीसिंग मोहता अध्यक्षपदी विजयी

**३१९ पैकी २६१ सभासदांनी बजावला मतदानाचा हक्क; अकोला व कारंजा येथील दोन केंद्रांवर मतदान**

■ प्रतिनिधी | अकोला ■

बीजीई सोसायटी संचालित अकोला येथील आर.एल.टी. सायन्स कॉलेज व कारंजा येथील किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय या दोन मतदान केंद्रांवर आज रविवार, ८ फेब्रुवारी रोजी सकाळी मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या मतदान प्रक्रियेत एकूण ३१९ पैकी २६१ मतदार सभासदांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये कारंजा येथील केंद्रावर २८, तर अकोला येथील केंद्रावर २३३ मतदारांनी मतदान केले.

मतदानानंतर अकोला येथील आर.एल.टी. सायन्स कॉलेजच्या सभागृहात सायंकाळी मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. अध्यक्ष पदासाठी मावळते अध्यक्ष ॲड. मोतीसिंग घनश्यामदाजी मोहता आणि माजी अध्यक्ष डॉ. राजकुमार बालाबकसजी हेडा यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. अखेर झालेल्या मतमोजणीत ॲड. मोतीसिंग मोहता यांनी १४१ मते मिळवत विजय मिळवला, तर डॉ. आर.बी. हेडा यांना ११८ मते प्राप्त झाली. यासह ॲड. मोतीसिंग मोहता यांची बेरार



जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला यांच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.

दरम्यान, कनिष्ठ उपाध्यक्ष पदासाठी इंजि. अभिजीत गोविंद परांजपे यांनी १४० मते मिळवत विजय मिळवला, तर शरद अभयकुमारजी चवरे यांना ११८ मते मिळाली. सहसचिव पदासाठी अमित अविनाशजी सुरेका यांनी १६३ मते मिळवत विजय संपादन केला, तर डॉ. रविंद्र चंपालालजी जैन यांना ९७ मते प्राप्त झाली. ज्येष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल आणि सचिव पवन माहेश्वरी हे दोघेही बिनविरोध निवडून आले.

कार्यकारी समिती सदस्यांच्या निवडणुकीत ॲड. संजय अटल यांनी १८९ मते मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.

त्यांच्यानंतर डॉ. अजय कामत (१७९), करण चीमा (१७८), मनोजसिंह बिसेन (१७१), श्रीकृष्ण अमरावतीकर (१६०), राहुल महाजन (१५८), अभय बिजवे (१५३), ललित अग्रवाल (१४५), गोविंद कायडीवाल (१४५), ॲड. सुशील शर्मा (१४४), आनंद चांदक (१४३) व नरेंद्र बाहेती (१४२) यांनी विजय मिळवला.

निकालानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. मोतीसिंग मोहता यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'सभासदांनी दाखवलेल्या विश्वासाला पात्र ठरण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल. गुणवत्तापूर्ण शिक्षण, पारदर्शक प्रशासन आणि सर्व घटकांना सोबत घेऊन संस्थेचा शैक्षणिक विकास साधणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट राहील.' निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शक पद्धतीने पार पडली असून निकाल जाहीर होताच सभासदांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# राष्ट्रवादी काँग्रेसची नवी महानगर कार्यकारिणी लवकरच

**प्रत्येक प्रभागात प्रभागप्रमुख, चार वॉर्डप्रमुखांची नियुक्ती होणार**

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)ची अकोला महानगर संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने लवकरच महत्त्वाचा निर्णय घेतला जाणार आहे. महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन महानगर कार्यकारिणीची घोषणा करण्यात येणार असून, यासाठी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांची मान्यता घेण्यात येत आहे.

या नव्या संघटनात्मक रचनेअंतर्गत अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व प्रभागांमध्ये प्रभागप्रमुखांची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागात एक प्रभागप्रमुख असून, त्यांच्या अंतर्गत चार वॉर्डप्रमुख कार्यरत राहणार आहेत. यामुळे पक्षाची



संघटनात्मक पकड प्रभाग व वॉर्ड पातळीवर अधिक मजबूत होणार आहे.

नियुक्त होणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर त्यांच्या परिसरातील विकासकामांना गती देणे, नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे व त्या तातडीने सोडवण्यासाठी पाठपुरावा करण्याची जबाबदारी असणार आहे. जनतेशी थेट संपर्क वाढवणे आणि पक्षाचा प्रभाव तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे पक्ष नेतृत्वाकडून सांगण्यात आले.

शहरात मजबूत संघटना उभारूनच प्रभावी जनसंपर्क साधता येतो, या भूमिकेतून हा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. या नव्या व्यवस्थेमुळे प्रभाग व वॉर्ड पातळीवर सक्रिय नेतृत्व निर्माण होऊन शहरवासीयांच्या मूलभूत प्रश्नांचे निराकरण जलदगतीने होईल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, सध्या अकोला महानगरपालिकेच्या शहर सुधार समितीत सत्तास्थानी असलेल्या आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) सहभागी आहे. ही माहिती पक्षाचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया यांनी दिली.

# धनादेश अनादर प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

■ प्रतिनिधी | अकोला ■

धनादेश अनादर प्रकरणात तक्रारदाराकडून कायदेशीर देयता सिद्ध न झाल्याने न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी (क्रमांक ३) यांनी हा निकाल दिला.

जुने शहर परिसरातील तुषार अरुण धारस्कर यांनी आपल्या वकिलामार्फत डाबकी रोड येथील सागर अरविंद भिरड यांच्याविरुद्ध परक्राम्य लिखत अधिनियम (एन.आय. ॲक्ट) कलम १३८ अंतर्गत तक्रार दाखल केली होती. आरोपी 'श्री संतकृपा सराफ' या नावाने व्यवसाय करीत असून, व्यवसाय विस्तारासाठी त्याने तक्रारदाराकडून ७ लाख रुपये घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

परिचयामुळे तक्रारदाराने वेळोवेळी रक्कम दिली असून, त्याबाबत जमा पावत्या घेतल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले होते. उर्वरित रक्कम परत मागितल्यानंतर आरोपीने ५ लाख रुपयांचा धनादेश दिला. मात्र, सदर धनादेश बँकेत सादर केल्यानंतर तो अनादरित झाला.

**अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयाचा निकाल**

त्यानंतर कायदेशीर नोटीस देऊनही रक्कम न भरल्याने तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणात आरोपीकडून ॲड. रितेश अग्रवाल यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. बचाव पक्षाने असा युक्तिवाद केला की, जमा पावत्या तयार होण्यापूर्वीच तक्रारदाराने 'सुरक्षेसाठी' आरोपीकडून दोन कोरे स्वाक्षरीत धनादेश घेतले होते. त्यापैकी एका धनादेशाचा गैरवापर करून त्यावर जादा रक्कम भरून तो सादर करण्यात आला.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद व सादर पुरावे तपासून पाहता, तक्रारदाराकडून धनादेशाचा संभाव्य गैरवापर झाल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे निरीक्षण नोंदविले. परिणामी, ५ लाख रुपयांची कायदेशीर देयता सिद्ध न झाल्याने आरोपीस एन.आय. ॲक्ट कलम १३८ अंतर्गत दोषी ठरविता येत नाही, असे नमूद करत न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

# पाण्यासाठी लढणा–यांवर गुन्हे; अखेर शिवसेनेचा न्यायालयात विजय

**मजीप्रा कार्यालय तोडफोड प्रकरणी जिल्हाप्रमुख गोपाल दातकरांसह ११ शिवसैनिक निर्दोष**

■ प्रतिनिधी | अकोला ■

दहिहांडा व परिसरातील भीषण पाणीटंचाईकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाविरोधात आवाज उठवणाऱ्या शिवसैनिकांवर दाखल करण्यात आलेल्या खोट्या गुन्ह्यांचा अखेर पराभव झाला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय तोडफोड प्रकरणात शिवसेना जिल्हाप्रमुख तथा जिल्हा परिषद सदस्य गोपालभाऊ दातकर यांच्यासह ११ शिवसैनिकांची अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाच्या या निकालाने जनतेसाठी लढणाऱ्या शिवसेनेच्या भूमिकेला दुजोरा मिळाला आहे. दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी दहिहांडा व परिसरातील नागरिक पाण्यासाठी व्याकूळ होऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अकोला कार्यालयात धडकले होते. मात्र, अधिकाऱ्यांनी समस्येचे गांभीर्य ओळखण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे दिली. प्रशासनाच्या बेपर्वाईविरोधात संतप्त झालेल्या नागरिकांसह शिवसैनिकांनी आक्रमक आंदोलन छेडले. मात्र, पाणी प्रश्नाला जबाबदार असलेल्यांवर कारवाई



करण्याऐवजी आंदोलनकर्त्यांवरच गुन्हे दाखल करण्यात आले.

या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे, सर्कलप्रमुख अविनाश राऊत, अकोला तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक गजानन चराटे यांच्यासह अनिल मोहरकार, गोकुळ कंडाळे, सुधाकर शिरसाट, निलेश डहाके, गुलाबराव शिरसाट, पांडुरंग पाटकर व सैयद शारीक यांना अटक करण्यात आली होती.

शिवसैनिकांच्या अटकेनंतर दुसऱ्याच दिवशी दहिहांडा परिसरातील हजारो ग्रामस्थ रस्त्यावर उतरले. सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनसमोर प्रचंड आंदोलन करण्यात आले. लोकआक्रोशामुळे आरोपींना न्यायालयात हजर करून जामिनावर मुक्त करावे लागले होते. या प्रकरणाची सखोल सुनावणी अकोला जिल्हा व सत्र न्यायालयात झाली. सरकार पक्षाने ११ साक्षीदार तपासले. मात्र, उलट तपासणीत आरोपींनी तोडफोड, शिवीगाळ किंवा शासकीय कामात अडथळा आणल्याचे कोणतेही ठोस पुरावे सादर करता आले नाहीत. परिणामी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्रमांक ३) श्री. तेजवंदरसिंग संधु यांनी सबळ पुराव्याअभावी सर्व शिवसैनिकांची निर्दोष मुक्तता केली. न्यायालयात शिवसैनिकांची बाजू ॲड. गणेश परियाल यांनी प्रभावीपणे मांडली. हा निकाल म्हणजे जनतेच्या मूलभूत हक्कांसाठी रस्त्यावर उतरलेल्या शिवसेनेच्या संघर्षाचा आणि अन्यायाविरोधातील लढ्याचा विजय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

# थकित मालमत्ता करापोटी १२ मालमत्तांवर सील



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील थकित मालमत्ता कर वसुलीसाठी अकोला महानगरपालिकेने धडक कारवाई सुरू केली असून, उत्तर व दक्षिण झोनमधील एकूण १२ मालमत्तांवर सीलची कारवाई करण्यात आली. ही कारवाई मंगळवारी (दि. ९) मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार पार पडली.

दक्षिण झोनअंतर्गत मंगरूळपीर रोड येथील वार्ड डी-८ मधील मालमत्ता क्रमांक २०२५/१ वर भोगवटादार अमित अग्रवाल यांच्याकडे २०२२-२३ पासून १ लाख १९ हजार ५६४ रुपये मालमत्ता कर थकित असल्याने संबंधित मालमत्तेला सील लावण्यात आले. तसेच गुरूकुल नगरी, मलकापूर येथील वार्ड डी-९ मधील मालमत्ता क्रमांक १०५९ वर भोगवटादार हरिश्चंद्र महाशब्दे यांच्याकडे २०१८-१९ पासून १ लाख ७१ हजार ६३६ रुपये कर थकीत असून, त्यांच्या ९ दुकानांवर सीलची कारवाई करण्यात आली.

उत्तर झोनअंतर्गत अलंकार मार्केट येथील वार्ड सी-३ मधील मालमत्ता क्रमांक ९३१ वर कृषधन सीड्स कंपनी लि. यांच्या विभागीय कार्यालयाकडे २०१७-१८ पासून तब्बल ९ लाख २८ हजार ६६६ रुपये मालमत्ता कर थकित असल्याने सील लावण्यात आले. याच वार्डातील मालमत्ता क्रमांक ३०२ वर रामस्वरूप सारडा यांच्याकडे १ लाख ३४ हजार ४९३ रुपये कर थकीत असल्याने संबंधित मालमत्ताही सील करण्यात आली.

या कारवाईत अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनाखाली कर विभागाच्या पथकाने सहभाग घेतला. दोन्ही झोनमधील कर अधिकारी, लिपिक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.


**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३/२०२६ — प्रोसेस नं.१६०२/२०२६
चौ.ता. २७/०३/२०२६ — दिनांक : ०५/०२/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रिचा जगदीश जांगीड २. सिताराम जगदीश जांगीड ३. बिशांबर जगदीश जांगीड ४. रोतश जगदीश जांगीड सर्व रा. नॅशनल हायवे नं. ६, अहमद कॉलनी च्या समोर, गंगानगर २, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जगदीश सुरजभान जांगीड
**पत्ता :-** रा. नॅशनल हायवे नं. ६, अहमद कॉलनी च्या समोर, गंगानगर २, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगदीश सुरजभान जांगीड यांचे दि. १९/१२/२०२५ रोजी राहते घरी गंगानगर २, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७०/२०२६ — प्रोसेस नं.१५०७/२०२६
चौ.ता. १७/०३/२०२६ — दिनांक : ०३/०२/२०२६

**अर्जदार :** १ श्रीमती मंगला रोहीदास चव्हाण २. राहुल रोहीदास चव्हाण ३ भारती अमित पोल तिघेही रा. राम नगर, शिवणी, ता. जि. अकोला. ४. ज्योती शाम येवले रा. जयस्तंभ चौक, स्टेशन एरिया, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रोहीदास अंबादास चव्हाण
**पत्ता :-** रा. राम नगर, शिवणी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रोहीदास अंबादास चव्हाण यांचे दि. ०९/०६/ २०२५ रोजी राम नगर, शिवणी, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सुचना**

दि. ९.२.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण तायडे यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे धामणगाव बढे, ता मोताळा, जि बुलढाणा येथील गट नं ५९९, ग्रा.पं. मालमत्ता क्र १७१/१४०, लेआऊट प्लॉट नं १, बाबतचे आधीचे खरेदी खत दि.२२.६.१९९८ दस्त क्र. १०६६, हे हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर पो स्टे, येथे रिपोर्ट दीला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर, स्टेशन रोड,
अकोला मो : ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४४/२०२६ — प्रोसेस नं.१२०१/२०२६
चौ.ता. १२/०३/२०२६ — दिनांक : २८/०१/२०२६

**अर्जदार :** १. सुबोध रूपराव ताथोड रा. घर बी - ९, शिवाजी चौक जवळ, सिडको एन–४, सिडको बस्ती, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद. २. वासंती नंदन मोहोड रा. २०३/सी, क्रिडा चौक, महाराजा टॉवर, हनुमान नगर, अयोध्या नगर, नागपुर, महाराष्ट्र ३. उषाताई अविनाश कुलट रा. पो. पुंडा, ता. अकोट, जि. अकोला. ४. अ. नंदा संजय ताथोड ४. ब. रोहीत संजय ताथोड ४क. अपुर्वा संजय ताथोड क. ४अ ते ४क रा. तापडिया पार्क जवळ, घर क. ए-४, मेघ मल्हार, स्पंदन नगर, एन-४, दक्षिण सिडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुधा रूपराव ताथोड २. संजय रूपराव ताथोड
**पत्ता :-** रा. निंभोरा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुधा रूपराव ताथोड यांचे दि. १३/०७/२०१५ रोजी घर / प्लॉट क्र. ९ बी, एन ४, सिडको औरंगाबाद येथे निधन झाले आहे. तसेच मयत संजय रूपराव ताथोड यांचे दि. १५/०१/२०१८ रोजी हेडगेवार हॉस्पीटल, औरंगाबाद येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला**
**ई-निविदा सुचना ३४/ २०२५-२०२६**
**जावक क्रमांक ८७३/ ईनिसु- ३४ निलि / २०२६ / दिनांक ०६.०२.२०२६**

email.akola.ee@mahapwd.gov.in — Phone No 0724-2435195

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र.१ ते ५ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्रं. | कामाचे नांव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील माझोड बाभूळगांव रस्ता कि.मी. ५२/०० ते ६५०० ची सुधारणा करणे | ५५५१०६९४ | पात्र |
| २ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील निंभोरा दोनवाडा एकलारा कपिलेश्वर कौलखेड गोमासे बोरगांव सोनाळा येळवण प्रजिमा-३० कि.मी. ११/०० ते १८/०० ची सुधारणा करणे. | ८०१०५७६८ | पात्र |
| ३ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील डाबकी अमानतपूर ताकोडा खडकी सांवगी मोहाडी भोड रस्ता कि.मी. ०/०० ते १५/५०० ची सुधारणा करणे. | ५५६८९४४२ | पात्र |
| ४ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील मनसगांव निंबा डाबकी रेल्वे गेट ते रा.म. कि.मी. ४२/५०० ते ४४/०० ची सुधारणा करणे. | ४८०५९५६८ | पात्र |
| ५ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील नागद सागद हाता हातरूण आगर उगवा प्रजिमा-९ कि.मी. २५/०० ते ३२/०० ची सुधारणा करणे. | ३९६०९५९९ | पात्र |

**अटी व शर्ती -** १. सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. २. ई-निविदा काम क्र. १ ते ५ कामांची ई-निविदा दिनांक १०.०२.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक १७.०२.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक २०.०२.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे) ३. वरील काम क्र. ०१ ते ५ कामांची ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे उघडण्यात येतील ४. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in ५. ईतर अटी व शर्ती ई- निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
६. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही.
७. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
कार्यकारी अभियंता
सा. बा. विभाग अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### बसस्थानकात चोरट्यांचा धुमाकूळ

**वर्धा**-येथील मध्यवर्ती बसस्थानकात भुरट्या चोरट्यांनी पुन्हा एकदा आपला डाव साधल्याचे समोर आले आहे. नागपूर येथील एका इंजिनिअरचा महागडा मोबाईल गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने चोरून नेला. संबंधित इंजिनिअर शहरातील एका डॉक्टरकडे तांत्रिक काम आटोपून नागपूरकडे जाण्यासाठी बसची प्रतीक्षा करीत होता. बसमध्ये चढताना प्रवाशांची मोठी गर्दी झाली आणि याच गोंधळात मोबाईल गायब झाला. काही क्षणातच चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर उलटून चालक ठार

**वर्धा**-जिल्ह्यातील अवैध काळ्या रेतीच्या व्यवसायाने आणखी एका तरुणाचा बळी घेतला आहे.हिंगणघाट नगाजी पारडी मार्गावर रेतीने भरलेली ट्रॅक्टर-टॉली अचानक उलटली. वाहनाखाली दबून चालकाचा जागीच मृत्यू झाला. मृत चालक रेती वाहतुकीसाठी ट्रॅक्टर चालवत असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. या घटनेने रेती तस्करीमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणी पोलिसांनी मृत चालकावरच गुन्हा दाखल केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. रेती वाहतूक कायदेशीर होती का, परवाना होता का, असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करीत असून प्रशासनाच्या भूमिकेवरही बोट ठेवले जात आहे.



## परोपकारी आचरण हेच सुखी जीवनाची गुरुकिल्ली : मोहनबाबू अग्रवाल

**वर्धा**-क्रोध आणि अहंकार हे माणसाचे खरे शत्रू असून त्यांच्यामुळे विवेक हरवतो. दुसऱ्यांना दुःख किंवा त्रास होईल असे आचरण कधीही खरे सुख देऊ शकत नाही. देवाने दिलेल्या अमूल्य मानवदेहाचा आणि बुद्धीचा सदुपयोग करून परोपकारी जीवन जगण्यातच खरा आनंद आहे. परोपकारी आचरण हेच सुखी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे मार्मिक प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबु अग्रवाल यांनी केले.

मगनवाडी चौक येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात श्रींच्या १४८ व्या प्रगटदिनानिमित्त आयोजित श्रीमद्भागवत कथा सप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी जीवन जगणे ही एक कला असून ती श्रीमद्भागवत कथेतून शिकायला मिळते, असे सांगत सामाजिक सेवा हीच ईश्वरी सेवा असल्याचा संदेश दिला. व्यक्तीचा मोठेपणा धनसंपत्ती किंवा पदावरून नव्हे, तर निगर्वी व अहंकाररहित वागणुकीतून ठरतो, असेही ते म्हणाले.यावेळी ब्रह्मकुमारी वर्धा सेंटरच्या प्रभारी माधुरी दीदी यांनी यशस्वी जीवनासाठी दोषदृष्टी टाळून गुणग्राहकतेची दृष्टी ठेवण्याचे आवाहन केले. दुसऱ्याच्या कार्याची प्रशंसा करणे, सन्मानाने वागवणे आणि आनंद-शांतीसाठी अध्यात्माचा मार्ग स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.मंचावर झांसी महामंडलेश्वर मंजुलता देवीजी, देवस्थानचे सचिव ज्ञानेश्वर पहाडे, कोषाध्यक्ष सुशील व्यास, ट्रस्टी मधुसूदन अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर पहाडे यांनी केले.समारोपप्रसंगी मंदिर ट्रस्टतर्फे भागवताचार्य महामंडलेश्वर मंजुलता देवीजी व ब्र. माधुरी दीदी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. आरतीनंतर हजारो भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबाराव फाले, अजय लांबट, महेश राठी, संजय कावळे, अरविंद पाल, किशोर दौड, सुरेश मुंजेवार, तसेच पुष्पा आष्टनकर, अर्चना लांबट, रेखा अमृतकर, कल्पना पोकळे यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले. श्रींच्या प्रगटदिनानिमित्त दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी उसळली होती.

## पोलीस भरतीसाठी उमेदवारांना दिलासा
## बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांसाठी निवासी व्यवस्था

**वर्धा/ जनमाध्यम**

पोलीस भरती–२०२४ अंतर्गत वर्धा जिल्ह्यात होणाऱ्या शारीरिक चाचणी परीक्षेसाठी बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी वर्धा जिल्हा पोलीस विभागाकडून निवासाची सुसूत्र आणि सुनियोजित व्यवस्था करण्यात आली आहे. या निर्णयामुळे मेहनती आणि स्वप्न पाहणाऱ्या हजारो तरुणांच्या मनावरील चिंता दूर झाली आहे.

११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ५ वाजल्यापासून पोलीस मुख्यालय, आंबेडकर चौक, सिव्हील लाईन, वर्धा येथील मैदानावर शारीरिक चाचणी परीक्षा सुरू होणार आहे. परीक्षेसाठी दूरवरून येणाऱ्या उमेदवारांची रात्रीच्या वेळेस राहण्याची गैरसोय होऊ नये, या सामाजिक जाणिवेतून पोलीस प्रशासनाने शहरातील विविध ठिकाणी मोफत निवासाची सोय उपलब्ध करून दिली आहे.यामध्ये महात्मा लॉन, नालवाडी, महादेव मंदिर, महादेवपूरा तसेच तुकाराम मठ, रामनगर या ठिकाणी उमेदवारांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात



आली आहे. प्रत्येक ठिकाणी जबाबदार पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात आली असून, ते उमेदवारांना मार्गदर्शन व सहकार्य करणार आहेत.निवास व्यवस्थेच्या समन्वयासाठी सहा. पोलीस निरीक्षक राजेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून उमेदवार कोणत्याही अडचणीसाठी थेट संपर्क साधू शकतात.

पोलीस भरतीसाठी येणाऱ्या बाहेरील जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी दिलेल्या मोबाईल ९०४९९८९३४१ - ७०३८१०३७२० - ७७४१८२७५९ - ९१७२५२५२६४, क्रमांकांवर संपर्क साधून निवासाबाबत माहिती घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी केले आहे.

## झाडूच्या हातात शुभेच्छा, स्वच्छतेतून : बारावीच्या विद्यार्थ्यांना यशाचा आशीर्वाद
# परीक्षार्थ्यांसाठी बोथलीतील ‘किशोरी गट’चा प्रेरणादायी पुढाकार

**रोहणा/ जनमाध्यम**

दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षांच्या पार्श्वभूमीवर बोथली येथील किशोरी गटाने समाजमनाला स्पर्श करणारा आदर्श उपक्रम राबविला आहे.

परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वच्छ, शांत आणि प्रसन्न वातावरण लाभावे, या भावनेतून किशोरी गटातील मुलींनी गावातील मुख्य रस्ता व बस थांबा परिसर स्वच्छ करून परिसर अक्षरशः चकाचक केला. बालिका, ‘मानवी’ आणि ‘कल्याणी’ या किशोरी गटांच्या मुलींनी एकत्र येत श्रमदानाचा निर्धार केला. दीर्घकाळापासून बस थांब्याजवळ



साचलेला कचरा विद्यार्थ्यांसाठी अडथळा ठरत होता. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने या मुलींनी स्वतः पुढाकार घेत हातात झाडू घेतली. विशेष म्हणजे संपूर्ण परीक्षा काळात दररोज सकाळी सामूहिक श्रमदान करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला आहे.या उपक्रमातून केवळ स्वच्छताच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीचा संदेश देण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, ग्रामपंचायतीचा कर नियमित भरून कचरा व्यवस्थापनात सहकार्य करणे, तसेच गाव बालस्नेही व रोगराईमुक्त ठेवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन किशोरी गटाने ग्रामस्थांना केले.सरपंच तुषार नायसे यांनी ग्रामपंचायतीकडून घन व ओला कचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रस्तावित असून शासनाच्या मंजुरीनंतर तो तात्काळ राबविण्यात येईल, असे सांगितले. किशोरी मुलींच्या या स्तुत्य उपक्रमाचे ग्रामस्थांनी भरभरून कौतुक केले असून, परीक्षेच्या काळात स्वच्छतेतून शुभेच्छा देणारा हा उपक्रम तालुक्यात प्रेरणादायी ठरत आहे.

## तिकीट वादातून बसवर दगडफेक

वर्धा - तिकीट काढण्यावरून झालेल्या वादाचे रूप थेट दगडफेकीत झाल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील उबदा परिसरात घडली. रापमच्या वाहकाने तिकीट काढण्यास सांगितल्याचा राग मनात धरून एका प्रवाशाने बसवर दगड मारून काचा फोडल्या. सुदैवाने या घटनेत प्रवाशांना इजा झाली नाही. मात्र सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. घटनेनंतर बस काही काळ मार्गावरच थांबविण्यात आली. वाहकाच्या तक्रारीवरून संबंधित व्यक्तीविरुद्ध समुद्रपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे रापम कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होत आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे ‘समाजसेवेची आवड निर्माण करणारी चळवळ’-प्रफुल लोखंडे

**देवळी/ जनमाध्यम**

‘आजच्या मोबाईल व यूट्यूब च्या युगात सामाजिक कार्यामध्ये तरुण-तरुणींना पाहिजे तेवढा रस नाही. समाजाचा आपण एक भाग आहोत ही कल्पना संपुष्टात आल्यास समाज सेवेकडे कोणीही वळणार नाही म्हणून महाविद्यालय स्तरावर समाजसेवा प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ज्यातून सामाजिक बांधिलकी विकसित होते आणि या दृष्टिकोनातून राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे समाजसेवाची आवड निर्माण करणारी चळवळ होय, असे प्रतिपादन नुकताच झालेल्या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी देवळी तालुक्याचे गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे यांनी रत्नापूर येथे केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ सुनिता सोनारे तर प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे, वर्धेचे गट विकास अधिकारी समर्थ शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक अश्विन गजभिये, सरपंच सुधीर बोबडे, उपसरपंच सौरभ कडू, चंदा तडस, प्रतिभा कन्नाके, विशाखा आखले, रूपाली राऊत, वैशाली कवडकर, प्रा डॉ रफिक शेख, ग्रामपंचायत सदस्य देविदास वाघ, अयुब अली, ग्रामपंचायत अधिकारी अंकिता इसळ, पोलीस



पाटील दीपिका वाघमारे, प्रा. मेघा फासगे, संतोष तुरक, गणेश शेंडे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर मंचावर उपस्थित होते. शिबिरादरम्यान स्वच्छता अभियान गावातून वाहणाऱ्या नाल्यावर बंधारा बांधणे, जनजागृती अभियान, पोस्टर मेकिंग स्पर्धा, महीला मेळावा, प्रबोधनात्मक व्याख्याने व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश होता.

सरपंच सुधीर बोबडे म्हणाले ‘स्वच्छ ग्राम सुंदर ग्राम’ ही मोहीम राबवायची असल्यास सुजन नागरिकांनी समोर येण्याची गरज आहे तर उपसरपंच सौरभ कडू म्हणाले ग्राम स्वच्छता केवळ ग्रामपंचायत कार्यालयाची जबाबदारी नसून यात गावातील नागरिकांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. शिबिरात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल अंडर ऑफिसर रितेश बुटे, सिनिअर अंडर ऑफिसर कल्याण लिखार व अंडर ऑफिसर कोमल शितळे यांना ‘उत्कृष्ट स्वयंसेवक’ म्हणून प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना युनिटचा यावर्षीच्या ‘समाज सेवा पुरस्कारा’ने सरपंच सुधीर बोबडे व उपसरपंच सौरभ कडू यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रम अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.आरती मरघडे हिने शिबिराचे अहवाल वाचन केले. कार्यक्रमाचे संचालन अंडर ऑफिसर कोमल शितळे व समीक्षा नेवारे यांनी केले तर आभार ग्रामपंचायत अधिकारी यांनी मांडले. यशस्वी ते करिता सुजल पराते, सौरभ साव, यामिनी पारधी, आरती मरगडे, स्नेहा मडकाम, पायल चौके, कुंदन कावडे, पंकज पवार, तेजस वाघाडे, भूषण ठोके, सोमेश्वर पोराटे, विपुल पेंदाम, साहिल जगनाडे, साहिल गेडाम, साक्षी परिसे, पूर्वा कापटे, व रा.से.यो. स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# रघुनाथराव पिंपळकर यांचा सेवापूर्तीनिमित्त सपत्नीक सत्कार

**वर्धा/ जनमाध्यम**


शिक्षणाच्या पवित्र सेवेत आयुष्य वाहून घेतलेल्या पदविधर शिक्षक रघुनाथराव पिंपळकर यांच्या सेवापूर्तीनिमित्त सालेकसा तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, जमाकुडो येथे भावनिक वातावरणात सपत्नीक सत्कार सोहळा पार पडला. गणेश नगर, बोरगाव (मेघे) येथील रहिवासी असलेल्या पिंपळकर सरांच्या निरोपप्रसंगी डोळ्यांत समाधान तर मनात कृतज्ञतेची ओल दिसून आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य धनराज शरणागत होते.



प्रमुख पाहुणे म्हणून विनयराज वाघमारे, प्रो. डॉ. विनोद राऊत, रवींद्र गणवीर, दयाराम दहिफळे, विरेंद्र पडोळे, शेख, हरिसिंग देसाई आदी मान्यवर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.सेवाकाळातील आठवणींना उजाळा देताना सहकाऱ्यांनी पिंपळकर सरांचे शांत, सुस्वभावी व्यक्तिमत्त्व उलगडले. कभी अलविदा ना कहनाष्ठया गीतातून भावना व्यक्त करत विनयराज वाघमारे यांनी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना पिंपळकर सरांनी पत्नी छाया पिंपळकर यांच्यासह सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानले.सेवेचा अध्याय संपला, पण शिक्षक म्हणून दिलेले संस्कार मात्र कायमचे राहिले, अशीच भावना उपस्थितांच्या मनात दाटून आली.

## जुन्या वादाचा राग एकाला डोक्यात मारून गंभीर जखमी

**वर्धा**-जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी थेट हिंसाचाराचा मार्ग अवलंबल्याची घटना हमदापूर येथील देरडा चौकात घडली. चौकात बसलेल्या एका व्यक्तीवर अचानक काठीने हल्ला करण्यात आला. डोक्यात जबर मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. आरोपीने माझ्याशी मागे वाद का केला असे म्हणत मारहाण केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेनंतर परिसरात काही



काळ तणावाचे वातावरण होते. या प्रकरणी सेलू पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून जुन्या वादातून वाढणाऱ्या हिंसाचाराबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

## नालंदा विद्यापीठात महाराष्ट्र राज्य गौरव पुरस्कार २०२६
## डॉ. विनोद विनायकराव देशमुख यांचा सन्मान

**विरुळ आकाजी/ जनमाध्यम**

नालंदा विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने पत्रकार भवन, पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य गौरव पुरस्कार २०२६ सोहळ्यात प्रख्यात नाडी रोगतज्ज्ञ व आयुर्वेद प्रॅक्टिशनर डॉ. विनोद देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. आयुर्वेद क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, रुग्णसेवेतील निष्ठा व समाजोपयोगी आरोग्यसेवेची दखल घेऊन हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. नितीन बडगे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेंद्र सिंग



वालिया उपस्थित होते. यावेळी डॉ. गीता जोशी, डॉ. प्रा. संदीपिका, डॉ. अर्चना देसाई यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. दीपक जाधव यांनी केले.डॉ. देशमुख यांच्या सन्मानामुळे आयुर्वेद क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली असून समाजोपयोगी आरोग्यसेवेला नवी प्रेरणा मिळाल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

## राज्यस्तरीय प्रश्नमंजुषेत आर्वीच्या विद्यार्थ्यांची बाजी
## शासकीय तंत्रनिकेतनचा लौकिक उंचावला : १५ हजारांचे रोख पारितोषिक पटकावले

**आर्वी/ जनमाध्यम**

शासकीय तंत्रनिकेतन, आर्वी येथील अनुविद्युत अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने प्रायोजित व शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे आयोजित इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानावर आधारित या स्पर्धेत आर्वीच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली.या स्पर्धेत



इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार विभागाचे मुन्ना टोपले व प्रणव आसकर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. विजय मानकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रासह १५ हजार रुपये रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.या यशाबद्दल अनुविद्युत विभागप्रमुख डॉ. व्ही. जे. डोंगरे व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील संस्थेच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे शासकीय तंत्रनिकेतन, आर्वीचा लौकिक वाढला असून सर्व स्तरातून कौतुक होत असल्याची माहिती प्रसिद्धी प्रमुख प्रा. प्रकाश कतोरे यांनी दिली.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा रंगतदार आविष्कार
## कासारखेडा जि.प. शाळेत चार दिवसीय स्नेहसंमेलन व व्यक्तिमत्व विकास सोहळा

**खरांगणा (मो,)/ जनमाध्यम**

नजीकच्या कासारखेडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी चार दिवसीय वार्षिक व्यक्तिमत्व विकास सोहळा तथा शालेय स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलतेचा मुक्तपणे आविष्कार करत कार्यक्रमाला रंगत आणली. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी पंकज तायडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अन्नाजी मुडे विद्यालयाचे मुख्याध्यापक मधुसुदन कळमकर होते. प्रमुख अतिथी म्हणून विनोद महाजन, विलास तराळे, केंद्र समन्वयक मुकुंद बोराडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सुनीता



पारिसे, उपाध्यक्ष किशोर पेढकर यांच्यासह महेंद्र जुन्नाके, ममता तायवाडे, वर्षा पट्टेवार व समितीचे सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमात चित्रकला, हस्तकला, नृत्य, गायन, वादन, नाट्यप्रयोग, कविता वाचन यासह मातृ-पितृ पूजन, सामान्य ज्ञान स्पर्धा, रांगोळी, बटाटा रेस, पोता दौड, संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा, प्रश्नमंजुषा, आनंद मेळावा व विज्ञान प्रदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रफीक शेख यांनी केले. प्रास्ताविक ममता तायवाडे यांनी मांडले तर आभार अरुण फुले यांनी मानले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी शिक्षक प्रवीण भट यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## क्रेशर प्लाँटमध्ये कामगारावर लोखंडी रॉडने हल्ला

**वर्धा**-कामाचा प्रामाणिक हिशेब मागणे एका कामगाराला चांगलेच महागात पडल्याची धक्कादायक घटना दहेगाव (गो.) येथील लक्ष्मी क्रेशर प्लाँटमध्ये घडली. कामाचा हिशेब करताना कमी मोबदला दिल्याचा जाब विचारल्याने संतप्त झालेल्या दोघा सहकाऱ्यांनी संगनमत करून कामगारावर लोखंडी रॉडने हल्ला केला. यात तो गंभीर जखमी झाला. जखमी व आरोपी तिघेही एकाच प्लाँटमध्ये काम करीत असून परिसरातच वास्तव्यास आहेत. जेवणानंतर हिशेब करताना वाद वाढला आणि त्याचे रूपांतर थेट हिंसाचारात झाले. या प्रकरणी जखमीच्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध दहेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ७६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# धामंत्री येथे कलशयात्रा,ओम नमः शिवाय चा जप
## नायब तहसीलदार आशिष नागरे यांच्या हस्ते स्थापना

**तिवसा/प्रतिनिधीः-**
आगामी महाशिवरात्री निमित्ताने सर्वत्र विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर अमरावतीच्या तिवसा तालुक्यातील प्राचीन श्री नागेश्वर महादेव संस्थानच्या वतीने दिनांक ९ मार्च २०२६ रोजी भव्य कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कलश यात्रेचा प्रारंभ धामंत्री येथील वरदायिनी वर्धा नदि तीरावर आरती करून झाला. या कलशयात्रेमध्ये वारकरी मंडळींच्या भजन दिंड्याचा समावेश होता. कडकडत्या उन्हात अनवाणी पायाने ओम नमः शिवाय चा जप करत डोक्यावर कलश घेऊन महिला नदीपासून नगरप्रदक्षिणा घालत मंदिराकडे रवाना झाल्या. नगरप्रदक्षिणा करत असताना गावात ठिकठिकाणी कलश यात्रेचे स्वागत करण्यात आले. जागोजागी पूजन करण्यात आले. आकर्षक फुलांची सजावट व संपूर्ण रस्त्याने रांगोळी काढून गावकऱ्यांनी भक्तिमय वातावरणात दिंडीचे स्वागत केले. या कलशयात्रेचे श्री नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री येथे आगमन होताच मंदिर समितीच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. सकाळी सर्वप्रथम तहसीलदार तिवसा मयुर कळसे साहेब (सपत्नीक) यांचे कडून शिवलिंगाचा अभिषेक व पूजा तसेच संस्थेचे अध्यक्ष कैलाशकुमार कमलकिशोर पनपालिया पत्नी पल्लवी पनपालिया यांच्याहस्ते श्री नागेश्वर महादेव भगवानाच्या पिंडीचा अभिषेक व कलश पूजन करण्यात आले. व हजारो महिलांनी डोक्यावर आणलेल्या कलशातील पाणी पिंडीवर सोडून महाभिषेक करण्यात आला. आणि तिवसा तहसील चे नायब तहसीलदार आशिष नागरे यांच्या हस्ते पंडित स्वप्नील महाराज खेडकर यांचे पूजा विधी द्वारे कलश स्थापना करण्यात आली. त्यानंतर ओम नमशिवाय चा जप करून आरती करण्यात आली.

त्यानंतर हजारो भक्तांनी महाप्रसाद घेतला व तदनंतर शिवपुराण कथेची सुरूवात झाली, कलश यात्रेच्या यशस्वीतेसाठी श्री नागेश्वर महादेव संस्थानचे (सर्व पदाधिकारी) अध्यक्ष कैलाशकुमार पनपालिया, विश्वस्त विजय करडे, मोहन इंगळे, रवींद्र भोयर, धीरज चांडक, सुनील मारबदे, रमेश राउत, तसेच सहकारी मनोहर कसर, जानराव भारस्कर, रामुकाका बावने, धनराज इंगळे, सोपान करडे, सतीश थोटे, मुकेश पवार, वैभव इंगळे, नयन बावने, लकी नेमाडे, पूर्वेश नेमाडे, पंकज सोनटक्के, मयुर बावणे त्याचबरोबर धामंत्री तसेच पंचक्रोशीतील सर्व सेवाधारी भक्तांचे सहकार्य लाभले.



# ड्रग्स, शस्त्र व हुक्का पार्लर चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करा
## पोलीस आयुक्तांचे ठाणेदारांना निर्देश



**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरात गांजा, एमडी ड्रग्स, देशी कट्टा सह अवैध शस्त्रांची विक्री होत आहे तसेच हुक्का पार्लर ही सुरू आहे. यावर कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील सर्व ठाणेदारांना दिले. यासंदर्भात त्यांनी मंगळवारी सर्व ठाणेदारांची आणि गुन्हे शाखेची बैठक बोलावली आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. नवीन वर्ष सुरू झाल्यापासून शहरात एनडीपीएस अन्वये अनेक कार्यवाही झालेल्या आहे. युवा पिढी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थाचे सेवन करताना दिसत आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाने अनेक ठिकाणी कारवाई करून एमडी ड्रग्स जप्त केले आहे. पोलिसांच्या हाती अजून पर्यंत ड्रग्सचा मुख्य आरोपी लागलेला नाही. डीआरआईच्या पथकाने नवसारी परिसरात कार्यवाही करून ५ कीलो एमडी ड्रग्स जप्त केली होती. यामुळे शहर पोलिसात खळबळ उडाली होती. या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. जे एमसीआर वर कारागृहात आहे. यानंतर पोलीस आयुक्तांनी गुन्हे शाखेसह सर्व ठाणेदारांना अवैध धंदा करणाऱ्या विरुद्ध कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार शहरात कार्यवाही सुरू आहे. गांजा, एमडी, देशी कट्टा, तलवार चायना चाकू ची विक्री करणारे तथा अवैधरित्या हुक्का पार्लर चालवणाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे. पोलीस आयुक्तांनी रेकॉर्डधारी आरोपीच्या हालचालीवर पण नजर ठेवायला सांगितले आहे. सर्व ठाणेदारांसह डीबी पथकाला कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१२१/२०२५
**श्रीमती पानीबाई अधिक सहा -वि- निरंक**
पुढील ता.१७.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Pannibai Makkhanlal Sharma @ Ramsewak, Age 74 Yrs. Occu.: Household R/o New Town, Weekly Market, Badnera, Tq. Dist.Amravati.
2. Deepak Makkhanlal Sharma @ Ramsewak Age 57 Yrs. Occu.: Service
3. Shivkumar Makkhanlal Sharma @ Ramsewak, Age 53 Yrs. Occu.: Service 2 & 3 R/o Ring Road, Vijay Vidyut Colony, Behind Water Tank Bhartiya Layout VTC Akola, Tq Dist. Akola
4. Varsha Sonal Sharma @ Ramsewak Age 34 Yrs. Occu.: Household
5. Aarushi Sonal Sharma @ Ramsewak Age 12 Yrs. Occu.: Education
6. Aarohi Sonal Sharma @ Ramsewak Age 1 Yrs. Occu.: Education
4. Vansh Sonal Sharma @ Ramsewak, Age 5 Yrs. Occu.: Nil 4 to 7 R/o Lakadganj, Malipura, Navi Vasti, Badnera, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मख्खनलाल मुरलीधर शर्मा @ रामसेवक** हे दिनांक 19.06.1981 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पानीबाई अधिक सहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पानीबाई अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१३१/२०२५
**श्रीमती कांताबाई अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१७.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Kantabai Janardhan Nikam, Age 74 Yrs. Occu.: Household
2. Suwarna Pramod Gade, Age 48 Yrs. Occu.: Household R/o Dolhari, Yavatmal-445202
3. Kavita Mukundrao Jachak, Age 45 Yrs. Occu.: Household
4. Sunil Janardhan Nikam, Age 43 Yrs. Occu.: Labour Appli.No.1, 3 & 4 All R/o Near Hanuman Mandir, Benoda Jahangir, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **जनार्धन नारायणराव निकम** हे दिनांक 18.11.2012 रोजी **बेनोडा जहांगीर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कांताबाई अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कांताबाई अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 1019/2025 कलम २२ पुढील तारीख ०४.०३.२०२६
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती, ता.जि.अमरावती ई १४०९/अमरावती**
अर्जदार - **श्री.आशिष रमेशचंद्रजी मालू, रा.जयराम नगर, शंकर नगर, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप-आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
(ब) **स्थावर मिळकत (वर्णन)** मिळकत क्र.१ सर्व्हे क्र.२४

नोंदणी पोट तुकडी अमरावती, ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद, अमरावतीचे हद्दीतील मौजा माळेगांव, प्रगणे बडनेरा ता.जि.अमरावती दुय्यम निबंधक अमरावती यांचे हद्दीतील भो.वर्ग १, शेत सर्व्हे नं.२४ ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३ हेक्टर ६४ आर आहे, यापैकी उत्तर-दक्षिण वाटणीचे पश्चिमेकडील भाग ज्याचे क्षेत्रफळ २ हे.१६ आर आहे. ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

**चतुःसिमा (सर्व्हे नं.२४) २ हेक्टर १६ आर-**
**पुर्वेस** - सर्व्हे नं.२४ मधील ऑरेंट सिटी रियल इन्फा.प्रा.लि.ची उर्वरित १ हे.४८ आर जमीन
पश्चिमेस - फॉरेस्टची जमीन (सर्व्हे नं.१४)
दक्षिणेस - भानखेडा रस्ता
उत्तरेस - सर्व्हे नं.२३/१ मधील हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्टची उर्वरित १ हे.८४ आर. जमीन

**२) मिळकत क्र.२ (सर्व्हे नं.२३/१)-**
नोंदणी प ोट तुकडी अमरावती, ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हद्दीतील, मौजा माळेगांव, प्रगणे बडनेरा ता.जि.अमरावती, दुय्यम निबंधक अमरावती यांचे हद्दीतील भो.वर्ग-१, शेत सर्व्हे नं.२३/१ ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३ हे.८८ आर आहे, यापैकी उत्तर-दक्षिण वाटणीचे पश्चिमेकडील भाग ज्याचे क्षेत्रफळ १ हे.८४ आर आहे, ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

**चतुःसिमा (सर्व्हे नं.२३/१) १ हे.८४ आर.**
पुर्वेस - सर्व्हे नं.२३/१ मधील ऑरेंज सिटी रियल इन्फा प्रा.लि.ची उर्वरित २ हे.०४ आर.जमीन
पश्चिमेस - फॉरेस्टची जमीन (सर्व्हे नं.१४)
उत्तरेस - सर्व्हे नं.२४ मधील अनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्टची उर्वरित २ हे.१६ आर जमीन
दक्षिणेस - सर्व्हे नं.१७

एकुण ४ हेक्टर ०० आर शेत (१९ एकर)
एकुण मुल्य रु.७०,८०,०००/- (अक्षरी सत्तर लक्ष ऐंशी हजार रु.फक्त)

| सर्व्हे क्र. | खाता नं. | आकारणी | क्षेत्रफळ हे.आर |
|---|---|---|---|
| २४ | ३१० | ३.६८ | २.१६ |
| २३/१ | ३१० | १२.४४ | १.८४ |
| | | एकुण | ४.०० |

**३) मिळकत क्र.३ (सर्व्हे नं.२४, २३/१, १७)-**
नोंदणी प ोट तुकडी अमरावती, ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हद्दीतील, मौजा माळेगांव, प्रगणे बडनेरा ता.जि.अमरावती, दुय्यम निबंधक अमरावती यांचे हद्दीतील भो.वर्ग-१, शेत सर्व्हे नं.२४, २३/१, १७ असे तिन्ही सर्व्हे नं.मधील एकुण जमीन १२ हे.०६ पैकी या खरेदीद्वारे विकत असलेली शेतजमीन ज्याचे एकुण क्षेत्रफळ ४ हे.१० आर आहे, ज्याची रुंदी (फ्रंट) ४८.०२ मीटर असून त्याचे वर्णन व ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

| सर्व्हे क्र. | खाता नं. | आकारणी | एकुण क्षेत्रफळ हे.आर | पैकी घेतलेले क्षेत्रफळ हे.आर | पोट-खराब |
|---|---|---|---|---|---|
| २४ | ३४४ | २.०९ | १.४८.०० | ०.७७ | ० |
| २३/१ | ३१० | ६.५४ | २.०४.०० | १.२८ | ० |
| १७ | ३१० | २५.०० | ८.७४.०० | २.०५ | ० |
| | | एकुण | १२.०६.०० | ४.१० | ० |

**चतुःसिमा (सर्व्हे नं.२४) -**
**पुर्वेस** - सर्व्हे नं.२४ चा उर्वरित भाग
पश्चिमेस - हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट (सर्व्हे नं.२४)
दक्षिणेस - सर्व्हे नं.२३/१ चा भाग
उत्तरेस - अमरावती ते भानखेडा रोड

**चतुःसिमा (सर्व्हे नं.२३/१) -**
**पुर्वेस** - सर्व्हे नं.२३/१ चा भाग
पश्चिमेस - हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट (सर्व्हे नं.२३/१)
दक्षिणेस - सर्व्हे नं.१७
उत्तरेस - सर्व्हे नं.२४

**चतुःसिमा (सर्व्हे नं.१७) -**
**पुर्वेस** - सर्व्हे नं.१८ चा भाग
पश्चिमेस - फॉरेस्ट
दक्षिणेस - सर्व्हे नं.१७ उर्वरित भाग (ऑरेंज सिटी)
उत्तरेस - हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट (सर्व्हे नं.२३/१)

एकुण ०४ हेक्टर १० आर शेत **एकुण मुल्य रु.८५,००,०००/- (अक्षरी पंच्यांशी लक्ष रु.फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप-आयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**र.र.ठाकरे**
**अधीक्षक,(न्यायाशाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

---

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **किशोर कांतीलाल नदियाना,** रा.४ था माळा विशालगड आदर्श हॉटेलजवळ, अग्रवाल धर्मकाट्यासमोर, जुना कॉटन मार्केट चौक, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारान्वये मी जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाणे-

नोंदणी पोट तुकडी अमरावती विद्यमान कचेरीचे कक्षेतील व हद्दीतील मौजे उदखेड, ता.जि.अमरावती येथील शेत गट नं.२९१ शेतजमीन भो.वर्ग १, आकार रु.१४.०० पैसे क्षेत्रफळ ६ हे.१३ आर. यापैकी १ हे.५२ आर खरेदी दि.२.०३.२०१५ खरेदीखत नं.२७०२/२०१५ खरेदीमध्ये नमुद असलेल्या ज्याच्या चतुःसिमा येणेप्रमाणे-

पुर्वेस - गणपतराव दुधे यांचे शेत; पश्चिमेस- रामटेके यांचे शेत
उत्तरेस- मुकेश यांचे शेत; दक्षिणेस - मयंक यांचे शेत

वर नमुद चतुःसिमेच्या आतील शेतजमिनी बाबत दि.२.३.२०१५ रोजीचे खरेदीचे अनुषंगाने माझे पक्षकाराने वि.जिल्हा निबंधक सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे सावकारी अधिनियमा अंतर्गत प्रकरण दाखल केलेले आहे तसेच वि.३ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात मनाई हुकुमाबाबत दिवाणी दावा दाखल केला असून सदरचे दाव्याचा नं.आर.सी.एस.२१७/२०२३ असा असून सदरचा दावा आज रोजी सदर न्यायालयमध्ये प्रलंबित आहे.

वर नमुद मालमत्तेसंबंधाने माझे पक्षकाराचे संमतीशिवाय कोणीही कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केला असल्यास, अथवा भविष्यात केल्यास सदरचा तथाकथीत व्यवहार माझे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही तसेच सदरचा व्यवहार निरर्थक व शून्य समजण्यात येईल आणि सदरच्या तथाकथित व्यवहाराकरीता माझे पक्षकाराला सक्षम न्यायालयात दाद मागावी लागल्यास अशा परिस्थितीत होणाऱ्या खर्चास व परिणामास माझे पक्षकार जबाबदार राहणार नाही. करीता नोटीस असे. कृपया नोंद घ्यावी.

दिनांक ०९/०२/२०२६
अमरावती

आपला,
**(ॲड.पी.आर देशमुख)**अमरावती
मो.नं.९४२३१२५०२४, ८२७५३९३६७४

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.८५/२०२६ ने.ता.७.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.ओम किसनराव इंगोले, वय ३७ वर्षे, धंदा - शेती
२. कु.पल्लवी किसनराव इंगोले, वय २२ वर्षे, धंदा - घरकाम
दोघेही रा.काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे किसनराव चंपतराव इंगोले** हे दि.**२०.०१.२०१५** रोजी त्यांचे राहते घरी काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई **अरुणाबाई किसनराव इंगोले** ही दिनांक **११.०३.२०१४** रोजी तिचे राहते घरी काटपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांच मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत . तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.७१/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.नागोराव हिम्मतराव भोजने, वय ४९ वर्षे, धंदा - नोकरी रा.खोपडा, ह.मु.पुर्वा कॉलनी, साईनगर, अमरावती
२. सौ.छाया विजयराव राऊत,, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम रा.अर्जुन नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील **नामे हिम्मतराव इसनाजी भोजने** हे दि.**२८.१२.२०२३** रोजी खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत . तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०५.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६७/२०२६
**श्री.प्रविण अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१८.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Pravin Ramanlal Raul, Age 59 Yrs. Occu.: Business R/o Dr.Wathodkar Galli, Dahisath Road, Inside Ambagate, Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Anita Ravindra Gulalkari, Age 53 Yrs. Occu.: Housewife R/o Sandip Niwas, Dahisath Road, Near Sitaram Building, Budhwara, Amravati. Tq. Dist. Amravati
3. Sunita Vivek Mehetre, Age 50 Yrs. Occu.: Housewife R/o Plot No.275, Arihant, Near Navratri Gate, Rampeth, Telephone Exchange Square, Kolar, Bagadganj, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शकुंतला रमणलाल राऊळ** हे दिनांक 06.04.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **प्रशांत रमणलाल राऊळ हे दिनांक २३.०२.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **प्रविण अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रविण अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.२८/२०२६ ने.ता.०५.०३.२०२६

**अर्जदार :**
१. शांताबाई आनंदराव तायडे,
२. चंद्रशेखर आनंदा तायडे
३. दिपक आनंदराव तायडे
नं.१ ते ३ रा.एरंडगांव, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती
४. संगीता राजू श्रीनाथ रा.राजदे प्लॉट, इंदिरा नगर, अकोट, जि.अकोला
५. मिना संजय सतोटे, रा.अब्दुल गण हाऊसच्या जवळ, गजानन नगर बिच्छु टेकडी,अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत आनंदराव भगवान तायडे** यांचा मृत्यू दिनांक **०४.०९.२०२५** रोजी एरंडगांव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार १ ही पत्नी असून अर्जदार २ व ३ ही मुले आहेत. अर्जदार नं.४ व ५ ह्या मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,क.स्तर
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**
आर.एम.जे.सी. क्र.२०/२०२६ ने.ता.०४.०३.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :**
१. विद्या महेंद्र टापरे, वय ५६ वर्षे, धंदा - गृहिणी रा.राजुरा, ता.नांदगांव खंडेश्श्वर, जि.अमरावती
२. मंगला दिलीपराव धोटे, वय ५३ वर्षे, धंदा - गृहिणी रा.जवळा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. रेखा शिवाजी पडोळे, वय ५१ वर्षे, धंदा - गृहिणी रा.रहाटगांव, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **विद्या महेंद्र टापरे व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **रामदास वासुदेवराव झाडे** यांचा मृत्यू दिनांक **२५.०९.१९९२** रोजी निंभा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. व **कुसूमबाई रामदास झाडे** यांचा मृत्यू दिनांक **१२.११.२०११** रोजी राजुरा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक ०३ माहे फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

---

प्रो.क्र.०५/२०२६

### वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्रमांक ४७३/२०२५ ने.ता.११.०२.२०२६

**अर्जदार :**
१. द्वारकाबाई रामचंद्र मोहोड, वय ७६ वर्षे, धंदा - गृहिणी रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती
२. अंबादास रामचंद्र मोहोड, वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती
३. धनराज रामचंद्र मोहोड, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **रामचंद्र नंदुजी मोहोड** हे दि.**०१.०३.२००८** रोजी मयत झाले. अर्जदार **द्वारकाबाई रामचंद्र मोहोड**, वय ७६ वर्षे, धंदा - गृहिणी, रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२४.१२.२०२५** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **रामचंद्र नंदुजी मोहोड** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **रामचंद्र नंदुजी मोहोड** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **०२.०१.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४६/२०२६
**कल्पना व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kalpana Wasudev Pawar @ Marathe, Age 78 Yrs. Occu.: Housewife
2. Narayan Wasudev Pawar @ Marathe, Age 38 Yrs. Occu.: Agriculturist Both R/o 24 Hamalpura New Town Badnera Tq. Dist. Amravati.
3. Manda Raju Jagtap, Age 41 Yrs. Occu.: Housewife R/o Punasa Post Nimadkhedi Ward No.9, Khedi Bujurg Nimarkhedi East Nimar MP
4. Poonam Mukesh Arade, Age 31 Yrs. Occu.: Housewife R/o Plot No.38 Nalva Road, Shahu Nagar Near Khanderao Park Nandurbar
5. Dilip Namdeorao Pawar @ Marathe, Age 64 Yrs. Occu.: Agriculturist
6. Mohan Namdeorao Pawar @ Marathe, Age 57 Yrs. Occu.: Agril.
7. Digambar Namdeorao Pawar @ Marathe, Age 53 Yrs. Occu.: Agril.
8. Gajanan Namdeorao Pawar @ Marathe, Age 45 Yrs. Occu.: Agril.
9. Gajanan @ Balu Namdeorao Pawar @ Marathe, Age 43 Yrs. Occu.: Agriculturist 5 to 9 R/o 24, Hamalpura New Town Badnera Tq. Dist. Amravati.
10. Rajkanya Mohan Shirke, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Survey No.206, Road No.7, Pune Saswad Road, Opp.IBM Company Tukai Darshan Phursungi Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शंकर बापुजी पवार उर्फ मराठे** हे दिनांक 01.12.1985 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कल्पना व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कल्पना व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**
किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.३०/२०२६ ने.ता.०९.०३.२०२६

**अर्जदार :**
१. पुष्पा श्रीकृष्ण तांदुळकर,
२. भारती श्रीकृष्ण तांदुळकर
३. अश्विनी श्रीकृष्ण तांदुळकर
४. लावण्या श्रीकृष्ण तांदुळकर
सर्व रा.रुम नं.५, ऋतुछाया नागवाडी, गोणदेवी मंदिर जवळ, दिवा पश्चिम ठाणे-४००६१२

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत श्रीकृष्ण उर्फ दुर्योधन सखाराम तांदुळकर** यांचा मृत्यू दिनांक **०१.०९.२०१८** रोजी रुम नं.५, ऋतुछाया नागवाडी, गोणदेवी मंदिर जवळ, दिवा पश्चिम ठाणे-४००६१२ येथे झाला. मयतांचे अर्जदार १ ही पत्नी असून अर्जदार २ ते ४ ह्या मुली आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,क.स्तर
नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीरनामा

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्रमांकः ३१३९/२०२६** **पुढील तारीख २५.०२.२०२६**
संगीता विरुध्द निरंक

**अर्जदार-**1. Sangita Panjab Gulhane **Age: 57 yrs, Occ-Household R/o Plot No. 2147/7/A, Amba Nagar, Near Jwalamukhi Mandir, Amravati**
2. Abhay Panjabrao Gulhane **Age-35 yrs, Occ- Labour R/o Akoli Road, Near Durga Devi Mandir Amba nagar Amravati**

विरुध्द
गैरअर्जदार- निरंक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की** मयत पंजाब मारोतराव गुल्हाणे दि ०४.१० २०२१ रोजी अमरावती, येथे मयत झाले अर्जदार संगिता व इतर विरूध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** संगीता विरुध्द निरंक **निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि. २८.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ,अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रशिक्षण कार्यशाळा

**अमरावती -** श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तीन दिवसीय सॉफ्ट स्किल ट्रेनिंग कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत महाविद्यालयातील विविध शाखांतील एकूण ७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक जुही पाटील यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगणक विभागाच्या प्रमुख डॉ. अंजली राऊत उपस्थित होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानाबरोबरच सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व अधोरेखित करत अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन केले. नव अभियंते विद्यार्थ्यांकरिता सॉफ्ट स्किल ट्रेनिंग उपक्रमाच्या आयोजनाकरिता मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दाळु, इंडस्ट्री रिलेशन अँड प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा. प्रणव चेंडके यांनी प्राध्यापक वर्गाचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.





### प्रकट दिनानिमित्त रक्तदान शिबीर ५० रक्तदात्याचा सहभाग

**अचलपूर-**श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती व मेळघाट ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमानाने कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५० रक्तदात्यांनी सहभाग घेतला. यावेळी अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रतिभा ठाकरे,उपसभापती अमोल चिमोटे,संचालक अमोल बोरकर,नितीन आगे,पोपट घोडेराव,सामाजिक कार्यकर्ते प्रशांत ठाकरे,श्रीकांत चित्रकार,सुनील खानझोडे,प्रफुल कुऱ्हेकर आदी उपस्थितीत होते.



### प्रकट दिनानिमित्त सदिच्छा भेट

**लेहेगाव-**श्री. गजानन महाराज संस्थान, भोजनपुरा नेरपिंगळाई येथे बडनेरा मतदार संघाचे आ. रवि राणा यांनी प्रकट दिनानिमित सदिच्छा भेट दिली.मंदिर मध्ये पोहोचल्यानंतर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले, त्यानंतर त्यांनी मंदिरमध्ये प्रवेश करून श्री गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि हारार्पण केले. यावेळी सोनाली नवले, सतिश चरडे,अशोकराव खारकर, निलेशजी दोरे, मीना मोहोड (सरपंच ग्रा. प.शिरखेड) पुरुषोत्तम. जि. टोपले( ग्रा.प. गोराळा पिंगळाई) मुळनकर महाराज (लीहीदा). रामदासजी पातूरकर, साहेबराव कोकाटे, सुनिलजी टाकळे, राजेंद्रजी टाकळे, गजानन महाराज महिला भजन मंडळ प्रामुख्याने उपस्थित होते तसेच गावातील समस्त नागरिक उपस्थित होते.



### श्री संत गजानन महाराज प्रकटदिन महोत्सव उत्साहात

**चांदूर रेल्वे-**येथील संताबाई यादव नगरमधील श्री संत गजानन महाराज मंदिरात ३ ते ८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित श्री संत गजानन महाराज प्रकटदिन महोत्सव भक्तिभावपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. या महोत्सवाच्या कालावधीत काकडा आरती, श्रींचा महाअभिषेक व आरती, हरिपाठ, भजन, कीर्तन तसेच रात्री प्रबोधनात्मक भजनांचे आयोजन करण्यात आले होते. दर गुरुवारी नियमित महाप्रसादासह महोत्सव काळात विशेष महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली होती.महोत्सवाच्या अंतिम दिवशी ह.भ.प. तात्या महाराज उर्फ भास्करजी पिंपळे यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यांच्या ओघवत्या व प्रभावी कीर्तनाने उपस्थित भाविक भावविभोर झाले.या काल्याच्या कीर्तनप्रसंगी ह.भप. डूबे महाराज, ह.भ.प देशमुख महाराज, डॉक्टर साहेब,ह.भ.प. प्रमोद देशमुख, ह.भ.प अरुणराव देशमुख, ह.भ.प सुधीरराव देशमुख, ह.भ.प. तितर्रे, ह.भ.प. कदम, ह.भ.प. डूबें, ह.भ.प. कडू,ह.भ.प. झाडे,ह.भ.प. राऊतबाई, ह.भ.प. पिंपळेबाई यांच्यासह विविध भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंदिर कमिटी, परिसरातील नागरिक, स्वयंसेवक व भाविकांच्या सहकार्याने हा संपूर्ण महोत्सव अत्यंत शिस्तबद्ध, भक्तिमय व यशस्वीरीत्या पार पडला. या यशस्वी आयोजनाबद्दल श्री संत गजानन महाराज मंदिर कमिटी, संताबाई यादव नगर, चांदूर रेल्वे यांच्या वतीने सर्व कीर्तनकार, मान्यवर, देणगीदार व भाविकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# देण्या-घेण्याची समतोल वृत्तीच समाज घडवते-गोविंदगिरी महाराज

## ब्रजलाल बियाणी एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहाचे उद्घाटन







**अमरावती/क्रा.प्र.**

या जगात देण्या-घेण्याची समतोल वृत्ती जपणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ देणगी देणारी व्यक्ती महान नसून, आयुष्यात देण्या-घेण्याचा समन्वय जो जपतो तो खऱ्या अर्थाने दिव्य व्यक्ती ठरतो, असे प्रतिपादन अयोध्येतील राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष व मथुरा येथील कृष्ण जन्मभूमी न्यासचे अध्यक्ष परमपूज्य स्वामी श्री गोविंदगिरी महाराज यांनी केले.

स्थानिक ब्रजलाल बियाणी एज्युकेशन सोसायटीतर्फे नवविस, रियात जलाल येथे उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक वातानुकूलित सभागृहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हा कार्यक्रम कौटुंबिक व भक्तिमय वातावरणात पार पडला.महाराज पुढे म्हणाले की, ब्रजलाल बियाणी शिक्षण समितीचे कार्य हे केवळ संस्थात्मक नसून एक शैक्षणिक दान आहे. हे कार्य एका व्यक्तीपुरते मर्यादित न राहता भावी पिढ्यांच्या शिक्षणासाठी मार्गदर्शक ठरत आहे. समाजातील सर्व घटकांनी या कार्यात योगदान दिल्यास खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन साधता येईल. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रवेशद्वारापासून झांकी, लेझीम व दीदी गटांच्या मिरवणुकीद्वारे स्वामी गोविंदगिरी महाराजांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर रिबन कापून व शिलान्यास फलकाचे अनावरण करून सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. देवी सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.यावेळी संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश लड्ढा, उपाध्यक्ष देवदत्त शर्मा, सचिव सुनील गोयंका, माजी अध्यक्ष अशोक राठी यांच्यासह पदाधिकारी, सदस्य, प्राचार्य, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित स्मरणिकेचे प्रकाशन स्वामीजींच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी, संस्थेचे माजी अध्यक्ष अशोक राठी यांनी प्रथम महाराजांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत केले. नंतर, संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश लड्ढा, उपाध्यक्ष देवदत्त शर्मा, विनोद कुमार समरा, सचिव, सुनील कुमार गोयंका, कोषाध्यक्ष, संयुक्त सचिव ओम पाल नाती, सदस्य डॉ. राजीव बियाणी, प्रकल्प अग्रवाल, दीपक संजय कुमार काकरानिया, कैलाश कासट, नावंदर, राजकुमार अग्रवाल, हनुमान मंका आणि आदित्यराज उपस्थित होते. गगलानी आणि प्रशांत राठी यांच्यासह संस्थेच्या सदस्यांनी स्वामी गोविंदगिरी महाराजांना पुष्पहार, शाल, नारळ आणि स्मृतिचिन्ह देऊन विशेष सन्मानित करण्यात आले.ब्रजलाल बियाणी शिक्षण समितीचे अध्यक्ष ओम प्रकाश लड्ढा यांनी उद्घाटनपर भाषण केले. त्यांनी संस्थेच्या कार्याचा लेखाजोखाही सादर केला. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या स्मरणिकेचे प्रकाशनही स्वामीजींनी केले. यावेळी ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे आणि नारायणदास लड्ढा हायस्कूलच्या प्राचार्य विजया कलानी यांनी महाराजांचे पुष्पहार घालून स्वागत केले.आर्किटेक्ट वेंकटेश राठी, स्ट्रक्चरल इंजिनिअर रितेश लड्ढा, कूलिंग इंजिनिअर चंद्रप्रकाश लड्ढा, साउंड अँड इंटीरियर मॅनेजर प्रकाश राठी, टाइल इंजिनिअर गोपाल कुमावत आणि सौकली इंजिनिअर अरुण गजभिये आणि स्वामीजींची भव्य आणि आकर्षक रांगोळी तयार करणारी विद्यार्थीनी सावरी धानोरकर यांना पूज्य स्वामीजींनी स्मृतिचिन्ह आणि पुष्प देऊन सन्मानित केले.संचालन सरन हिरे रिकामा यांनी केले. कोसीच्या समारोप समारंभाच्या निमित्ताने, पालकांसह विद्यार्थी, शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## वारकरी संप्रदाय विश्वधर्म होणार



**चांदूरबाजार-**वारकरी संप्रदायाचे उपासना पध्दतीत जातीभेद, उच-निच, गरीब-श्रीमंत, असा भेदाभेद नाही. वारकरी संप्रदायाने माणूस केंद्रस्थानी ठेवून, परमेश्वराची उपासना सर्वांसाठी इच्छानुरूप खुली ठेवली.मग ती व्यक्ती कोणत्याही धर्माची किंवा पंथाची असो.ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या पसायदानातून विश्वात्मके देवाची संकल्पना जगा जगासमोर ठेवली. ज्ञानेश्वर माऊलीच्या याच संकल्पनेमुळे विश्वातील मानव जातीला, कोणताही जाती व धर्म भेद न करता एकसंघ राहण्याची शक्ती प्राप्त झाली आहे. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रविंद्र इंगोले अध्यक्ष भक्तिधाम यांनी भूषविले. तर प्रमुख अतिथी म्हणून मनिषा नांगलीया नगराध्यक्ष,मनिष नांगलीया नगरसेवक तसेच प्रायोजक डॉ.प्रकाश इंगोले हे यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.केशवराव ठाकरे यांनी केले. तर संचलन व आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर डवरे यांनी केले.

## भूमी अभिलेखचा तालुकास्तरीय जनसंवाद कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' राबवण्यात येत आहे. यासाठी 'तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुधारीत कार्यक्रमानुसार २० फेब्रुवारीपासून अभियान राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमात नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक तक्रारी, विविध विकासकामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. या दिवशी तहसीलस्तरावर जिल्हा परिषद तसेच संबंधित तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव आणि कृषी सहाय्यक यांची उपस्थिती राहणार आहतालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमासाठी समन्वयक अधिकारी प्रशासनाने तालुकानिहाय जबाबदारी सोपवली असून उपस्थितीत तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम घेण्यासाठी खालीलप्रमाणे घेण्यात आले आहेत.सकाळी १० ते २ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख अमरावती येथे दि. ०२ मार्च, २०२६ रोजी, दुपारी ३ ते ६ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख भातकुली येथे दि. ०२ मार्च, २०२६ रोजी, सकाळी १० ते १.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख मोर्शी येथे दि. २० फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी ३ ते ६ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख वरूड येथे दि. २० फेब्रुवारी, २०२६ रोजी, सकाळी १० ते १.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख चांदुर बाजार येथे दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी, सकाळी १० ते १.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख दर्यापूर येथे दि. २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी ३ ते ६ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख अंजनगाव येथे दि. २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी, सकाळी १२ ते ३ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख चिलखदरा येथे दि. २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी १२ ते ३ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख धारणी येथे दि. ०६ मार्च, २०२६ रोजी कार्यक्रम घेण्यात यईल.जिल्हा परिषद, तसेच संबंधित तालुक्यातील इतर सर्व विभागाचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव, कृषी सहायक यांचे उपस्थितीत तालुक्यातील जनसंवाद व तक्रार निवारण आयोजित करावा.

## श्री.क्षेत्र तपोवनेश्वर येथे महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन

**अमरावती /का.प्र.**

चांदूर रेल्वे रोडवर सुमारे ११ कि.मी. अंतरावर घनदाट जंगलात वसलेल्या पौराणिक श्री क्षेत्र तपोवनेश्वर येथे महाशिवरात्री पर्वानिमित्त दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हे स्थान भगवान महादेवाच्या तपश्चर्येसाठी प्रसिद्ध असून योगीराज सद्गुरू श्री सितारामगिरी महाराज यांच्या तप, जप व साधनेमुळे या क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या ठिकाणी प्राचीन भगवान तपोवनेश्वराचे मंदिर असून पूर्वी भुयारात असलेली शिवपिंड बाहेर आणून तिची स्थापना करण्यात आली आहे. तसेच येथे पुरातन विष्णुमंदिर व श्री भैरव देवाचे मंदिरही आहे. श्री स्कंद पुराणामध्ये या क्षेत्राचा उल्लेख असून प्रसिद्ध शिवकथावाचक पं. श्री प्रदीपजी मिश्रा यांनीही येथे भेट देऊन पूजा व ध्यानसाधना केली आहे.महाशिवरात्री निमित्त



रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजता रुद्राभिषेक व आवाहित देवतांचे पूजन होणार आहे. सकाळी ६ वाजता योगीराज सद्गुरू श्री सितारामगिरी महाराज यांच्या समाधीचे पूजन व आरती, सकाळी ७ वाजता होमहवन, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती तर रात्री ९.३० वाजता शिवनाम जपमाळेस सुरुवात होईल. रात्रीच्या विविध प्रहरी विविध यजमानांच्या वतीने महारुद्राभिषेक व शिवमंत्र जपाचे आयोजन करण्यात आले आहे.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजतापासून धार्मिक कार्यक्रम सुरू राहतील. सकाळी १०.३० वाजता ह.भ.प. श्री आशिष महाराज आखरे (सालोरा) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून दुपारी १२ वाजता दहिहांडी व शोभायात्रा काढण्यात येईल. त्यानंतर दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवाची माहिती संस्थानचे अध्यक्ष अनिल भोजराज साहू यांनी दिली. उपाध्यक्ष लच्छुराम पवार, सचिव निलेश कुबडे यांच्यासह सर्व विश्वस्त व कार्यकारिणी सदस्यांनी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## क्रॉसकंट्री (महिला) स्पर्धेकरिता संघ

**अमरावती -** मंगलोर युनिर्व्हसिटी, मंगलगंगोत्री (कर्नाटक) येथे २७ फेब्रुवारी, रोजी होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये श्रीमती एस.आर. मोहता महिला महाविद्यालय, खामगांवची प्रणाली शेगोकार, बॅरि. आर.डी.आय.के. महाविद्यालय, बडनेराची वैष्णवी वानखडे व समीक्षा आमझरे, बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडाची स्वाती पळसकर, पायल नागे व वैदेही सिडाम, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची मेबरिशा लिंगडोह, बी.एस. पटेल महाविद्यालय, पिंपळगांव काळेची दिव्या जाधव आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीची तनिषा सवई हिचा समावेश आहे.

## रंगराव गव्हाळे यांचा गौरव



**बडनेरा -** येथील भूमिपुत्र तथा सुप्रसिद्ध व्यावसायिक रंगराव गव्हाळे यांच्या आजपर्यंतच्या समाजसेवा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,भाष्करराव भटकर, देविदास किटे,प्रा.गजानन वानरे यांनी रंगराव गव्हाळे यांचा नुकताच त्यांचा मधुबन वृद्धाश्रम येथे शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन कृतज्ञतापूर्वक गौरव केला आहे. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे शहर अध्यक्ष योगेश पखाले, दिनेश चापके, पांडुरंग खंडारे, बाळकृष्ण गव्हाळे, देवानंद गणोरकर, शंकरराव गव्हाळे, राजेश गव्हाळे, कृष्णा गव्हाळे, सोपान गव्हाळे ,गजानन गव्हाळे , मिथुन सोळंके, पार्थ गव्हाळे ,शंतनू गव्हाळे,मंथन गव्हाळे, मोतीराम गव्हाळे, संतोष गव्हाळ, अनिकेत गव्हाळे, सुरेश गव्हाळे, किरण अंबाळकार ,प्रविण संभे, शिव सदाफळे ,महेश ढोके, राहुल सदाफळे, ब्रह्मा वाडेकर, संदीप मेश्राम,गुड्डू दुर्वे, अजय ठोंबरे,तुषार कळसकर,मेघा ठोसरे, सुनिता गव्हाळे,पूजा धुर्वे, प्रातिभा गव्हाळे, स्वीटी गव्हाळे,पूजा गव्हाळे, शारदा गव्हाळे, साक्षी वाडेकर, जिजा गव्हाळे, प्रिया गव्हाळे आदिसह परिसरातील समाज बांधव उपस्थित होते.

## स्व.भैय्यासाहेब ठाकूर यांचे स्मृति प्रित्यर्थ शंकर पट

**कुऱ्हा/वार्ताहर**

येथील शंकर पट प्रेमी तर्फे, कुऱ्हा गावकरी कमिटी आयोजन व स्व.भैय्यासाहेब ठाकुर यांचे स्मृति प्रित्यर्थ भव्य शंकर पट दि. ११, १२, १३ फेब्रुवारी २०२६ ला शिव लॉन (पकडे लॉन) जवळ, कुऱ्हा-अमरावती रोड, रफीक शेख यांच्या शेतात या शंकर पटाचे आयोजित करण्यात आला आहे.

या पटाचे उद्घाटन यशोमतीताई ठाकुर माजी मंत्री, महिला बाल कल्याण विकास म. राज्य यांचे हस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष खा. बळवंत वानखडे अमरावती या पटा करिता 'अ' गट प्रवेश फी २१००/- रु. आणि पारितोषिके प्रथम ७१,०००/- स्व. किसनराव दमाये व स्व. प्रमोद दमाये यांच्या स्मृति प्रित्यर्थ विनोद किसन दमाये यांचे तर्फे द्वितीय ५१,०००/- स्व. बाबासाहेब आमले यांच्या स्मृति प्रित्यर्थ संदिप बाबासाहेब आमले यांचे तर्फे तृतीय ४१,०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी चतुर्थ ३१.०००/- मोहम्मद शहेजाद शेख महेमुद पटेल (माजी उपसरपंच, कुऱ्हा) यांचे तर्फे पाचवे २१.०००/- सत्तार भाई मुल्ला (माजी सदस्य, पं.स. तिवसा) व नितीन शेषराव वरठी यांच्या तर्फे सहावे १५,०००/- सलीम खॉं पठाण (उपसरपंच, ग्रा.पं. कुऱ्हा) यांचे तर्फे सातवे ११.०००/-मोहम्मद जफर मोहम्मद अफसर (पॉपर्टी डिलर) यांचे तर्फे आठवे ८.०००/- दिगांबर दमाये (प्रो. माऊली रेस्टॉरंट, कुऱ्हा) यांचे तर्फे नऊवे ७,०००/- दिगांबर दमाये (प्रो. माऊली रेस्टॉरंट, कुऱ्हा) यांचे तर्फे दहावे ५.०००/- श्रीनित सागर निमकर, कुऱ्हा यांचे तर्फे अकरावे ५,०००/- अश्विन जयस्वाल, कुऱ्हा यांचे तर्फे बारावे ४.०००/- आदित्य विनोद मालाधारी, कुऱ्हा यांचे तर्फे आणि 'ब'गट प्रवेश फी १५००/- रु. प्रथम पारितोषिक ४१,०००/- मिना सुनिल नायर (सरपंच, ग्रा. पं. कुऱ्हा) यांचे तर्फे व्दितीय ३१.०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी तृतीय २१,०००/- संदिप महाजन व आशिष टिंगणे यांचे तर्फे चतुर्थ १५,०००/डॉ. अमर राधारमण सिंग यांचे तर्फे पाचवे ११.०००/- कैलास पुंडलिक आसोले (सेलिब्रेशन हॉल, तिवसा रोड, कुऱ्हा) यांचे तर्फे सहावे ९.०००/- हारूण (बबलू) व सैय्यद (बबलु) यांचे तर्फे सातवे ७.०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी आठवे ६,०००/-आदित्य ज्वेलर्स, कुऱ्हा नऊवे ५,०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी दहावे४,०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी अकरावे ५.०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी बारावे ३.०००/- कुऱ्हा शंकरपट पंचकमेटी तर्फे कुऱ्हा गावकरी तसेच गाव गट - प्रवेश फी ७००/- रु. प्रथम पारितोषिक ११,०००/- संजय इंगोले यांचे तर्फे द्वितीय ९.०००/- आदित्य ज्वेलर्स, कुऱ्हा यांचे तर्फे तृतीय ७०००/- शिवम जयस्वाल यांचे तर्फे चतुर्थ ५०००/- उमेश दारोकार यांचे तर्फे आयोजक कमेटी दिगांबर दमाये (कमेटी अध्यक्ष), सलिम खॉं पठाण (उपाध्यक्ष), संतोष भैसे (सचिव), अनुग्रह नायर (सहसचिव), सतिश नागपुरे (कोषाध्यक्ष), विपुल गोठवाल (व्यवस्थापक), सदस्य उमेश दारोकार, मनिष पोकळे, नितीन सारवे,रणजीत सपाटे, गेंदलाल आनंद मस्करे,रमेश पटले, विशाल चव्हाण, अशोक बिसने उत्सव समिती सागर गोडबोले (अध्यक्ष), अंकुश सुने (उपाध्यक्ष), विक्रम शिंगाडे(सचिव), अभिजीत बागडे(सहसचिव), नागेश लुटे(व्यवस्थापक) सदस्य करण बारवाल, शुभम मेश्राम, सतिश पवार,

राज दमाये, राजेश निमरोड, प्रादिप कुंजाम, योगेश दारोकर,उद्देश सहारकर, करण पचलोरे, मो. रियाज, श्रेयस दारोकर नियम व अटी प्रत्येक जोडी हे आऊट झाल्यास त्याच पावतीवर जोडी सोडता येणार नाही. एक जोडी कितीही वेळा सोडल्यास एकच बक्षिस कमी पॉईंट मध्ये दिल्या जाईल. दोन किंवा सेकंड पॉईंट सारखे आल्यास अनुक्रमांक प्रमाणे दिल्या जाईल. तिकीट एकदा फाटल्यावर डबल वापस घेतल्या जाणार नाही. स्वतःची जिवीत्याची जबाबदारी स्वतःवरच राहील. त्याकरिता शंकरपट कमेटी जबाबदार राहणार नाही. पुरानी बैलाला मारणे, बैलाला दुखापत झाल्यास तो बैल शंकरपटामध्ये धावणार नाही. बैलाला मारहानी झाल्यास बैल मालकावर कायदेशिर कारवाई शंकरपट कमेटी करेल. सेकंड पट चालु असतांना जोडीला रस्ता दाखविता येणार नाही. कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार पंचकमेटीला राहील.शंकरपटात गैरवागणुक झाल्यास त्यावर निर्णय शंकरपट कमेटीला राहील. शंकरपटामध्ये जोडी मालकास दोन बेलामध्ये अनुक्रमांक नंबर दिल्या जाईल.

# अमरावती ग्रामीण पोलीस दलात २१४ शिपाई पदांसाठी भरती

**२१ हजारांहून अधिक उमेदवार**

**बाहेरगावच्या उमेदवारांसाठी मोफत निवासाची सोय**

## ११ ते २६ फेब्रुवारीदरम्यान जोग स्टेडियम येथे शारीरिक चाचण्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई पदभरती सन २०२५-२६ अंतर्गत अमरावती ग्रामीण पोलीस दलात २१४ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया दि. ११ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या भरतीसाठी तब्बल २१,२०६ उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून, त्यामध्ये १६,२८६ पुरुष व ४,९२० महिला उमेदवारांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेत सर्वसाधारण ६९, महिला ६४, खेळाडू १०, प्रकल्पग्रस्त १०, भूकंपग्रस्त ४, माजी सैनिक ३१, अंशकालीन पदविधर १०, पोलीस पाल्य ६ व गृहरक्षक १० अशा प्रवर्गनिहाय पदांचा समावेश आहे. भरती प्रक्रियेअंतर्गत दि. ११ ते २३ फेब्रुवारीदरम्यान पुरुष उमेदवारांची, तर दि. २४ ते २६ फेब्रुवारीदरम्यान महिला उमेदवारांची कागदपत्र पडताळणी व शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे. दरम्यान दि. १५, १९ व २२ फेब्रुवारी रोजी



शासकीय सुट्टी असल्याने त्या दिवशी भरती प्रक्रिया होणार नाही, अशी माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे. ही संपूर्ण भरती प्रक्रिया जोग स्टेडियम, पोलीस आयुक्त कार्यालयाच्या मागे, मालटेकडी परिसर, अमरावती येथे पार पडणार असून सुरुवातीला दररोज सुमारे ८०० उमेदवारांना, तर शेवटच्या टप्प्यात २,००० उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलावण्यात येणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी वसंत हॉल, मालटेकडी येथे मोफत निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. उमेदवारांनी त्यांना नेमून दिलेल्या दिवशी सकाळी ५ वाजता भरतीस्थळी हजर राहणे बंधनकारक असून, सर्व शैक्षणिक कागदपत्रे, प्रवर्ग प्रमाणपत्रे, भरती ओळखपत्र, पासपोर्ट फोटो व मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. भरतीस्थळी मोबाईल, कॅमेरा किंवा कोणत्याही मौल्यवान व इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास सक्त मनाई असून, एकदा प्रवेश मिळाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव बाहेर जाता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, भरतीच्या नावाखाली कोणीही पैशांची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक☞(पान २ वर)

# दहावी-बारावी परीक्षेसाठी पोलिस अलर्ट

## परीक्षा केंद्र परिसरात १० फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत निर्बंध

**अमरावती/प्रतिनिधीः-** दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि परीक्षा केंद्रांवर कोणतेही गैरप्रकार घडू नयेत, यासाठी शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी जमावबंदीचे आदेश जारी केले आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. या काळात परीक्षा केंद्र परिसरात कडक निर्बंध लागू राहणार आहेत.

आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात परीक्षार्थी व परीक्षेशी संबंधित अधिकृत कर्मचारी वगळता इतर कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच या परिसरातील सार्वजनिक टेलिफोन बूथ, एस.टी.डी./आय.एस.डी. व फॅक्स केंद्र बंद ठेवण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्रात



मोबाईल फोन, कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, ब्लूटूथ, कॅमेरा तसेच कोणतीही इलेक्ट्रॉनिक किंवा दूरसंचार साधने नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. याशिवाय परीक्षा केंद्राच्या ५० मीटर परिसरातील झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे निर्बंध १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत अमरावती शहरातील सर्व परीक्षा केंद्र परिसरात लागू राहणार आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये ☞(पान २ वर)

# अचलपूर बाजार समितीचे उपसभापती अमोल चिमोटे यांचा राजीनामा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अमोल चिमोटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा सभापती प्रतिभा ठाकरे यांच्याकडे ९ फेब्रुवारी रोजी रितसर सादर केला आहे. २० मे २०२३ रोजी उपसभापतीपदी नियुक्त झाल्यानंतर त्यांनी सुमारे २ वर्ष ७ महिने यशस्वीपणे पदभार सांभाळला.अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही सहकार क्षेत्रातील महत्त्वाची संस्था मानली जाते. २०२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांच्या नेतृत्वातील सहकार पॅनलचे १४ संचालक विजयी झाले होते. तर शेतकरी पॅनलचे ४ संचालक निवडून आले होते. निवडणूक निकालानंतर सभापतीपदी राजेंद्र गोरले तर उपसभापतीपदी अमोल चिमोटे यांची निवड करण्यात आली होती. उपसभापती पदाचा कार्यकाळ २१ महिन्यांचा निश्चित करण्यात आला होता. ठरलेल्या कालावधीपेक्षा सुमारे दहा महिने अधिक सेवा



दिल्यानंतर पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार चिमोटे यांनी राजीनामा दिल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान राजकीय घडामोडींमुळे सभापती राजेंद्र गोरले यांनी राजीनामा दिल्यानंतर प्रतिभा ठाकरे सभापतीपदी विराजमान झाल्या.मात्र उपसभापती म्हणून अमोल चिमोटे कार्यरत होते. सहकार पॅनलचे नेते बबलु देशमुख यांच्या सूचनेनुसार ९ फेब्रुवारी रोजी राजीनामा सादर करण्यात आला आहे. या घडामोडीनंतर पुढील उपसभापती कोण होणार? याकडे बाजार समिती व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. उपसभापती पदाकरीता सहकार पॅनलचे बबलु देशमुख व समता पॅनलचे अजय पाटील व भाजपाचे नेते काय भूमीका घेतात, यावर उपसभापतीचे पुढील नांव निश्चीत होणार आहे. उपसभापती पदाकरीता अतुल वाठ, ज्ञानदेव पाटील यांचे☞(पान २ वर)

# बलाढ्य संघातील लढतीने प्रेक्षकांची मने जिंकली

## अ.भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल स्पर्धेत निर्णायक लढत





**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्ट बॉल महिला स्पर्धेच्या चौथ्या दिवशीही उत्स्फूर्तपणे सामने खेळल्या गेले. चौथ्या दिवशी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यांमध्ये महिला संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्याकरिता आपले स्थान निश्चित केले आहे.

यामध्ये चौथ्या दिवशी झालेल्या सामन्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने हेमचंद्र छाया नॉर्थ पाटण गुजरात विद्यापीठावर १० - ० ने मात करून विजय मिळवला आहे. पंजाब विद्यापीठ चंदीगड विरुद्ध एम डी एस यु अजमेर यांच्यात झालेला सामना पंजाब विद्यापीठाने ३-१ ने जिंकला. एम. एल. एस. यु. उदयपूर विरुद्ध कालिकत विद्यापीठ यांच्यातील झालेला सामना कालिकतने एकतर्फी १६ - ० ने जिंकला. तसेच दुर्ग विद्यापीठ विरुद्ध अमृतसर विद्यापीठ यांच्यातील सामना अमृतसरने ४ - १ ने जिंकला. संत गाडगेबाबा☞(पान २ वर)

# मनोरुग्ण युवतीवर अत्याचार

**संशयित तात्काळ जेरबंद**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरखेड पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात घडलेल्या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. २२ वर्षीय मनोरुग्ण युवतीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा गंभीर प्रकार रविवारी समोर आला असून, पोलिसांनी तातडीची कारवाई करत आरोपीला अटक केली आहे.



पीडिता ही मानसिक आजाराने ग्रस्त असून, ती गावात आपल्या वृद्ध आजी-आजोबांसोबत वास्तव्यास होती. ८ फेब्रुवारी रोजीं दुपारच्या सुमारास आरोपी संजय डोळस (वय ४३) याने तिला गावातील कोंडवाड्याच्या मागील निर्जन परिसरात नेले आणि तेथे तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेदरम्यान पीडितेसोबत आरोपी असल्याचे दृश्य गावातील काही नागरिकांसह तिचे आजोबा आणि मामा यांच्या निदर्शनास आले. संशय बळावल्याने कुटुंबीयांनी तात्काळ शिरखेड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पीडितेच्या मामाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करत त्याला ताब्यात घेतले. घटनेचे☞(पान २ वर)

# मोबाईल हिसकावणारे दोघे अल्पवयीन ताब्यात

## मॉर्निंग वॉकदरम्यान महादेवखोरी मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** पहाटेच्या शांत वातावरणात मॉर्निंग वॉक करत असलेल्या विद्यार्थ्याचा मोबाईल हिसकावण्याच्या घटनेने महादेवखोरी–यशोदानगर मार्गावर एकच खळबळ उडाली. दुचाकीवरून आलेल्या दोघा युवकांनी १६ वर्षीय विद्यार्थ्याचा मोबाईल हिसकावून पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र विद्यार्थ्याच्या आरडाओरडीनंतर नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे दोघांनाही घटनास्थळीच पकडण्यात आले.



ही घटना सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास घडली. फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील शांतिनगर येथील रहिवासी निजल राजेश गवई (वय १६) हा महादेवखोरी ते यशोदानगर मार्गावर मॉर्निंग वॉक करत असताना उड्डाणपुलाजवळ दुचाकीवरून आलेले दोघे युवक त्याच्या मागे आले. निजल☞(पान २ वर)

# अपघातात पती ठार; पत्नी गंभीर

## -हिवरा पूर्णा फाट्याजवळील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** आसेगाव पूर्णा ते दर्यापूर मार्गावरील हिवरा पूर्णा फाट्याजवळ रविवारी रात्री एक भीषण वाहन अपघात घडला. या अपघातात सुखदेव शिवराम गवई (वय ५५, रा. खोलापूर पांढरी, ता. भातकुली) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, त्यांची पत्नी सुरेखा सुखदेव गवई (वय ५०, रा. दारापूर, खोलापूर) या गंभीर जखमी झाल्या आहेत.




प्राप्त माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे ८.३० वाजताच्या सुमारास गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या सुखदेव गवई यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने त्यांना घटनास्थळी गंभीर दुखापत झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अपघातात पत्नी सुरेखा गवई यांनाही गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांकडून त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. अपघातानंतर काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच आसेगाव पूर्णा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून,पोलीस तपास सुरू☞(पान २ वर)

# उड्डाणपुलाच्या पिलरला ट्रकची धडक

## चित्रा-पठाण चौकातील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** चित्रा–पठाण चौकातील रखडलेल्या उड्डाणपुलाच्या कामाने सोमवारी सकाळी पुन्हा एकदा शहरवासीयांचे लक्ष वेधले. सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास एका भरधाव ट्रकने उड्डाणपुलाच्या पिलरला जोरदार धडक दिली आणि काही क्षणांतच परिसरात भीतीचे वातावरण पसरले. धडकेचा आवाज इतका प्रचंड होता की, पिलरवरील पुलाचा संपूर्ण ढाचा हादरून गेला. सुदैवाने तो कोसळला नाही; अन्यथा मोठा अनर्थ घडला असता.

उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने या मार्गावरील वाहतूक आधीच बंद करण्यात आली होती. मात्र ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे तो बंद असलेल्या मार्गावर शिरला आणि थेट पिलरला धडक बसली, अशी माहिती समोर आली आहे. घटनेनंतर काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आणि चौकात एकच खळबळ उडाली.प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेत तातडीने वाहतूक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. एक बाजूचा मार्ग पूर्णतः बंद करून शैक्षणिक संकुलाच्या मैदानातून वाहनांची वाहतूक☞(पान २

# फुल उत्पादकांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## -मनपाच्या अतिक्रमण पथकाविरोधात रोष



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाकडून फुल उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय केला जात आहे. हा अन्याय दूर करण्याच्या मागणीसाठी फुल उत्पादक शेतकऱ्यांनी आज सोमवार ९ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिल्हाधिकाऱ्यांना फुले भेट देऊन योग्य कारवाईची मागणी केली. निवेदनात म्हटले आहे की, चौधरी चौकाची जागा एपीएमसी ने फूल विक्रीसाठी गेल्या काही वर्षांपूर्वी उत्पादकांना दिली आहे.फूल उत्पादक शेतकरी थेट शेतातून आणलेले मोगरा, शेवंती ,झेंडू, गुलाब☞(पान २ वर)

# भिलटेकच्या नागोबा देवस्थानात चोरी

## दानपेटी फोडून रोकड लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भातील श्रद्धेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या भिलटेक येथील नागोबा देवस्थानात चोरट्यांनी हात साफ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून त्यातील सुमारे ४० ते ४५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली आहे. ही चोरी रविवारी सकाळी उघडकीस आली.

भिलटेक येथील नागोबा देवस्थान हे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, गेल्या महिन्याभरापासून दर शनिवार व रविवारी येथे यात्रेचे स्वरूप निर्माण झाले आहे. मोठ्या संख्येने भाविक येत असल्याने दानपेटीत मोठी रक्कम जमा होत होती. याच परिस्थितीचा फायदा घेत ७ फेब्रुवारीच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केला. रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दानपेटीचे ☞(पान २ वर)

# राष्ट्रसंताना 'भारतरत्न' मिळण्यासाठी गुरुदेवभक्तांचा एल्गार

## तिवसा तहसीलदारांच्या मार्फत राष्ट्रपतींना निवेदन

**तिवसा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील थोर महापुरूषांचा देशाच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमुर्ती गाडगेबाबा, क्रांतीसुर्य महात्मा फुले, विद्येची आराध्य देवता माता सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, भारताचे पहिले कृषिमंत्री पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना भारत सरकारने यावेळीतरी भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांच्या अतुलनीय अशा कार्याचा गौरव करावा या मागणीचे निवेदन तिवसा येथील तहसीलदार यांच्या मार्फत देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान आणि राज्याचे राज्यपाल यांना पाठवण्यात आले आहे.



भारत सरकारने कधी नव्हे ते, पहिल्यांदा वर्ष २०२४ मध्ये ५ व्यक्तींना भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यामध्ये ५ पैकी ४ व्यक्तींना मरणोत्तर भारतरत्न देण्यात आला. ज्यामध्ये महाराष्ट्रातील थोर महापुरूषांना मात्र, अद्याप भारत सरकारने भारतरत्न पुरस्कारापासून वंचित ठेवले आहे.

स्वातंत्र्य काळानंतर भारत देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी वंदनीय तुकडोजी महाराज यांना त्यावेळी राष्ट्रसंत पदवी बहाल केली होती. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यासह देशातील विविध चळवळीत राष्ट्रसंत तुकडोजी महाजांचे अफाट असे योगदान आहे. ग्रामगीतेच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भारताच्या विकासाचा आणि स्वच्छतेचा विचार मांडला. त्यांनी समाजसुधारणा, ग्रामविकास, राष्ट्रभक्ती, जागतिक शांतता सुद्धा☞(पान २ वर)

# सिंधी चौकातील खंडेलवाल वाईन्सचे स्थलांतरण करा

## नगरसेवक मनीष बजाज यांच्यासह नागरिकांची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सिंधी चौक येथील खंडेलवाल वाईन्स दारू दुकानाचे स्थलांतरण करण्याची मागणी नगरसेवक मनीष बजाज आणि परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना आज सोमवार ९ फेब्रुवारी रोजी निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, या वाईन शॉपीमुळे रहीवासी वस्ती क्षेत्रातील सिद्धिविनायक कॉलनी, राम लक्ष्मण रेसिडेन्सी च्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुकानातून दारू खरेदी केल्यावर☞(पान २ वर)

# गजानन अजमिरे यांचे निधन

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथील प्रख्यात अजमीरे इंजिनियर अँड बिल्डर्सचे संचालक विनोद व प्रदीप अजमीरे यांचे वडील गजानन चंद्रभानजी अजमिरे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी प्रदीर्घ आजाराने आज



दि.९ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले.त्यांची अंतिम यात्रा दि. १० फेब्रुवारी ११ वाजता अजमीरे लेआउट मोर्शी येथून निघणार असून स्थानिक हिंदू स्मशानभुमी चांदूरबाजार रोड मोर्शी येथे त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार पार पडणार आहे.त्यांच्या मागे पत्नी,मुली,सुना नातू नातवंड बराच मोठा आप्तपरिवार आहे.